कौतुकाने बसविले आहे. (७/१६) ही निलगिरीवासिनी भवानी येथे निलांबिका या नावाने विराजमान झालेली आहे. या निलांबिकेस निलांबा, शांभवी, रेणूका, भैरवी आदिही नावे आहेत. (७/३१) हिच्या दर्शनाचा महिमा (७/३२) – हे राजा, या नीलपर्वतवासिनी कामाक्षी रेणूकेचे चरणकमळ जे नर पाहतात ते पुन: पुन: जन्म घेण्याच्या चक्रातून मुक्त होतात.

गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते।
स्नात्वा कनखले तीर्थे
पुनर्जन्म न विद्यते॥

तथा

नीलपर्वतवासिन्या रेणूकाया: पदांबुजम्।
ये पश्यंति नरा राजन्
न ते यांति पुनर्भवम्॥

येथेच कुशावर्त नावाचा एक झराही आहे.

माता रेणूकादेवीचे निवासस्थान असलेला हा निलगिरी पर्वत सिद्धिक्षेत्र आहे. अत्रिसुत दत्तात्रेयाचे सिद्धिक्षेत्र म्हणूनही विख्यात आहे. (७/२०) (तथा दत्तात्रेयं हरिं साक्षात वसंतं नीलपर्वते। (७/२६)) असे पुन: पुन: सांगितले असून याच सिद्धिक्षेत्रात जामदग्निसुत परशुरामाने अनेक तांत्रिक सिद्धि प्राप्त केल्या. (जामदग्नेन रामेण सिद्धि: प्राप्तात्र भूमिप। (७/२२)).

ब्रह्मगिरीच्या दक्षिण भागी कुवालंबा किंवा कोलांबा नावाच्या देवीचे एक स्थान आहे. ही कोलांबा आणि निलपर्वतवासिनी नीलांबा एकच आहे असे या माहात्म्यकाराने सांगितले आहे. पूर्वीच्या काळी या ठिकाणी एका मोठ्या गुहेत कोलासूर नामक एक दैत्य (हिरण्याक्षाचा मेव्हणा) रहात होता. नीलांबामाता रेणूकादेवीने गौतम ऋषींच्या प्रार्थनेवरून गंगाद्वारी येऊन त्याचा वध केला. कालासूराने मरणापूर्वी केलेल्या प्रार्थनेमुळे ती तन्नामधारिणी (कोलांबा) बनून त्या ठिकाणी विराजमान झाली असेही या माहात्म्यकथेत सांगितले आहे. (१४/४१-६५/६६) आजही हे कोलांबाचे स्थान असलेला ब्रह्मगिरीचा भाग कोलगिरी, कोलाचल किंवा कोलगढ या नावाने ओळखला जातो.

संत ज्ञानदेवांच्या काळात गाजत असलेल्या महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधरस्वामी यांचा या त्र्यंबक क्षेत्राशी संबंध आलेला होता. शके १८८९ च्या अश्विनात ते विदर्भातील मेहकरहून पैठणला आले. ते सिंहस्थ यात्रेच्या निमित्ताने त्र्यंबकेश्वरी जाण्यासाठीच त्र्यंबकेश्वराला विडा वाहिल्यानंतर स्वामी गंगाद्वाराला गेले. तेव्हा तेथील कोळाई नामक देवीच्या नाभितून पाणी निघत असलेले पाहून स्वामींच्या डरवले नामक एका शिष्याने देवीच्या बेंबीत बोट घातले आणि तो देवीस म्हणाला –

उभे गंगातीरे गावोनेसि।
आता माझी अंगुळेनेपां॥

डरवले याने केलेला हा देवीचा अधिक्षेप स्वामींना रूचला नाही. ते त्याला म्हणाले –

डरवलेया ऐसे न म्हणिजे कि देवतेसी। – डरवले याने गंगाद्वारींच्या ज्या कोळाई देवीचा अपमान केल्याची आणि स्वामींनी त्याला समज दिल्याची हकिगत महानुभाविय पोथी लिळाचरित्रात दिलेली आहे, त्या कोळाई देवीचा उल्लेख महानुभावीय स्थानपोथीमध्ये – ब्रह्मगिरीचां अधोपरि कोळाए – असा केलेला आहे.

अद्वैती (त्रिक) शैव परंपरेचा प्रवर्तक पंडित त्र्यंबकाचार्य याच्या त्र्यंबकमठिकेची एक शाखा आसाममधील कामरूपात प्रस्थापित झालेली होती. उत्तरत्र्यंबकमठिका किंवा अर्धत्र्यंबकमठिका या नावानी ती ओळखली जाते. या शाखेचे प्रवर्तन त्र्यंबकाचार्यांच्या दुहितृ परंपरेतील म्हणजे उपासिका परंपरेतील मच्छंद – मच्छिंद्र किंवा मत्स्येंद्रनाथ या सिद्ध तांत्रिकाने इसवी सनाच्या पाचव्या शतकात केलेले होते. या मठिकेशी निगडीत असणारा तांत्रिक संप्रदाय योगिनी कौलमत या नावाने प्रसिद्ध आहे. मच्छंद हा या साध्वी मीनयोगिनी नामक स्त्रीचा पुत्र आहे. या योगिनी कौलमताचा प्रवर्तक मच्छंद किंवा मत्सेंद्र या सिद्धपुरुषाच्या पत्नीचे नाव कुंकणांबा असे नोंदविलेले आढळते. कुंकणा म्हणजे (कुं = पृथ्वी+कणा = रेणूरूपा) भूमिच्या कणांनी बनलेली रेणूका किंवा रेणूमयी. दक्षिण भारतात या देवीची उपासना वारूळ तथा योनी या रूपात केलेली आहे. त्र्यंबकेश्वराच्या परिसरातील डोंगरात कोकणा नावाची एक आदिवासी जमात आजही नांदते आहे.

कौलमत हे कुंकणेच्या म्हणजे योनीच्या किंवा भूमिच्या लोकधर्मीय उपासनेतून उत्क्रांतित झाले आहे. कुल म्हणजे भूमि, योनी किंवा मुलाधार चक्र. तांत्रिकांच्या परिभाषेत कुल म्हणजे शक्ती. आचार्य मच्छंद यांनी या लोकधर्मीय उपासनेला तांत्रिक स्वरूप दिले. त्याच्या शक्तीचे किंवा मुद्रायोपितेचे नाव कुंकणांबा असल्याने तसेच आचार्यांच्या मातेचे नाव मीन योगिनी असल्याने या मातृसत्ताक तांत्रिक उपासनेस योगिनी कौलमत असे म्हटले जाते. माता ही संतानदात्री असते, म्हणून योगिनी कौलमत हा संतानदात्री भूदेवीच्या योनीपूजेचा संप्रदाय आहे. त्र्यंबकमठिका ही योगिनी कौलमताची मूलगंगोत्री असून आदिशक्तीच्या उपासनेचा एक भाग म्हणूनही ती ओळखली जाते. आसाम, बंगाल, बिहार, नेपाळ, तिबेट, ब्रह्मदेश, जावा सुमात्रा, थायलंड आणि मंगोलिया या भागात असलेली कामाख्या, मणिपद्मजा, शमळी, कामी, थुंबी, पद्मयोनी, विमलांबुजा, सुवर्णयोनीमातृका किंवा सोन्याची शाळुंका (सुवर्णशंखी) आदि नावांनी प्रचलित असलेल्या मूल तांत्रिक परंपरेशी जवळचे नाते सांगते. गुरु गोरक्षनाथाने संस्थापित केलेल्या तथा जलंदर, चर्पट, अडबंग, कानिफ चौरंगी, रेवाण, भर्त्री तथा मच्छेंद्र आणि मीननाथ आदिंनी विस्तारीत केलेला मुद्रामार्ग किंवा नाथसंप्रदाय यातील मीननाथ हा या कुंकणांबेचा मुलगा आहे. हिचे दुसरे नाव मिनाकिनी असे असून काही काही ठिकाणी मुद्रांकिनी किंवा मिनांकिनी म्हणजे जलसाधना करणारी मातृदेवता (मैनाकिनी) असेही संबोधिले गेलेले दिसते. कामरूप आणि नामरूप यांच्या मध्य भागातील अहिलापट्टण किंवा हेलापट्टण येथील स्त्री साधिकेंच्या महासंघाची ही नायिका होती तथा जन्माने ही सिंहलद्वीप नामक बेटातील अनुराधापूर येथील पंडित उपरिचर वसुकिर्ती या तंत्रसाधकाची ही तंत्रसाधना – दीक्षित कन्या होती. हिची मूल नामें – अखिलोत्तिलका, किलोतळा, अखिलांतरी, कुलोत्तरा, कुलोखिला, अखिलोत्तला,

कुलपल्लवी, पर्ण कुली अशी आहेत. ही मीन, मकर, कृच्छ, अवंति, स्वप्नजल, अंबुज, छिन्नमस्ता, रागिणी, अनुरागिणी, महिरागिणी, शिवरागिणी, वातरागिणी, वनचरी, दिनचरी, ऋतुचरी, निशाचरी, उपरिचरी, गोचरी, अगोचरी, नितंबिनी, अहितांबिनी, मुद्रांबिनी, मीनांबिनी, जलाधिसत्व, कुंभी, सुपतति, उर्ध्वरेती, वातयोषिणी, कुंभयोषिणी, यक्षयोषिणी, नभोषिणी, सुमंतिनी, सुभ्रांतिनी, अमितवाहिनी, सुमितवाहिनी, उल्लोलिताक्षी, विशालाक्षी, कामाक्षिणी, कामवीर्याक्षिणी, महासाध्वी, दीपशिखी, महाभोगिनी, वातभोगिनी, सुप्रसन्ना, आदिप्रसन्ना, वृत्तप्रसन्ना, तूर्यप्रसन्ना आदि भिन्न भिन्न तीनशेसाठ तांत्रिक साधनासिद्धिंची ज्ञात्री होती. स्त्री साधिकांच्या साम्राज्याची ही महाराज्ञी होती. मच्छेंद्रनाथ किंवा मच्छिंद्रनाथ या तांत्रिक आचार्याकडून हिने उपरिचर साधना तथा वाताकर्षण साधना नामक साधनासमुदायांचे अन्नपूर्णा-पर्वतराजीत मानससरोवराच्या दक्षिण तीरावर तथा हिमालयातील कांचनगंगा नामक पर्वतराजींमध्ये स्वतंत्र साधनालये स्थापन केलेली होती. कामाक्षी पीठाच्या संस्थापनेत हिचे विशेष असे योगदान आहे. ही अखिलोत्तिलका उपाख्य किलोतळा मत्स्येंद्रनाथाबरोबर साधनारत असताना मीननाथ नामक पुत्रास हिने जन्म दिला. महाकुंभीसाधना करीत असताना हा जन्मला म्हणून यास कुंभ मीन असेही म्हणतात तथा त्या स्थानास कुंभीनगर किंवा कुंभीग्राम असे म्हणतात. मीन म्हणजे सूक्ष्माचीही वृद्धी करणे. अणोअणियान् महतोमहियान् या तत्वाच्या सिद्धतेसाठी मीनमच्छिंद्राचा जन्म झालेला आहे. याने वायु, अग्नि, भू आणि जल या सर्व साधना परिपूर्णपणे सिद्ध केल्या होत्या. भूमिपूजेचे महत्त्व वाताकर्षण विद्येच्या द्वारे जनसामान्यांसाठी याने प्रस्थापित केले. हा चौसष्ट तंत्रांचा ज्ञाता होता. याने वैदिक तथा तांत्रिक गूढसाधनांना संगोष्ठित केले. नऊ नाथांनंतर हा दहावा नाथ मानला गेला आहे. या ९+१ नाथांचा मुद्रामार्ग किंवा नाथसंप्रदाय आज विद्यमान दिसतो. गुरु गोरक्षनाथांनी आपल्या गुरुस म्हणजे मत्स्येंद्रनाथास स्त्री-राज्यातून बाहेर आणण्यासाठी स्त्रीची वस्त्रे परिधान करून म्हणजे वामाभूत्वा यजेत् पराम्। (स्त्री बनून पराशक्तीची पूजा करणे) या नियमानुसार या मातृदेवतेच्या राज्यात प्रवेश केला आणि मीननाथासह आपल्या गुरुस नाथसंप्रदायाच्या योगदानासाठी बाहेर आणले असे चूलिकापैशाची भाषेत लिहिलेल्या गोरक्ष काव्य किमयागार नामक ग्रंथात वर्णिलेले आहे. अखंडयोगी गुरु गोरक्षनाथ यांचे पूर्वाश्रमीचे नाव लामा वज्रसत्वशुद्ध असे होते. हिमालयातील एका लामा आश्रमातून हा विद्यार्थी वाताकर्षण विद्येचे प्रयोग करण्यासाठी तथा नाथसंप्रदायाच्या संस्थापनेसाठी उत्तरेकडून दक्षिणेकडे आला. (हा उर्ध्वरेतयसाधक असून आचार्य सत्वशुद्धांचा (सत्वशुद्धमणिभद्र) यांचा अन्तेवासि होता. याने स्थापिलेल्या संप्रदायास गोरक्षनाथाचा संप्रदाय किंवा नाथसंप्रदाय असे म्हणतात. तिबेट, भूतान, नेपाळ येथील राजघराणी याचे अनुयायी होते. नेपाळ राज्याच्या आजच्या चलनी नाण्यांवर श्री श्री श्री गोरखनाथ असेच लिहिलेले दिसते.

## सुब्रमण्य

सुब्रमण्य हे दक्षिणेतील लोकप्रिय असलेल्या स्कंद देवतेचे नाव आहे. प्राचीन भारतीय देवता मंडलात या स्कंद देवतेचे विशेष स्थान मानले आहे. याची जन्मकथा अद्भुताने भरलेली आहे तसेच वीरतेने उजळलेली आहे. अथर्ववेदातील एका परिशिष्टात धूर्त आणि स्तेनानाम् पतये नमः। (स्तेन म्हणजे चोर-- चोरांचा देव) असे याचे वर्णन आहे. नवजात बालकांना



सुब्रमण्य

ग्रासणाऱ्या बालग्रहांनी यास आपला स्वामी मानिले आहे. कुमार हे नाव अग्निवाचक आहे. हा शिवशक्तींचा ज्येष्ठ पुत्र मानला आहे. मातृदेवतांच्या मेळाव्यात याची उपस्थिती दिसते. बालजन्माच्या क्षणावर प्रभुत्व गाजवणारी षष्ठी (सटवाई) ही याची पत्नी मानली आहे. मयुर तथा कुक्कूट ही याची वाहने आहेत. कलापि किंवा शक्ती हे याचे प्रमुख आयुध आहे. सहा कृत्तिकांच्या संबंधातून हा जन्मास आला. याला कार्तिकेय आणि षण्मुख ही नावे मिळालेली आहेत. जगभरातल्या दिव्य कथांमध्ये गाजलेले जे बालदेव आहेत त्यात कार्तिकेयाचे स्थान विशेष महत्त्वाचे दिसते.

दक्षिण भारतात पूर्वकालापासून चालत आलेली अय्यपन, शास्ता, गुरुगन आदि देवांची उपासना कालांतराने स्कंदोपासनेत परिणीत झालेली दिसते. तथापि हे मूळ देव आपापली स्वतंत्र आस्तित्वे टिकवून राहिलेले दिसतात. महाराष्ट्रातील क्षेत्रपाल देव खंडोबा याचा जन्मदिवस हा स्कंदषष्ठी हाच मानलेला आहे. दक्षिण भारतात स्कंदाचे सुब्रमण्य हे नाव विशेष लोकप्रिय दिसते. व्यक्तिनामासाठीही हे नाव सतत वापरलेले दिसते. सुब्रमण्य, बालसुब्रमण्य, सुब्बाराव, सुब्बराय, सुब्बालक्ष्मी आदि नावेही विशेष करून वापरलेली दिसतात. महाराष्ट्रात खंडोबाच्या उपासनेच्या प्रभावामुळे खंडेराय, म्हाळसाकांत, हैबति (हयपति), महिपति, मैलार, मालोजी आदि नावे जशी सर्वसामान्यत: आढळतात तसेच दक्षिणेत सुब्रमण्याच्या नावाचा वापर झालेला दिसतो.

ब्रह्मण्य असा हा मूळ शब्द असून या शब्दाचे संस्कृत भाषेतील अर्थ पवित्र, पळस, पारसा, पिंपळ, मुंजतृण, विष्णु, शनिग्रह आदिही याचे अर्थ होतात. सुब्रमण्य म्हणजे अत्यंत पवित्र.

सरदार रघुनाथराव विंचूरकर यांनी इसवी सन १८८१ ते १८८३ या काळात दक्षिण व उत्तर कन्नड प्रदेशात (मॅंगलोर तथा कारवार जिल्ह्यात) केलेल्या तीर्थयात्रांचा तपशिलवार वृत्तांत पंडित गौरीशंकरशास्त्री अनंतशास्त्री लेले यांनी यात्राकल्पलता या नावाने ग्रंथित केला आहे. सरदार रघुनाथरावांनी सुब्रमण्य क्षेत्राचीही यात्रा केली होती.

थोरली सडक सोडून सुब्रमण्याच्या मंदिराकडे जाऊ लागताच किर्र झाडी लागली. या रस्त्यात सूर्यदर्शन क्वचितच होई. येथे एक जुनाट मंदिर बांधलेले असून त्यात पुरुषभर उंच असे वारूळ आहे. या मंदिराची पूजा तेथून १ मैल अंतरावरील खेड्यातील एक ब्राह्मण करतो. मंदिराच्या समीप एक लहान नदी वाहते. या नदीच्या जवळपास आणि मंदिरासमीप मोठमोठे सर्प आहेत. या ठिकाणी सरदारसाहेबांचा मुक्काम झाला होता. तेंव्हा सरदारसाहेबांनी तथा बरोबरीच्या मंडळींनी खूपच मोठाले सर्प पाहिले. परंतु कोणासही उपद्रव झाला नाही. सुब्रमण्य हे गाव अगदी लहान खेडे आहे. या लगत कुमाराद्रि नावाचा एक पर्वत आहे. त्यातून कुमारधारा नामक नदी निघाली. या डोंगराच्या जवळच आदिसुब्रमण्य या नावाचे एक स्थान आहे. हे देवाचे मुख्य मंदिर मानले जाते. येथील मंदिरात मूर्ती नसून वारूळाचीच पूजा करतात. हे मंदिर खूप मोठे आहे. या मंदिरात एका विशिष्ट मर्यादास्थानावरूनच दर्शन घेता येते. येथून सोन्याने मढवलेल्या देव्हाऱ्यात सोन्याचा एक खूप मोठा नाग तथा मयुरावर बसलेली एक बालमूर्ती दिसते. ऐकिवात असे आले की पूर्वी मंदिरात मुख्य देवता वारूळ होती, त्यातून सुब्रमण्याची मूर्ती स्वयंभू आली होती. म्हैसूर राज्यात जेंव्हा टिपू सुलतानाचा अंमल वाढला तेंव्हा ही मूर्ती फोडली गेली, वारूळ खणले गेले. त्यानंतर नव्या मूर्तीची स्थापना झाली. पंडित गौरीशंकर शास्त्रींनी लिहिलेल्या यात्राकल्पलता (१८८४, पृष्ठ ३९, ४१, ४५) यातील माहिती आपण पाहिली.

उत्तरप्रदेशातील गोरखपूर येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'कल्याण' मासिकानुसार (कल्याण तीर्थांक वर्ष ३१, संख्या १, जानेवारी १९५७, पृष्ठ ३२४) सुब्रमण्य मंदिरातील आसनाच्या वरच्या भागी मयुरवाहन षडाननाची मूर्ती आहे. मध्यभागी सर्पराज वासुकीची मूर्ती आहे आणि खालच्या भागी शेषाची मूर्ती आहे.

निरुक्तकारांनी सुब्रमण्य या नावाची व्युत्पत्ति सु+ब्रह्मण्य अशी करून मायेच्या आतील मायापटल दूर करणारे शुद्ध, तेजरूप ब्रह्म म्हणजे सुब्रमण्य असे सांगितले आहे. पंडित लेले शास्त्रींनी आपल्या यात्राप्रबंधात मंदिरात असलेल्या नागांच्या प्रधानतेविषयी एक कथा दिली आहे– फार फार वर्षांपूर्वी वासुकीचे व गरूडाचे घनघोर युद्ध झाले. या युद्धात मर्मस्थानी आघात होऊन वासुकि नाग घायाळ झाला. आणि 'वाचवा वाचवा' असा आक्रोश करू लागला. तो आक्रोश ऐकून नारदमुनी तेथे आले. त्यांनी गरूडाची समजूत घातली, भावाभावात असा संघर्ष होणे उचित नव्हे असे गरूडास सांगितले. गरूडाने त्या क्षणी जरी नारदांचे म्हणणे ऐकले तरीही जाताजाता त्याने वासुकीला धमकी दिली– आज तू माझ्या हातून वाचलास, पुन्हा सापडशील तेंव्हा मी तुझा वध करेन. धास्तावलेल्या वासुकीने महामुनी नारदांची प्रार्थना केली. मला आता सुरक्षित जागा सांगा अशी त्याने विनंती केली. नारदमुनींनी त्यास दक्षिणेतील कुमाराद्रि पर्वताजवळील गुहेत जाऊन शिवाला प्रसन्न करण्यास सांगितले. वासुकीने तसे तप केले. शिव प्रसन्न झाला. वासुकीने गरूडापासूनचे भय सांगितले. शिवाने त्यास सांगितले की तारकासुराच्या वधानंतर कार्तिकेय या ठिकाणी विश्रांती घेईल. त्यावेळी तू त्यास शरण जा, म्हणजे तो तुझे सदैव रक्षण करील आणि तुला स्वत:जवळ स्थान देईल.

सुब्रमण्य या नावाचे रहस्योद्‌घाटन करण्यासाठी म्हणून रावबहादूर विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी एक प्रबंध लिहिला. तो प्रबंध दिनांक १३ मे १८६९ रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेत 'सर्पंट वर्शिप इन वेस्टर्न इंडिया' या नावाने त्यांनी वाचला. या निबंधात पश्चिम भारतातील नागोपासनेचा परामर्श घेण्याच्या निमित्ताने उपासना परंपरेची बरीच वैशिष्ट्ये सांगितली आहेत. या निबंधात रावबहाद्दूर

साहेबांनी सुब्रमण्य या नावाचे स्पष्टीकरण सुब्बर अँड मणि वूड फॉर्म अ कॉबिनेशन, सिग्निफाईंग द चिफ ऑर जुवेल ऑफ सर्पंटस्. सुब्बराया ऑर सुब्बराजा मिन्स द सॉवरीन सर्पंट असे केले आहे. रावबहाद्दूर साहेबांच्या मते सुब्रमण्य हे स्कंदनाम सुब्बरमणि या मणिप्रवाल शैलीतील तामिळ शब्दाचे ध्वनिसाम्याने साधलेले कृत्रिम संस्कृतीकरण असून या शब्दाचा मूलार्थ नागमणी म्हणजे नागराज अथवा नागश्रेष्ठ असा आहे. रावबहाद्दूर मंडलिकांप्रमाणेच दि कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया (वॉल्यूम ४, एडिटेड बाय हरिदास भट्टाचार्य, कलकत्ता – १९५६), स्कंदकल्ट इन साऊथ इंडिया – के. आर. वेंकटरामन, पृष्ठ ३०९. तसेच द्रविडियन इंडिया या पुस्तकाचे कर्ते श्री. टी. आर. शेष अय्यंगार हे असे म्हणतात –

There exists a close connection between the worship of Subramannya and that of the serpant. The common name Subba or Subbaraya found among the Telgus, Kannadigas and Tamil people is explained to be both a contraction of Subramannya and a synonym for serpant. The sixth day of a lunar month (षष्ठी) is held as peculiarly sacred to Subramannya as to the serpant God. He is riding on a peacock. His marriage with the forest maid Valliyammam and the fact that his most famous temples are on the hill tops show that he is connected with the ancient tree and serpant worship.

कार्तिकेय – दि डिव्हाईन चाइल्ड रत्नानवरत्नम – भारतीय विद्याभवन – १९७३ – पृष्ठ १४३ – There is a popular belief that Muruga manifests himself in the form of serpants to exhibit his grace to his devotees. Paripadal refers to a fearfull sight of a five headed serpant and its tender young one which frightened the young devotees at the temple of Tirupparamkundram. It is interesting to note that this fearful sight was later discovered to be a water flower nestling on the hill pool. Anyhow the imaginary fear suggests the existence of belief in five headed serpants in the abodes of Muruga –

दक्षिणेतील बहुदा सर्व लोक आजही नागाचे दर्शन घडले असता आपणास मुरुगन देवाचे दर्शन घडले असे मानतात. बंगालमधील वैद्य जातीचे लोक नागाला प्रसन्न करण्यासाठी नागमंडलनृत्य या नावाचे एक अनुष्ठानिक नृत्य करतात. या अनुष्ठानात रांगोळीने एक मोठा साप चित्रीला जातो – त्याला ते शुभराय (सुब्बराय) असे म्हणतात. (पहा – भारतीय संस्कृती कोश, खंड ४, संपादक – पंडित महादेवशास्त्री जोशी, १९६७, पृष्ठ ७४५-७४६)

★ ★ ★

**सर्प** – सर्पपूजेची प्राचीन प्रथा, भारत, ब्रह्मदेश, थायलंड, बॉबिलोनियन लोक, सिरिया, इजिप्त, चीन, जपान, कोरिया, मंगोलिया, तिबेट या भागात परंपरागत चालत आलेली आहे. जगातील सर्व गुफांमध्ये सर्प कोरलेले दिसतात. जगातील सर्व मानववंश सर्पपूजा करीत आलेले दिसतात. ध्रुवीय प्रदेश न्यूझीलंड, आयर्लंड या भागातील सर्पांच्या जाती भिन्न-भिन्न प्रकारच्या दिसतात. आज जगात सुमारे २७०० जातीचे सर्प आहेत. आपल्या भारतात आज २२८ जातीचे सर्प असून त्यातील ९२ जातीचे सर्प कमी अधिक प्रमाणात विषारी आहेत. बहुतेक सर्प झाडावर चढणे, पाण्यात पोहोणे, वेगात धावणे, क्षणार्धात थांबणे, उसळी मारून हला करणे आदि कामे करीत असतात. अन्नाशिवाय कित्येक महिने हे जगू शकतात. सामान्यतः हे सर्व सर्प (१) बिळात राहणारे, (२) झाडावर राहणारे, (३) पाण्यात राहणारे, (४) जमिनीवर राहणारे अशा चार प्रकारात मोडतात. यात विषारी तथा बिनविषारी सर्वच सर्प येतात.

सापाचे विष पिवळसर, काळपट, स्वच्छ पांढरे, तांबूर छटा असलेले असे भिन्न भिन्न असते. ही सर्व विषे किंचित दाट तथा चव, वास नसलेली असतात. ही सर्व विषे मानवी उपयोगासाठी वापरण्याची प्रथा अतिप्राचीन आहे. बहुदा तप्त सूर्याच्या उष्णतेत (उन्हाळ्यात) यांच्या विषग्रंथी अधिक जोमाने कार्य करतात म्हणून या काळात सापात अधिक विष आढळते. प्राचीन काळी कुष्ठरोग, स्नायु व्याधि, संधि (सांधे) व्याधि, शस्त्रक्रियेतून जन्मलेल्या व्याधि, फेफरे, मस्तक शूळ, असाध्य रोग यांचेवर सर्पविषाचे प्रयोग केले जात तथा या व्याधि पूर्णपणे बऱ्या होत असत. काही काही सर्पांच्या विषात रक्ताच्या गुठळ्या बनविण्याची शक्ति असते. अधिक रक्तस्त्राव थांबविण्यासाठी अशांचा उपयोग होत असे. विशेषतः गर्भाशय, डोळ्याचे बुब्बुळ यांचा रक्तस्त्राव थांबविण्यासाठी हा उपयोग करीत असत.

फेफरे, दमा, संधिवात, उसण, पाणथरी (प्लीहा), पाठीचे मणके, निद्रानाश आदिंवर रॅटल नावाच्या जातीच्या सापांचे विष उपयोगी आहे असे लक्षण चिकित्सा – (होमियोपॅथी) शास्त्राचे म्हणणे आहे. सर्पचरबी, तेल, सर्पाचे मणके, त्याच्या विषग्रंथी, त्याची कातडी यांचाही उपयोग अतिप्राचीन काळापासून भिन्न भिन्न मानववंश करीत आलेले दिसतात.


## देणगीदारांस खूषखबर !

श्री साईबाबा संस्थान, शिरडी या संस्थेस देणगी देणाऱ्या देणगीदारांसाठी एक आनंदाची बातमी आहे. आयकर कायद्याच्या कलम नं. १० (२३-सी) (व्ही) अन्वये आता देणगीदारांनी दिलेल्या देणगीच्या रकमेवर आयकर माफी मिळणार आहे. याची कृपया देणगीदारांनी नोंद घ्यावी.

**अध्यक्षा**

श्री साईबाबा संस्थान, शिरडी



# सोठेवाड्यातील सोठेंचा साई-अनुभव

माझ्या प्रथम पत्नीपासून मला एक मुलगी झाली होती. मी वयाच्या चवेचाळीसाव्या वर्षी विधुर झालो. माझ्या पुष्कळ इष्टमित्रांमध्ये कोपरगावचे मामलेदार बर्वे यांचाही समावेश होतो. मी दुसरे लग्न करावे, असा आग्रह माझे मित्र करीत होते. माझ्या वंशवृद्धीसाठी पुत्राची जरूरी होती, पण पन्नाशीकडे आल्यावर पुन्हा लग्न करायचा विचार जरा अप्रस्तुत वाटत होता आणि त्यातच मला मुलगा होईल, याचा भरंवसा कोण देणार? म्हणून मी मित्रांना सांगितले की एखाद्या सत्पुरुषाने दुसऱ्या लग्नाला संमती देऊन आशीर्वाद दिला तरच मी दुसरे लग्न करीन.

सन १९०४ च्या एप्रिल महिन्यात मी बर्वे मामलेदारांबरोबर शिरडीत जाऊन बाबांचे दर्शन घेतले. थोड्या वेळाने मी उठून मशिदीच्या पायऱ्या उतरत असताना बर्वे बाबांना म्हणाले,

''साहेबांना (पुढे बाबा मला नेहमीच 'साहेब' या नावाने हाक मारीत असत.) मुलगा नाही.''

बाबा म्हणाले,

''शादी करेगा तो अच्छा बच्चा देगा!''

बाबांचे हे शब्द मी स्वत: ऐकले. त्यानंतर माझ्या मित्रांचा लग्नाबद्दल पुन्हा आग्रह सुरू झाला, पण योग्य वधु मिळायला थोडा वेळ लागणार होता. तेथून मी पुन्हा नगरच्या कामावर जाऊन हजर झालो. त्या वर्षाच्या अखेरीला मी पुण्याला एक नामांकित ज्योतिषी आला आहे, असे ऐकले. मी पुण्याला त्याला माझी पत्रिका दाखविली. ती पाहून त्याने माझ्या व मुलीच्या गतआयुष्यातील घटना बरोबर सांगितल्या आणि मला पन्नाशीनंतर पुत्र-प्राप्तीचा योग

आहे, असेही सांगितले. ते ऐकून माझ्या लग्न करण्याच्या विचाराला बळकटी मिळाली. यानंतर थोड्याच दिवसांत माझी अहमदाबाद येथे बदली झाली. मी तेथे असताना गणेश दामोदर उर्फ दादा केळकर यांचे मला पत्र आले की त्यांच्या उपवर कन्येसाठी आमच्या आजूबाजूला योग्य स्थळ मिळेल काय? पण तिकडे कोणीच नसल्याने मला असे वाटले की दादा केळकरांना वर म्हणून मीच अभिप्रेत नसेल ना? कदाचित याच्यामागे बाबांची प्रेरणाही असावी. मग मी उत्तर लिहिले की इतक्या दूर स्थळ मिळणे अवघड आहे, पण जर ते माझा विचार करायला तयार असतील, तर माझे वय, हुद्दा वगैरे लक्षात घेऊन त्यांनी पूर्ण विचारांती निर्णय घ्यावा. त्यावर त्यांचे उत्तर आले की सर्व बाबींचा विचार करूनच ते मला जावई करून घ्यायला तयार आहेत. मग त्यांना मी असे कळविले की त्यांनी मुलीला बरोबर घेऊन शिरडीला जावे व बाबांचे दर्शन घ्यावे आणि बाबांची या विवाहाला संमती विचारावी. पण तेव्हा दादा केळकरांचे मत बाबांविषयी कलुषित असल्याने त्यांचे असे म्हणणे पडले की मी वाईला जाऊन एखाद्या ब्राह्मण संताला याविषयी विचारावे. कारण त्यांना अशी भीती वाटत होती की बाबा या लग्नाला संमती देणार नाहीत. यावर मी त्यांना निक्षून कळविले की याबाबतीत बाबांचाच शब्द अखेरचा मानला जाईल. मग नाईलाजाने दादा केळकर मुलीला घेऊन शिरडीला बाबांच्या दर्शनाला गेले. सोबत त्यांनी माधवरावांना घेतले होते. मुलीला पाहून बाबा लगेच म्हणाले,

"मुलीला अहमदाबादला पाठवा."

अशारीतीने बाबांची संमती मला कळविण्यात आली व सन १९०५ साली, म्हणजे वयाच्या पन्नासाव्या वर्षी माझा दुसरा विवाह झाला. सध्या मला एक मुलगा व इतर मुली आहेत.

साठेवाडा: बाबांना प्रिय असलेल्या निमवृक्षाजवळ एक जुनी तटबंदीसारखी भिंत होती. बाबांनी मला सांगितले की भिंत पाडून टाक व नवी बांध. ते ऐकून मी मनात म्हणालो की सबंध गावाला तटबंदी बांधून द्यायला मी कोणी संस्थानिक नाही. म्हणून मी स्वस्थ बसलो. मग माझ्या लक्षात आले की बाबांच्या मनात मी तेथे राहण्यासाठी एक वाडा बांधावा व त्यासाठी त्या भिंतीचा उपयोग करून घ्यावा असे आहे. मग मी ती जमीन विकत घेतली आणि त्या भिंतीच्या आधारे निमवृक्षाभोवती एक चौसोपी वाडा बांधला.

त्या निमवृक्षाजवळ एक समाधी होती. त्याविषयी बाबा म्हणाले,

"ती माझ्या गुरुची आहे व त्याचे नाव...."

हे नाव मला नीट ऐकू आले नाही. त्याचे शेवटचे अक्षर 'शाह' किंवा 'स्त' असे काहीतरी होते. कदाचित 'वेंकूसा'ही असेल.

मी एकदा शिरडीला जाऊन बरेच दिवस राहिलो होतो. तेव्हा बाबांची आरती व पूजा सुरु झाली होती. त्यावेळी गुरुपौर्णिमा साजरी केली जात नव्हती. एके दिवशी बाबा माझ्या श्वशुरांना म्हणाले,

"आज गुरुपौर्णिमा आहे, तुला माहीत नाही का? पूजेचे सामान घेऊन ये व तुझ्या गुरुची पूजा कर!"

मग त्या दिवशी आम्ही सर्वांनी बाबांची पूजा करून उत्सव साजरा केला. तो उत्सव अद्याप चालू आहे. बाबांनी मला 'हरीबा' या नावाने कधीच हाक मारली नाही. ते मला नेहमी 'साहेब' या नावानेच हाक मारीत.

संतकथामृतात एके ठिकाणी अशी हकिकत आहे की माझ्या व इतर अनेक भक्तमंडळींच्या समोर साधना, चतुष्टय, विवेक, वैराग्य, मुमुक्षत्व आणि ब्रह्मात्रे स्वरूप इत्यादींवर बाबांनी सखोल विवेचन केले. पण ही हकिकत तितकीशी काही खरी नाही. माझ्यादेखत बाबा अशा विषयांवर कधीच बोलले नाहीत. इतरांसमोर बोलले असतील तर ते मला माहीत नाही. तसेच भक्तिलीलामृताच्या ३१व्या अध्यायात श्लोक २१९ ते २३१ यात माझ्या लग्नाविषयी दिलेली माहिती अगदी बरोबर आहे असे नाही. ती लिहिल्यानंतर मला दाखविण्यात आली नव्हती. मी वर जी लग्नाची हकिकत दिली आहे, ती अगदी बरोबर आहे. माझे लग्न बाबांच्यामुळे झाले व सन १९०५ पासून माझ्या मनोवृत्तीत जो बदल घडून आला तो त्यांनी घडवून आणला आणि आजपावेतो त्यांचे कृपाछत्र माझ्यावर आहे, अशी माझी खात्री आहे. वाडा बांधल्यावर (१९०६ ते १९१६) मी माझ्या सासऱ्यांना माझ्या पत्नीबरोबर तेथे रहायला सांगितले. यामुळे पुष्कळ विघ्नसंतोषी, मत्सरी लोकांचे शत्रुत्व मी ओढवून घेतले. बाबांची कृपादृष्टी आमच्यावर नसती तर आम्हाला तेथे राहणे अगदीच अवघड झाले असते. बाबांनी हस्तक्षेप केल्याने मी अनेक वेळा कठीण प्रसंगांतून बचावलो. उदाहरणार्थ: १९०९ ते १९१० च्या सुमाराला रेव्हिन्यु कमिशनर मिस्टर कर्टीस व नगरचे कलेक्टर यांच्याबरोबर मी एका कमिटीवर होतो. आम्ही तिघे मनमाड येथे एकत्र येऊन अन्य ठिकाणी मुक्काम करणार होतो. आदल्या दिवशी मी शिरडीत असल्याने बाबांकडे निरोपाची परवानगी मागायचे ठरविले. सरकारी काम होते म्हणून ती सहज मिळेल असे मला वाटले होते. माझ्या सासऱ्यांना बाबांकडे परवानगीसाठी पाठविले, पण बाबांनी परवानगी दिली नाही, असे सासऱ्यांनी येऊन सांगितले. यावर मी त्यांना म्हणालो,

"इतक्या महत्त्वाच्या सरकारी कामात मी चुकारपणा केला, तर एखादे वेळी माझी नोकरीसुद्धा जाईल. तुम्ही पुन्हा परवानगीसाठी प्रयत्न करा."

बाबांनी त्यानंतरही परवानगी नाकारली, एवढेच नव्हे तर ते सासऱ्यांना म्हणाले,

"त्याला येथून जाऊ देऊ नको. वाटलेच तर खोलीत कोंडून ठेव."

यानंतर तीन दिवस झाल्यावर मला मनमाडला जाऊ दिले. मनमाडला पोहचल्यावर असे कळले की कमिटीचे इतर सदस्यही तेथे आले नव्हते. कारण सभेची तारीख पुढे ढकलली गेली होती. आमच्या पहिल्या वेळापत्रकाप्रमाणे मी माझा तंबू व सामान मनमाडहून पुढील कॅम्पवर पाठविण्याची ताकीद दिली होती. पण रेल्वे-खात्याच्या हलगर्जीपणामुळे माझा तंबू व सामान मनमाडलाच होते. परिणामी माझा

शिरडीत मुक्काम वाढला. त्यामुळे मला जरी मनस्ताप झाला, तरी एकंदरीत पुढील दगदग टळून कुटुंबियांचा व बाबांचा सहवास मिळाला, हे काय थोडे झाले! त्या काळात बाबा पुढच्या-मागच्या विचार करून सूत्रे कशी हलवित याचा दाखला मिळून त्यांच्यावरील माझी श्रद्धा द्विगुणित झाली. माझ्या नोकरीत माझी योग्यता असूनही मला बढती मिळत नव्हती. मी नाराज होतो. याबद्दल मी बाबांकडे तक्रार करून म्हणालो की बढती मिळाली नाही तर राजीनामा देऊन मोकळा होईन. बाबांनी मला तसे करायला मना केले व बढती मिळेल, असे सांगितले. यानंतर काही महिन्यांतच माझ्यापेक्षा ज्याची जास्त नोकरी झाली होती त्याला डावलून कोल्हापूरला माझी ॲक्टींग सुप. लँड रेकॉर्डस् म्हणून नेमणूक झाली आणि शंभर रूपये पगारवाढ मला मिळाली. पेन्शनच्या वेळीही अडचणी आल्याच. अगोदर असलेले डे. कलेक्टरपद हीच कायम केलेली नोकरी असे धरून या वेतनश्रेणीवर माझी पेन्शन ठरविण्यात आली होती. मी त्याहीपेक्षा वरच्या जागेवर केलेल्या कामाची दखल घेण्यात आली नव्हती. त्यामुळे पेन्शनमध्ये ५० रुपयांची कपात झाली. अर्थातच याविरुद्ध मी अपील केले व बाबांना सर्व हकिकत सांगितली. बाबा म्हणाले,

''तुला ५० रुपये जास्त मिळतील व अल्ला मालिक मदत करील.''

मग मी तत्कालीन रेव्हिन्यु कमिशनर कर्टीस साहेब यांच्याकडे अपील केले व त्यांच्या शिफारशीवरून मला पूर्ण पेन्शन मिळाली. यातून हे सिद्ध होते की बाबांचे मनावर नियंत्रण असून ते घटनाही घडवितात.

**मेघासंबंधी:** मी विरमगावला डे. कलेक्टर असताना मेघा नावाचा कट्टर शिवभक्त व स्वभावाने सरळ असा ब्राह्मण तेथे रहात होता. त्याला गायत्री येत नसे, पण 'नम: शिवाय'चा अखंड जप तो करीत असे. मला त्याच्याबद्दल आपुलकी वाटू लागल्याने मी त्याला संथा व गायत्रीची संध्या मिळवून दिली. भडोच शहरातल्या एका शिवालयात मी त्याला पूजेसाठी आठ रुपये खर्चाला देऊन पाठविले. तो शिवपूजा एका पायावर उभा राहून करीत असे. मी त्याला सांगितले की शिरडीचे साईबाबा हे एक मानवरूप धारण केलेले परमेश्वर आहेत, म्हणून शिरडीला जा. पण भडोच स्टेशनवर त्याच्या कानी आले की साईबाबा मुसलमान आहेत. हे ऐकल्याबरोबर त्याच्या कट्टर सनातनी मनाला मुसलमानाच्या पाया पडण्याची कल्पनाच असह्य झाली व तो शिरडीला न पाठविण्याबद्दल गयावया करू लागला. त्याचे काहीएक ऐकून न घेता त्याला मी बजावले की तुला शिरडीला गेलेच पाहिजे व त्याच्याजवळ माझ्या सासऱ्यांना मेघाला बाबांकडे घेऊन जाण्याबद्दल चिठ्ठी दिली. शिरडीला गेल्यावर मशिदीत तो प्रवेश करणार इतक्यात बाबांनी रौद्रावतार धारण करून शिव्यांचा भडिमार केला. मेघाला बघितल्यावर ते ओरडले की या बदमाशाला हाकलून द्या व नंतर अर्ध्याकच्च्या माणसाला त्यांच्याकडे पाठविल्याबद्दल माझीही हजेरी घेतली. मेघा मग तेथून त्र्यंबकेश्वरी जाऊन तेथे पूजा-अर्चा करीत दीड वर्ष राहिला आणि पुन्हा शिरडीला आला. त्यावेळी माझ्या सासऱ्यांच्या मध्यस्थीने त्याला बाबांचे दर्शन मिळाले व तो तेथेच राहिला. बाबांनी त्याला मंत्रोपदेश वगैरे दिला नाही, पण आपल्या अपूर्व शैलीने त्यांनी त्याला अंतर्बाह्य बदलवून टाकले. १९१२ मध्ये त्याचे निधन होईपर्यंत तो बाबांची माध्यान्ही व संध्याकाळी एका पायावर उभा राहून आरती करीत असे. बाबा त्याच्या अंतिम यात्रेला उपस्थित होते. त्याच्या देहावर त्यांनी आशीर्वादात्मक क्रिया करून सांगितले,

''हा माझा खरा भक्त होय!''

त्याच्या क्रिया-कर्माच्या वेळी बाबांनी आपल्या खर्चाने ब्राह्मणांना भोजन घातले. त्याची व्यवस्था काकासाहेब दीक्षितांकडे सोपविली होती.

**शिरडी सोडून पुणे येथे प्रयाण:** बाबांच्या राजेशाही चावडी मिरवणुकीला मी बाबांचा वेत्रधारी बनून त्यांच्यापुढे चालत असे. त्यामुळे पुष्कळांना माझा हेवा वाटत असे. त्या ठिकाणी काही गावगुंडांनी संगनमत करून मला हाकलून देण्याच्या बाबतीत नानावल्लीची मदत घेण्याचे ठरविले. एके दिवशी मिरवणुकीला नाना फुटलेल्या काचेच्या अणकुचीदार टोकाने माझ्या मानेवर ओरखडे काढू लागला. म्हणून स्वसंरक्षणार्थ मी मागे वळलो. त्याला रस्त्याच्या बाजूला असलेल्या ओंडक्यावर पाडून दाबून धरले. बाबा मोठ्याने ओरडले,

''साहेब, तसे करू नकोस.''

यानंतर मात्र मी शिरडीत वारे कसे वहात आहेत, हे बघून सावधगिरीने राहू लागलो. एके दिवशी बाबांना नैवेद्य दाखविण्यासाठी मी घरातून निघालो. इतक्यात माझे सासरे धावत येऊन मला म्हणाले,

''तुम्ही तिकडे जाऊ नका, कारण नानावल्ली मशिदीच्या दारातच तुमचा खून करण्याच्या उद्देशाने हातात कोयता घेऊन उभा आहे.'' हे ऐकल्यावर मी कोणाचाही निरोप न घेता शिरडी कायमची सोडून निघून गेलो. यात मी शिरडीला जास्त राहू नये, ही बाबांची इच्छा असेल, असे वाटते. नानावल्लीच्या हल्ल्यापासून बाबांनी संरक्षण न केल्याने बाबांचा नाद सोडून द्यावा, असे मला अनेकांनी सांगितले. मी त्यांना म्हणालो,

''हाच न्याय पंढरपूरच्या विठ्ठलालाही लावता येईल. कारण गायकवाडीतले वकील गंगाधर शास्त्री हे निष्ठावान विठ्ठलभक्त असल्याने जीव वाचविण्यासाठी पंढरपूरला विठोबाच्या देवळात येऊन राहिले होते, पण त्या देवळात विठ्ठलासमोर त्यांचा खून करण्यात आला. माझ्या मते, मी शिरडी सोडून पुण्यात स्थायिक होणे, हेच माझ्या हिताचे असावे. शिरडीप्रमाणे येथेही बाबांची माझ्यावर पूर्ण कृपा आहे.''

सन १९१६ साली पुण्याजवळ कोथरूडला माझ्या काही मांग नोकरांनी तंबू ठोकला. एका औदुंबराच्या झाडाला दोरांनी बांधून तेथे काम केले. मला हे माहीत नव्हते, पण काही दिवसांनी अनिष्ट घटना घडू लागल्या. चौकशीअंती खरी परिस्थिती कळली. म्हणून सहाय्यार्थ बाबांची प्रार्थना केली. तेव्हा बाबांनी ह्या औदुंबराचे शुद्धीकरण वगैरे करून तेथे एका ब्राह्मणाकरवी दत्त-पादुका करून घेण्यास

सांगितले. त्याप्रमाणे मी केले व पादुकांच्या नित्य पूजेसाठी एका ब्राह्मणाची नेमणूक केली.

**६-८-३६ व २८-८-३६:** बाबांनी माझ्या स्वभावाचे वर्णन अगदी मोजक्या शब्दात केले होते. ते म्हणाले,

"साहेब साधा, भोळा व रांगडा माणूस आहे."

ते इतरांना शिव्या देत असत. माझ्याबाबतीत असे कधीच घडले नाही. फक्त एकदाच त्यांनी मला मारण्याची धमकी दिली होती. त्यावेळी माझा अपराध होता, हे मला मान्य आहे. एके दिवशी शिरडीतल्या मुक्कामात माझ्या घरी चातुर्मास साजरा करावयाचे ठरवून माझे सासरे सोडून इतर सर्वांना मी भोजनाला बोलावले. सासऱ्याशी माझे बिनसल्यामुळे व आम्ही वेगळे रहात असल्याने मी तसे केले. बाबांना आमंत्रण देण्यासाठी जेव्हा मी मशिदीत गेलो, तेव्हा बाबा एकदम ओरडले,

"काठी आणा रे!"

मी एकदम स्तब्ध झालो. लागलीच शांत होऊन ते म्हणाले,

"बरं! मी येतो."

त्या दिवशी माझ्याकडून आणखी एक चूक झाली होती. एका मारवाड्याच्या व्यवहारात मी मध्यस्थी करावयास गेलो होतो. ते बाबांना आवडले नव्हते. बाबांच्या हातचा मार न खालेला मी एकच भक्त आहे, अशी मी जेव्हा फुशारकी मारली, तेव्हा माधवराव देशपांड्याने बाबांना यासंबंधी विचारले, बाबा म्हणाले,

"मी कशाला त्याला मारू? त्याच्या सासऱ्याकडून भरपूर मार त्याला मिळत आहेच."

माझे सासरे या ना त्या कारणाने सतत माझ्याकडून खंडणी वसूल करीत होते. त्याला उद्देशून बाबा म्हणत असावे. बाबांची मला मिळालेली आध्यात्मिक शिकवण अशातऱ्हेची होती की त्यामुळे गर्विष्ठपणा, अधिकाराचा मद आणि इतर कुविचारांना मनात थाराही मिळू नये. याची काही उदाहरणे पुढे देत आहे.

माझ्या वाड्याच्या पायाभरणी समारंभ ज्या दिवशी होता, तो दिवस मला माहीत नव्हता, पण पौर्णिमा निश्चित ठरली होती. म्हणून मी व बेहेरे आदल्या दिवशी शिरडीला यायला निघालो, पण कोणालाही कळविले नव्हते. कोपरगावलाच संध्याकाळ झाली होती. शिरडीला पोहचायला उशीर झाला, तर रात्री बाबांचे दर्शन मिळणार नाही, म्हणून बेहेरे यांनी कोपरगावलाच मुक्काम करायला सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही निघालो व शिरडीला आलो, तर बाबा लेंडीहून परत येत होते. त्यावेळी ८०/९० मंडळी त्यांची वाट पहात होती. आम्ही जाऊन बाबांचे चरणवंदन केले. बाबा म्हणाले,

"साहेब, वेळेवर आलास. आज पायाभरणी करायची आहे."

हे ऐकून मला असे वाटले की एक छोटासा समारंभ करावयाचा आहे, म्हणून मी खोदण्यासाठी कुदळ घेऊन आलो. ते पाहून बाबा लगेच म्हणाले,

"तू का तिकडे जातोस? आपल्याला ह्या गोष्टींशी काय करायचे आहे? गवंडी व मजूर ते काम पूरे करतील."

अशारीतीने पाया-भरणी पार पडली. माझ्या सासऱ्यांनी मला सांगितले की मी येणार, हे आदल्याच दिवशी त्यांना कळले होते.

बेहेरे यांनी कोपरगावला मला थांबायला सांगितले, हे एकप्रकारे बरेच झाले. निकटच्या नातेवाईकाचा मृत्यू झाल्याने माझ्या श्वशुरांना आदल्या दिवशीपर्यंत सूतक होते व त्यातच स्त्रियांचे जोरजोरात रडणे चालू होते. स्वयंपाक करण्यारसही कोणी नव्हते. भक्तमंडळी शिरडीला किंवा बाहेरगावी असली तरी बाबांची नजर त्यांच्यावर सतत असते, याचा अनुभव मला आला. मी वेळेवर आवरला गेलो नसतो तर रागाच्या भरात एक क्रूर कृत्य माझ्या हातून घडले असते. मी शिरडीला किंवा आजूबाजूला २० एकर शेतजमीन विकत घ्यावी, असे माझ्या सासऱ्यांच्या मनात होते. म्हणून मी १२०० रुपये पाठविले व त्यांनी ती जमीन घेतली. मी शिरडीला असताना ती समक्ष पहायचे ठरविले, पण माझे सासरे माझ्याबरोबर येईनात, इतकेच नव्हे तर माझ्या तिकडे जाण्यातही अडचणी निर्माण करू लागले. त्यांच्या अशा वागण्याचे कारण हे होते की त्यांचा पुतण्या कै. बाबूची पत्नी त्यांच्याकडे रहात होती. तिला जमिनीबद्दल कळले तर ती हक्क सांगू शकेल. मी जाण्याचा मात्र ठाम निश्चय केला होता व तात्या पाटलाची बैलगाडी मागविली होती. प्रथम माझी पत्नी माझ्याबरोबर यायला तयार होती, पण वडिलांनी कानमंत्र दिल्यामुळे तिने नकार दिला. माझे मस्तक भडकले. मी गाडीवानाकडून त्याचा चाबूक मागून घेतला व बायकोला फटके मारण्याची तयारी केली. इतक्यात मेघा धावत वाड्यात आला व त्याने मला सांगितले की बाबांनी काही जरूरीच्या कामासाठी तावडतोब मशिदीत मला बोलाविले आहे. त्याप्रमाणे मी गेलो. बाबांनी विचारले,

"काय चालले आहे? काय कारण घडले आहे?"

मी लगेच भानावर आलो व बाबांपासून काहीही लपून रहात नाही, हे कळले. सासरे आणि पत्नी दोघांचेही बरोबर होते, असे बाबांच्या शब्दांतून ध्वनित झाले. कारण ते म्हणाले,

"तुझी जमीन तेथे आहे. तेथे जाऊन डोळ्यांनी बघण्याची काय जरूरी आहे?"

एके दिवशी केवळ कुतूहलापोटी बाबांच्या एका स्त्रीभक्ताकडे जावे, असा मी बेत केला. तिकडे जाण्यापूर्वीच बाबांनी मला विचारले,

"तू गावात अमुक अमुक ठिकाणी गेला होतास का?"

पण त्या जागेचे नाव माहीत नसल्याने बाबांच्या प्रश्नाचा रोख तसा काही ध्यानी आला नाही. मग बाबांनी तो विषय तेव्हढ्यावरच सोडला. मी नंतर तिच्या घरी गेलो व आमचे बोलणे सुरू झाले. लगेच माझ्या मनात विषयवासनेचे थैमान सुरु झाले. इतक्यात बंद असलेले दार उघडले गेले. मी पहातो तो बाबा समोर उभे! त्यांनी अशा काही खुणा केल्या, ज्याचा अर्थ होता–

"वा साहेब! काय धंदे चाललेत!"

आणि मग ते अदृश्य झाले. त्यांचा वेळेवर इशारा मिळाला नसता, तर माझ्या हातून निश्चित गैरवर्तन घडले असते. पण लगेच सद्सद्विवेकबुद्धी जागी झाली आणि मी ते घर सोडून जो निघालो, तो पुन्हा कधी तिकडे गेलो नाही. काही दिवसांनी असे कळले की मी तिकडे निघण्यापूर्वी बाबांच्या तोंडातून जे नाव आले होते, त्याच नावाने ती जागा ओळखली जात होती. आपल्या भक्ताचे आचरण शुद्ध असावे, याबद्दल बाबा किती जागरूक असत, याचे हे उदाहरण आहे.

माझ्या वाड्याची पाया-भरणी झालेली हकिकत वर आलीच आहे, पण जेव्हा बांधकाम सुरु होऊन भिंती उठू लागल्या, तेव्हा बाबांच्या प्रिय निमवृक्षाच्या फांद्या आड येऊ लागल्या. त्या फांद्या छाटून टाकल्याशिवाय कामाची प्रगती झाली नसती, पण अशा पवित्र वृक्षाच्या फांद्या छाटायला कोणालाही धीर होईना. मग आम्ही बाबांना विचारले. ते म्हणाले,

"बांधकामाच्या आड येणाऱ्या फांद्या छाटून टाकाव्या. गर्भाशयात मूल आडवे आले तरी तेसुद्धा कापावे."

पण बाबांची परवानगी मिळूनही कामगारांची फांद्यांना हात लावण्याची छाती होईना. मग बाबा स्वत: उठून आले व त्यांनी ते अडथळे छाटून दूर केले. त्यानंतर वाड्याला माडी बांधली व बाबांच्या गुरुस्थानासाठी एक मोठे कोनाड्यासारखे बांधून घेतले. दासगणूंचे संतकथामृत लिहिले जाऊन ते छापण्याची वेळ आली, तेव्हा बाबांनी मला ७५ रुपयांचे अर्थसहाय्य दासगणूंना करायला सांगितले. आपल्या भक्तांकडून ते सत्कार्यासाठी दानधर्म करवून घेत असत.

माझ्या लग्नानंतरसुद्धा मला पहिल्या दोन मुलीच झाल्या. मग माझे सासरे व सासूबाई दोघेही बाबांकडे गेले. त्यांना त्यांनी विचारले,

"बाबा, आम्हाला नातू केव्हा होणार?"

बाबा म्हणाले,

"मी सतत देवाला विनंती करीत आहे. देव माझे ऐकेल."

मग १९१३ साली मला मुलगा झाला. सध्या तो माझ्याजवळ सुखरूप आहे व माझा पुढचा आधार आहे. मी निवृत्त झाल्यावर काही कालावधीनंतर माझी स्थिती खालावली होती. अशा एका प्रसंगी मी पत्नीचा दागिना विकला. त्यावेळी बाबा माझ्या सासऱ्यांना म्हणाले,

"या मूर्ख साहेबाने माझ्या मुलीचा दागिना का विकला?"

**बाबांचा लाडका बाबू:** मी एकदा कोपरगाव व येवला तालुक्याचा असि. सुप. रेव्हिन्यु सर्वे म्हणून काम करीत असताना माझ्या हाताखाली लिमये काम करीत होते. त्यांच्या हाताखाली माझ्या सासऱ्याचा पुतण्या बाबू हा मोजणीदाराचे काम करीत असे. पण त्या कामाकडे दुर्लक्ष करून तो शिरडीला जाऊन बाबांच्या सेवेत मग्न असे. त्याची वारंवार व सतत गैरहजेरी असे. याबद्दल लिमयांनी माझ्याकडे तक्रार केली. ही तक्रार माझ्या सासऱ्यांच्या कानावर घातल्यावर ते म्हणाले,

"काय करायचे? बाबू बाबा सांगतील तसे करतो."

पण थोड्याच दिवसात काय घडणार, हे माहीत असल्याने बाबा म्हणाले,

"त्याची नोकरी गेली खड्डयात! त्याला माझी सेवा करु दे!"

आणि बाबूही निरंतर त्यांच्या सेवेत असे. आलेल्या नैवेद्यापैकी उत्तमोत्तम पक्वान्ने बाबा त्याच्यासाठी काढून ठेवीत व त्याला खाऊ घालीत, हे बघितल्यावर लिमये यांनी त्याला मोकळीक दिली. १९१० साली बाबूचा अंतसमय निकट आला. बाबांकडे नैवेद्याच्या आंब्यांचा ढीगच्या ढीग साचत असे. त्यावर बाबू मुक्तहस्ताने ताव मारीत असे. बाबांनी माझ्या सासऱ्यांना विचारले,

"अरे! तो आहे काय?"

काही दिवसांत पत्नीला मागे ठेवून वयाच्या २२ व्या वर्षी बाबूचे निधन झाले.

बाबांनी गुरुमंत्र कुणालाच दिला नाही. त्यामुळे मी तो घेण्याचा प्रश्नच नव्हता. इतर संतांकडून उपदेश घेण्याचे योग मात्र आले होते. उपासनीबाबा खरगपूर व मिरजेहून शिरडीला आल्यावर त्यांनी मला पंचदशीच्या विवरणाबद्दल विचारले. खरगपूर व नागपूरचे लोक येऊन त्यांच्याकडून उपदेश होत होता. मी त्यांच्याकडे जाऊन उपदेश घ्यावा की नाही, हाच प्रश्न होता. सांगोळ्याच्या अठाबाई नावाच्या संतीण होत्याच. त्यांच्याकडून माझ्या प्रथम पत्नीने उपदेश घेतला होता. मोरगावचे प्रसिद्ध गणपतीभक्त विनायक महाराज फाटकही होतेच. त्या सर्वांनी मला उपदेश देण्याची तयारी दाखविली होती. याबाबतीत मी स्वत: बाबांना विचारले होते व सासऱ्यांकरवीही विचारले होते, पण प्रत्येक वेळी बाबांनी नकार दिला. सुरुवातीला बाबांच्या सहवासात असताना बाबा कधी कधी यथासांग पूजा करून घेत, तर कधी घेत नसत. त्यांनी मला व माझ्या सासऱ्यांना सांगून सर्व भक्तांकडून एकाच वेळी गुरुपूजन करून घेण्याचा परिपाठ सुरू केला होता, पण शिवरात्रीच्या रात्री बाबांना शिवस्वरूप मानून पूजा करायला त्यांनी मना केले. म्हणून मी व मेघाने मिळून असे ठरविले की मध्यरात्री मशिदीच्या पायऱ्यांची पूजा करायची, म्हणून रात्री बिल्वपत्र वगैरे घेऊन आम्ही मशिदीत गेलो, तोच तात्याबा पाटलांनी आतून निघून जाण्याबद्दल इशारा केला, पण बाबांना झोप लागली आहे, अशा भावनेने आम्ही गंध-फूल व बिल्वपत्र पायरीवर ठेवले. इतक्यात बाबांनी जागे होऊन कोणाचेही नाव न घेता शिव्यांचा वर्षाव सुरू केला. त्या आरडाओरडीने सबंध गाव जागा झाला व मशिदीत लोक जमा झाले. त्या सर्वांनी बाबांची आज्ञा न जुमानता रात्री गुपचूप येऊन पूजेचे पुण्य लाटण्याच्या आमच्या विचाराचा धिक्कार केला. बाबांनी इतर संतांकडून उपदेश घ्यायला मला परवानगी दिली नाही तरी सत्पुरुषांचे दर्शन घ्यायला मला उत्तेजन दिले. इतकेच नव्हे तर एका संताला माझ्या घरी यायला भाग पाडले. त्यावेळी काका महाराज धोपेश्वरकर हे कोकणातले प्रसिद्ध संत होते. २५ वर्षापूर्वी

(१९११ साली) ते पुण्याला येऊन देवळे यांच्याकडे उतरले. तेथे भक्तांनी त्यांना गराडा घातला आणि प्रत्येकजण त्यांना आपल्या घरी भोजनाचे आमंत्रण देऊ लागला. त्यात मीही होतो, पण माझ्या आमंत्रणाचा स्वीकार करू शकत नाही, असे महाराज म्हणाले. ही सकाळची गोष्ट, पण नंतर मी आमच्या ऑफिसात बसलो असताना महाराजांनी निरोप पाठविला की ते आमच्या घरी येत आहेत. हे ऐकून मला आश्चर्य वाटले. मग मी त्यांना माझा टांगा पाठविला व त्यांच्या स्वागतासाठी घरी गेलो. घरी दर्शन घेतल्यावर विचारले,

''महाराज, सकाळी येत नाही, असे म्हणालात व आता आलात कसे?''

समोरच्या भिंतीवर टांगलेल्या बाबांच्या फोटोकडे बोट दाखवून महाराज म्हणाले,

''मी तुमच्याकडे येईपर्यंत त्यांनी माझा पिच्छा पुरविला.''

महाराजांनी देह ठेवण्याच्या सुमाराला माझ्या जावयाचे बंधु हरी गंगाधर जोशी व आणखी एकाला साईबाबांच्या दर्शनाला पाठविले. काका महाराजांनी देह ठेवल्यावर ते शिरडीला निघाले. मशिदीत गेल्यावर बाबांचे उग्र स्वरूप बघून थोड्या अंतरावरच ते उभे राहिले. बाबांचे त्यांच्याकडं लक्ष गेल्यावर बाबांनी त्यांना बोलावून घेतले. तोपर्यंत बाबा शांत झाले होते. म्हणून ह्या दोघांनी बाबांचे दर्शन घेतले. थोड्या वेळाने बाबा भिक्षेस निघाले. निघताना ह्या दोघांना म्हणाले,

''त्या म्हाताऱ्याला मारून तुम्ही इकडे आलात काय?''

काका महाराजांनी देह ठेवल्याचे त्यांना कोणी सांगितले नव्हते. तरीपण संतांचा एकमेकांविषयी बंधुभाव कसा असतो, हे त्यांनी दाखवून दिले. वामनराव पटेलांनी लिहिलेल्या 'गुरुस्मृती' या पुस्तकात बाबांचा एक चमत्कार वर्णिलेला आहे. माझे जावई जोशी यांनी निघताना बाबांकडे उदी मागितली. तेव्हा बाबांनी त्यांना सांगितले,

''तुला नंतर मिळेल.''

त्यानंतर माझे जावई निघाले. आगगाडीत बसल्यावर लगेच शेजारी बसलेल्या प्रवाशाने बाबांच्या हातची उदी त्यांना दिली.

**दक्षिणा-भिक्षा-संस्था:** १९१५ च्या डिसेंबरमध्ये मी पुण्याला असताना बाबांकडून निरोप आल्याने मी शिरडीला गेलो. बाबांच्या सूचनेवरून दक्षिणा-भिक्षा-संस्थेची स्थापना केली. मला त्या संस्थेचे अध्यक्ष नेमण्यात आले. या संस्थेतर्फे आम्ही 'साईनाथप्रभा' नावाचे मासिक चालवित होतो. हे मासिक बाबांना मात्र वाचून दाखविले जात नव्हते. छापण्यापूर्वी त्यांची संमतीही आम्ही घेत नव्हतो. ते मासिक फार अल्पायु ठरले. त्याच्या प्रति मिळणे फार कठीण आहे. भाग १ व २ मात्र सध्या उपलब्ध आहेत. त्यात शिरडी संस्थानमध्ये १९१५ ते १९१८ पर्यंत काय परिस्थिती होती, याचा थोडासा वृत्तांत सापडतो. संस्थेचे आर्थिक व्यवहार कोणाच्या ताब्यात असावेत, यावरून माझ्याविरूद्ध अति कडवटपणा निर्माण होऊन त्यातूनच नानाविध प्रकरण उद्भवले. मला शिरडी सोडावी लागली. एकमेकांविरूद्ध कायदेशीर नोटीसाही देण्यात आल्या. संस्था स्थापन झाल्यानंतर सुमारे वर्षभरातच राधाकृष्णाआईचे निधन झाले. संस्थानला लागणारी सर्व सामग्री त्यांच्या ताब्यात असे. आईना कोणी वारस नसल्याने पोलिस येऊन त्यांनी आईकडे असलेल्या सर्व वस्तु ताब्यात घेतल्या. मग त्या सर्व चीजवस्तु परत मिळविण्यासाठी आम्ही संस्थेच्या वतीने पहिला वर्ग मॅजिस्ट्रेट, कोपरगाव यांना अर्ज केला. त्यांनी तपास करून सर्व मालमत्ता संस्थेस द्यावी, अशी ऑर्डर काढली. तरीपण संस्थेतील अंतर्गत धुसफूस वाढतच गेली. बाबांच्या चांदीच्या सजावटीच्या अलंकारांपैकी काही थोडे (ज्यांची किंमत फार अल्प होती.) गहाळ झाल्याचा फायदा घेऊन संस्थेतील काही लोकांनी जानेवारी १९१८ मध्ये मला कायदेशीर नोटीस पाठविली. मी याबाबत बाबांना विचारले, तेव्हा त्यांनी काही मुद्दे सांगून त्याप्रमाणे उत्तरे द्यायला सांगितले व माझ्यावर कोणतीही कारवाई होणार नाही असे आश्वासन दिले. त्याप्रमाणे मी नोटीशीला जबाब दिला व माझ्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. सुंदरराव नारायण हे 'साईनाथप्रभा'चे संपादक होते व पहिल्या भागात 'रामगीर' या टोपणनावाने त्यांनी बरेच लिखाण केले आहे. एकदा मी शिरडीला असताना मशिदीत गेलो. त्यावेळी नित्याप्रमाणे बाबा लेंडीवर जायची वेळ होती, पण बाबा मशिदीच्या भिंतीजवळ झोपून राहिले होते. नेहमीच्या वेळेपेक्षा एक तास जास्त उशीर झाला तरी बाबा उठेनात, म्हणून आम्ही सर्वांनी त्यांना विचारले,

''बाबा, लेंडीवर जायची वेळ केव्हाच होऊन गेली. तुम्ही निघत का नाही?''

त्यावर बाबा म्हणाले,

''अरे, माझा गजानन गेला.''


मग कोणीतरी शिरडीहून शेगावला पत्र लिहून विचारणा केली. त्याचे उत्तर आले की, बाबांनी इकडे जेव्हा उद्गार काढले, त्याचवेळी गजानन महाराजांनी शेगाव येथे देह ठेवला होता. सन १९१७ साली एकदा बाबा म्हणाले,

''टिळक येथे येणार आहेत.''

लोकमान्य येथे येण्याची काहीच शक्यता न दिसल्याने मला वाटले, बाबा वामन महाराज टिळक यांना उद्देशून तसे म्हणाले, पण दिनांक १९ मे १९१७ रोजी लोकमान्य शिरडीला येऊन त्यांनी बाबांचे दर्शन घेतले. बाबांच्या दर्शनामुळे त्यांचे कल्याण झाले. त्याचे श्रेय ते लीनतेने स्वत:कडे न घेता परमेश्वराने केले, असे म्हणत असत. तरी प्रत्यक्ष त्यांनी सूत्रे हलविल्यामुळे लोकांची कामे होत असत, याचा अनुभव मला आहे. उदाहरणार्थ: (१) माझ्या पेन्शनच्या बाबतीत त्यांनी अगदी खेडवळ तिखट भाषेत सांगितले होते की, माझ्या वरिष्ठांच्या छातीवर बसून मला पूर्ण पेन्शन मिळवून देतील. (२) नाशिक येथे डे. इन्स्पेक्टर ऑफ लँड रेकॉर्डसच्या हुद्द्यावर काम करीत असलेले दाजी हरी लेले एकदा बाबांच्या दर्शनासाठी शिरडीला निघाले होते. वाटेत कोपरगावला उतरल्यावर सहज लायब्ररीत गेले व तेथे सरकारी गॅझेट चाळीत

(पृष्ठ क्र. ४१ वर)

# ज्योतिष हे शास्त्र आहे काय?



सर्व वेदांमध्ये ज्योतिषविषयक कितीतरी महत्त्वाच्या सिद्धांतांचा उल्लेख दिसतो. सूर्याचा उदय-अस्त होत नाही. तथापि पृथ्वीच्या परिभ्रमणाने दिवस-रात्र होत असतात, असाही उल्लेख दिसतो. त्याकाळी यज्ञ-यागादि यांची अधिकता असल्याने नक्षत्र तथा कालनिर्णय यांचे ज्ञान सर्वसामान्य जनासही होते. ज्योतिष हे एक वेदांचे अंग मानले गेले होते. त्यामुळे ज्योतिषशास्त्राचे अध्ययन करणाऱ्यांस विशेष महत्त्व होते. इसवी सनाच्या पूर्वी 'वृद्धगर्गसंहिता' आणि जैन ज्योतिष पद्धती 'सुरीयपन्नति' 'अश्वललन सूत्र' 'पारस्करगुह्य सूत्र' महाभारत तथा 'मानव धर्मशास्त्र' वगैरे संग्रहात ज्योतिषविषयक अनेक महत्त्वांच्या सिद्धांतांचा उल्लेख दिसतो. इसवी सनाच्या सुरुवातीस विशेष पद्धतीने लिहिलेला परिपूर्ण ग्रंथ 'सूर्यसिद्धांत' तयार झाला. ज्यावर पंडित वराहमिहिराने 'पंचसिद्धांतिका' नावाचा ग्रंथ लिहिला. सध्या उपलब्ध असलेला सूर्यसिद्धांत किंवा सूर्यसंहिता हा मूळ सूर्यसिद्धांताहून खूपच वेगळा तथा नवीन दिसतो. वराहमिहिराने 'पंचसिद्धांतिका' या ग्रंथात पाच सिद्धांतांना– (१) पुलिश (२) रोमक (३) वसिष्ठ (४) सौर (सूर्य) (५) पितामह– यांचे कारणरूपाने– (ज्यात अंकशास्त्र किंवा अंकगणित याच्या मदतीने ज्योतिषगणना करता येते तथा ज्याच्यात कर्मांची आवश्यकता नाही.) वर्णन केलेले आहे. तसेच लाटाचार्य, सिंहाचार्य, यांचे गुरु आर्यभट्ट प्रद्युम्न, विजयदंति यांच्या मतांचा उल्लेख केला आहे. हे सर्व विद्वान वराहमिहिराच्या पूर्वी होऊन गेलेले दिसतात. ४७६ सनात जन्मलेल्या आर्यभट्टाने 'आर्यभट्टीय' ग्रंथ लिहिला. यात सूर्य, तारे, स्थिर आहेत, पृथ्वी स्वत:भोवती फिरत असते म्हणून दिवस-रात्र होत असतात, असे लिहिले आहे. यात पृथ्वीचा परीघ ४९६७ योजन किंवा २४८३५ मैल सांगितला आहे. यात चंद्र-सूर्यग्रहणांची शास्त्रीय व्याख्या केलेली आहे. याच्यानंतर आणखीही एक आर्यभट्ट होऊन गेला. त्याने 'आर्यसिद्धांत' नावाचा ग्रंथ लिहिला. याचा उल्लेख भट्ट भास्कराचार्यांने आपल्या ग्रंथात केलेला दिसतो.

वराहमिहिराच्या रोमक सिद्धांताचा आधार घेऊन ग्रीक लोकांनी खूपच प्रगती केलेली दिसते. यूनानी ज्योतिष, असे संबोधिला गेलेला ज्योतिषाचा संपूर्ण भाग या रोमक पद्धतीनेच तयार केलेला दिसतो.

वराहमिहिरानंतर ज्योतिषशास्त्राचा प्रधान विद्वान् पंडित ब्रह्मगुप्त झाला. याने ६२८ सनात 'ब्राह्मस्फुट सिद्धांत' आणि 'खण्डखाद्य' हे दोन ग्रंथ लिहिले. याच्यापूर्वी होऊन गेलेल्या अनेक आचार्यांना हा मानतो. याची प्रतिपादनशैली अधिक विस्तृत आणि विधियुक्त दिसते. १२व्या अध्यायात याने आर्यभट्टाची आलोचना केलेली आहे. आर्यभट्टाची काही मते अपूर्ण आहेत असे हा म्हणतो. यानंतर प्रसिद्ध पंडित लल्ल हा झाला. याने 'लल्लसिद्धांत' लिहिला. याने आर्यभट्टाच्या भूभ्रमणसिद्धांतास विरोध केला. तो म्हणतो– जर पृथ्वी भ्रमण करीत असेल तर वृक्षांवरून उडालेला पक्षी पुन: आपल्या घरट्यात पोहोचलाच नसता.

यदि च भ्रमति क्ष्मा तदा स्वकुलायं
कथमाप्नु यु: खगा:।
इषवोऽभ्रिनभ: समुंझिता
निपतंत: स्युर पापतेर्दिशी॥

–लल्ल सिद्धांत

आर्यभट्टाचा पूर्ण सिद्धांत समजून न घेता याने ही टीका केलेली दिसते. वस्तुत: पृथ्वी आपल्या वातावरणासह परिभ्रमण करते असे आर्यभट्टाने लिहिलेले आहे.

लल्लपंडितानंतर चतुर्वेद पृथुदकस्वामी नावाच्या पंडिताने ९७८ सालात ब्रह्मगुप्ताच्या 'ब्रह्मस्फुट सिद्धांत'वर एक टीकाग्रंथ लिहिला. १०३८ सनात पंडित श्रीपतिने

'सिद्धांतशेखर' तथा 'धीकोरिद' (करण) हे ग्रंथ लिहिले. नंतर वरूणपंडिताने ब्रह्मगुप्ताच्या 'खण्डखाद्य'वर एक टीका लिहिली. पंडित ब्रह्मदेवाने (११ वे शतक) 'खण्डखाद्य'वर 'करणप्रकाश' नावाचा ग्रंथ लिहिला. नंतर प्रसिद्ध ज्योतिषी पंडित महेश्वराचा पुत्र भास्कराचार्य झाला. याने सिद्धांत शिरोमणि, करण कुतुहल, करणकेसरी, ग्रहगणित, ग्रहलाघव, ज्ञानभास्कर, सूर्यसिद्धांत व्याख्या आणि भास्कर दीक्षितीय हे ग्रंथ लिहिले. सूर्यसिद्धांतानंतर सिद्धांतशिरोमणि नावाचाही ग्रंथ याने लिहिला. यात चार भाग आहेत. (१) लीलावती, (२) बीजगणित, (३) ग्रहगणिताध्याय आणि (४) गोलाध्याय. यातील पहिले दोन भाग गणितासंबंधी असून उर्वरित दोन भाग ज्योतिषासंबंधी आहेत. भट्ट भास्कराचार्यांनी या ग्रंथात पृथ्वी गोलाकार असून वरून व खालून ती चपटी आहे. तसेच भ्रमणाने पृथ्वीत आकर्षणशक्ति उत्पन्न होते असे सिद्धांत मांडले आहेत. तो लिहितो –

समो यत: स्यात्परिधे: शतांश:
पृथ्वी च पृथ्वी नितरां तनीयान्।
नरश्च तत्पृष्ठगतस्य कृत्स्ना
समेव तस्य प्रतिभात्यत: सा॥

**– सिद्धांतशिरोमणि-गोलाध्याय**

अर्ध-गोळ्याच्या परिघाचा शतांश (शंभरावा भाग) एक सरळ रेखा असल्यासारखे प्रतीत होते. आपली पृथ्वी हा एक मोठा गोल (गोळा) आहे. मनुष्यास या गोलाचा अत्यंत लहान भाग दिसतो म्हणून पृथ्वी चपटी (सरळ) दिसत असते.

दुसऱ्या एका श्लोकात तो म्हणतो –

पृथ्वी स्वत:च्या आकर्षणशक्तिने अनेक वस्तूंना स्वत:प्रत खेचते म्हणून पदार्थ पृथ्वीवर पडत असलेले आपणास दिसतात.

सर ऐझॅक न्यूटनच्या जन्माच्या कितीतरी शतके पूर्वी भट्ट भास्कराचार्यांनी पृथ्वीचा गुरुत्वाकर्षण सिद्धांत अत्यंत उत्तमतेने प्रतिपादित केला आहे. त्याचबरोबर ज्योतिषविषयक अनेक महत्त्वपूर्ण सिद्धांत प्रस्थापित केलेले आहेत.

अरब यात्रिक अल् बरूनीनेही ज्योतिषशास्त्राची उन्नति तथा ज्योतिषविषयक अनेक सिद्धांतांचा उल्लेख आपल्या पुस्तकात केला आहे. प्रसिद्ध विद्वान विल्यम् हंटर यांच्या मते अल् बरूनीने भारतात राहून ज्योतिषविद्या तथा सिद्धांत अभ्यासिले. त्यानंतर 'सिंदहिंद' या नावाने अरबी भाषेत एक पुस्तक लिहिले. (पहा– हंटर-इंडियन गॅझेटिअर, इंडिया, पृष्ठ २१८) बगदाद येथील खलिफा हरून अल् रशिद आणि खलिफा अल्माम् यांनी भारतीय ज्योतिषांना अरबस्थानात बोलावून घेतले तथा त्यांच्या ग्रंथांचे अरबी भाषेत भाषांतर करविले. (पहा– मल-हिस्टरि ऑफ इंडिया, भाग-२, पृष्ठ १०७) आर्यभट्टाच्या ग्रंथाचा भाषानुवाद 'अर्जबहर' या नावाने अरबी भाषेत केला गेला. चीन, जपान या अतिपूर्वेकडील देशात प्रचार झाला. प्रोफेसर विल्सन लिहितो– भारतात शोधलेले, क्रांतिवृत्त, क्रांतिवृत्ताचे विभाग, सौर तथा चांद्रमासांचे निरूपण, ग्रहगनिनिर्णय, अयनांश, सौर राशिमंडल, पृथ्वीचे निराधारपण (आधाराशिवाय तरंगणे) गुरूत्वाकर्षण शक्ति, परिभ्रमण, चंद्राचे भ्रमण, पृथ्वीपासून चंद्राचे अंतर, ग्रहांची कक्षा, ग्रहणगणित अशा कितीतरी बाबींचे अध्ययन इतर जातींनी भारतीय ज्योतिषास आधारभूत मानून पृथ्वीचे अध्ययन केले. (पहा – मिल-हिस्टरि ऑफ इंडिया, भाग-२, पृष्ठ १०७)

**फलज्योतिष**

भारतात अतिप्राचीन काळापासून फलज्योतिषास मान्यता दिसते. ब्राह्मण ग्रंथ तथा धर्मसूत्र ग्रंथ यांच्यात फलज्योतिषाचे बरेच संदर्भ दिसतात. वृद्धगर्गसंहिता ग्रंथात फलज्योतिषाचा एक भाग दिसतो. पंडित वराहमिहिरांच्या कथनानुसार ज्योतिषशास्त्र हे तंत्र, होरा आणि शाखा या तीन भागात असते. तंत्र किंवा सिद्धांतज्योतिषाचा संदर्भ आपण वर पाहिला आहे. उरलेल्या दोन म्हणजे होरा व शाखा यांचा संबंध फलज्योतिष किंवा फलितज्योतिष याचेशी आहे. होरा या भागात आधानकुंडली, भूपतनकुंडली, जन्मलग्नकुंडली आदिंच्या माध्यमाने मनुष्याच्या जीवनमापनसंबंधी इष्ट-अनिष्ट-फलाफलजातकादि विचार करतात. शाखा किंवा संहिता या भागात धुम्रकेतू, उल्कापात, शकुन, मुहूर्त आदींचे विवेचन असते. पंडित वराहमिहिरांची 'बृहत् संहिता' फलज्योतिषशास्त्रासाठी मुख्य ग्रंथ मानला जातो. या ग्रंथात वास्तुबांधणी तलाव-विहिर खोदकाम, वनस्पती-बाग तयार करणे, मूर्ति-प्रतिस्थापना, विवाहविधि, उपनयन संस्कार आदि संस्कारबंध याविषयींच्या शकुन किंवा मुहूर्त यांची माहिती आहे. दिग्विजय, विवाह याविषयी वराहमिहिराने अनेक ग्रंथ लिहिले. यांना प्रस्थानग्रंथ असे म्हणतात. फलज्योतिषावर बृहज्जातकसंहिता व बृहज्जातककेसरी हे ग्रंथही याने लिहिले. ग्रह, नक्षत्र यांच्या स्थितीनुसार मनुष्यमात्रांचे भविष्य सांगणे हा या पुस्तकांचा मुख्य हेतू आहे. पंडित वराहमिहिराचा पुत्र पंडित पृथुयशा (६ वे शतक) याने 'होराषट्पंचशिका' नावाचा फलज्योतिषाचा ग्रंथ लिहिला. दहाव्या शतकात पंडित भट्टोत्पलाने वराहमिहिर तथा त्याचा पुत्र यांच्या ग्रंथांचे भाषांतर केले. पंडित श्रीपति (१०३९ सन) ने रत्नमाला, जातकपद्धति आदि ग्रंथ लिहिले.

## गणितशास्त्र

**ज्यो**तिषशास्त्राच्या विकासाबरोबर गणितशास्त्राचाही विकास प्राचीन भारतात झालेला दिसतो. ६व्या शतकापर्यंत गणितशास्त्र अतीवउन्नत अवस्थेपर्यंत पोहोचलेले दिसते. प्रसिद्ध विद्वान् कजोरी याने आपल्या हिस्टरी ऑफ मॅथॅमेटिक्स या ग्रंथात – वर्तमान बीजगणित, अंकगणित यांचे विधि तथा भाव भारतीय दिसतात. यूनानचा यांचेशी काहीही संबंध नाही. गणितातील संपूर्ण तथा शुद्ध चिन्हे, चिन्हांच्या क्रिया या त्या काळात पूर्णत्त्वास आल्या. बीजगणिताच्या विधिंवर विचार केल्यास गंगा नदीच्या तीरावर बसलेल्या ब्राह्मणवृंदाने केलेल्या अनन्यसाधारण ज्ञानसाधनेची साक्ष देतात.

दुर्दैवाने भारतातील कितीतरी अमूल्य आविष्कार युरोपात खूपच उशीरा आले. तरीही त्यांचा प्रभाव अनन्यसाधारण दिसतो. डि मार्गन हा गणितज्ञ लिहितो – हिंदु गणित युनानी गणिताहून खूपच उच्चकोटीचे आहे.

आज आपण जे गणित शिकतो ते भारतीय गणितच आहे. गणितशास्त्राचा विचार करणेपूर्वी अंकविद्या किंवा अंकशास्त्र याचा विचार प्रथम करावयास हवा –

**अंकक्रमांचा विकास – किंवा अंकांचा क्रमविकास –**

प्राचीन भारताने जगास अनेक विद्या, विचार-आचार, प्रमेय पद्धति शिकविल्या. त्यात अंकविद्या ही एक आहे. आज जगभरात गणित, ज्योतिष, विज्ञान इत्यादिंमधील सर्व उन्नति ही फक्त अंकक्रमांवर आधारलेली आहे. यात १ ते ९ पर्यंतचे अंकक्रम आणि शून्य हा अंक या दहा चिन्हांनी अंकविद्या उन्नत पावली आहे. हा क्रम भारतात शोधला गेला आणि जगभर त्याचा प्रचार झाला आहे. या अंकक्रमांच्या निर्मितीच्या पूर्वीचा अंकक्रम कसा होता, जो क्रम होता त्याने गणित, विज्ञान, ज्योतिष यांची किती उन्नति झाली होती, यांचा आपण थोडा विचार करू.

भारतातील प्राचीन शिलालेख, दानपत्र, तथा चलनी नाणी, हस्तलिखित पुस्तके यांचा अभ्यास केल्यास – प्राचीन काळातील अंकक्रमात १ ते ९ अंकांना वेगवेगळी नऊ चिन्हे, १०, २०, ३०, ४०, ५०, ६०, ७०, ८०, ९० यांचेसाठी ९ चिन्हे तसेच १०० आणि १००० यांचेसाठी एक एक चिन्ह निहित होते. या २० चिन्हांनी ९९९९९ पर्यंतची संख्या दाखविली जात होती. १ ते ९ अंकांनंतर १ समोर ० (शून्य) लिहिले जात नव्हते. एक विशिष्ट चिन्ह वापरले जात होते. ११ ते ९९ पर्यंतच्या क्रमास १० साठी जे चिन्ह (दशकाचे चिन्ह) लिहून त्यापुढे एककाचा अंक लिहिला जात होता. उदाहरणार्थ १५ हा अंक लिहिण्यासाठी दशकाचे चिन्ह लिहून त्यापुढे ५ अंक लिहिला जात होता. ३३ साठी ३० आणि ३. २०० साठी शतकाचे चिन्ह लिहून कधी डाव्या बाजूस, कधी अंकाच्या वर, कधी मध्यात, कधी खाली अशा बाजूंना एक तिरकी रेखा जोडली जात होती. ३०० लिहिण्यासाठी शतकाच्या चिन्हाबरोबर दोन रेघा जोडल्या जात होत्या. ४०० ते ९०० पर्यंत शतकाचे चिन्ह लिहून त्याजबरोबर ४ ते ९ पर्यंतचे अंक, त्यासोबत लहानशी एक रेखा जोडली जात होती. १०१ ते १९९ पर्यंत लिहिण्यासाठी शतकाचे चिन्ह, दशकाचे चिन्ह आणि एककाचे अंक लिहिले जात होते.

सम्राट प्रियदर्शी अशोकाच्या सिद्धापूर, सहस्त्रनाम आणि रूपनाथ यांच्या लेखांमधून २००, ५० आणि ६ यांचे अंक मिळतात. या तिनही लेखांत २०० चा अंक भिन्नभिन्न लिहिलेला दिसतो. तसेच ५० आणि ६ हे अंक दोन वेगवेगळ्या पद्धतीने लिहिलेले दिसतात.

प्राचीन भारतातील या जटील अंकक्रमापेक्षाही इजिप्तमधील अंकक्रम हिमेरोग्लिफीक (चित्रलिपी) अधिक जटील दिसते. यात १, १० आणि १०० साठी ३ वेगवेगळी चिन्हे होती. या तीन चिन्हांना बऱ्याच वेळा लिहिल्यानंतर ९९९ पर्यंतचे अंक बनत होते. १ ते ९ पर्यंतचे अंक हे एककाचे चिन्ह म्हणजे उभी रेघ क्रमश: १ ते ९ वेळेला लिहिल्यानंतर तयार होत होते. ११ ते १९ पर्यंतच्या अंकांसाठी १० च्या चिन्हाबरोबर १ ते ९ पर्यंतच्या उभ्या रेघांनी दाखविले जात होते. २० साठी दशकाची दोन चिन्हे आणि ३० ते ९० साठी क्रमश: ३ पासून ९ पर्यंत चिन्हांकित होत असे. २०० साठी शतकाची दोन चिन्हे वापरीत असत. या क्रमांनी एक हजार ते १० हजारपर्यंतच्या अंकांना एक एक चित्र निश्चित केले होते. १ लाखासाठी एक बेडूक आणि १० लाखासाठी हात पसरलेला पुरुष अशी चित्रे वापरली जात होती.

फिजिशियन अंक हे याच पद्धतीत तयार झालेले दिसतात. यात फक्त दशकाचे चिन्ह पुन:पुन्हा लिहिण्यापेक्षा २० साठी एक नवीन चिन्ह बनविलेले दिसते. म्हणून ३० अंक लिहिण्यासाठी २० आणि १० यांची ते चिन्हे वापरीत असत. नंतरच्या काळात १ ते ९ साठी ९, आणि १० ते ९० पर्यंतच्या दशकांसाठी ९, १०० तथा १००० साठी एक एक चिन्ह स्थिर केले. या चिन्हांना हिएरेटिक असे म्हणतात.

युरोपमध्येदेखील प्राचीन काळी ग्रीक लोक फक्त दहा हजारपर्यंतचीच संख्या जाणत होते. तथा रोमन लोक एक हजारपर्यंतचीच संख्या जाणीत तथा मानीत होते. रोमन अंकांचा प्रचार प्रकाशित पुस्तकांचा सन लिहिण्यासाठी अनुक्रमणिकेत पृष्ठसंख्या लिहिण्यासाठी किंवा घड्याळात तासाचा अंक लिहिण्यासाठी वापरलेले दिसतात. त्यांच्यात १, ५, १०, ५०, १०० तथा १००० या अंकांची चिन्हे आहेत. यांना रोमन अंक म्हणतात. आजकाल बहुतेक शिक्षितांना हे रोमन अंक माहिती आहेत. या सर्व प्राचीन अंकपद्धतिने ज्योतिष, गणित, विज्ञान, रसायनशास्त्र यांच्या उन्नतिसाठी काहीही मदत केली नाही. भारताने शोधलेल्या अंकक्रमाने उन्नतिसाठी खूपच मदत केलेली आहे. या अंकक्रमात उजव्या बाजूकडून सरकत गेल्यास प्रत्येक अंकाचे स्थानिक मूल्य दहापटीने वाढत जाते. जसे १११११११ या साहाही अंकात १ हाच अंक आहे. तथापि उजव्या बाजूने पहिल्या १ हून दुसरा १० नी, तिसरा १०० नी, चौथा १०००, पाचवा १०,००० ने आणि सहावा १,००,००० नी संबोधित होतो. म्हणून या संख्याक्रमास दशगुणोत्तरसंख्या असे म्हणतात. आजकालच्या व्यवहारात हे संख्याक्रम मानलेले दिसतात. याचा शोध ६व्या शतकापूर्वी लागला. ७व्या शतकानंतर १०व्या शतकापर्यंतच्या शिलालेख, ताम्रपत्रे यांमध्ये कधी प्राचीन तर कधी गुणोत्तर अशा पद्धतीचे आधार मिळतात. तथापि गणितकार ६व्या शतकापूर्वीही या अंकपद्धतिचा उपयोग करीत असलेले दिसतात. पंडित वराहमिहिराच्या पंचसिद्धांतिका या ग्रंथात गुणोत्तर अंकपद्धति वापरलेली दिसते. भट्टोत्पलाने बृहत्संहिता या ग्रंथाच्या टीकेत, कांही ठिकाणी पुलिश सिद्धांत या ग्रंथातून याचा उल्लेख दिसतो. यांचा आधार वराहमिहिराने स्पष्ट उल्लेखिलेला आहे. एक-दोन ठिकाणी त्याने मूलपुलिश सिद्धांत या नावाने काही श्लोक दिलेले आहेत. यातील अंकपद्धति गुणोत्तरच दिसते. यावरून वराहमिहिराच्यापूर्वी ही अंकपद्धति भारतीयांना माहीत होती असे सिद्ध होते.

'योगसूत्र' या ग्रंथाचा भाष्यकार श्रीव्यास वाचस्पती (इ.स. ३रे शतक) यांनी गुणोत्तर अंकक्रमाची अनेक उदाहरणे दिलेली आहेत.

त्यानंतरच्या काळात ही गुणोत्तर अंकपद्धति अरबी लोकांनी आत्मसात केली. नंतर युरोपमध्ये तिचा प्रचार झाला. यापूर्वी आशिया तथा युरोपमध्ये चाल्डियन, हिब्रु, ग्रीक, अरबी वगैरे मानववंश वर्णमालेतील अक्षरांनी अंकाचे काम करीत असत. अरबस्थानात खलीफा वलीद (इ.स. ७०५ ते ७१५) याच्या कालखंडात अंकांचा प्रचार नव्हता. यानंतर त्यांनी भारतीयांकडून अंकपद्धति घेतली. (पहा-- भारतीय प्राचीन लिपिमाला, पृष्ठ ११०-११८)

याविषयी इंग्रजी भाषेतील विश्वकोषात (एन्सायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका) असे लिहिले आहे-- हे निःसंशय सत्य आहे की, आमचे (इंग्रजी) वर्तमान अंकक्रम (दशगुणोत्तर) यांची उत्पत्ती मूळ भारतीय आहे. बहुदा खगोलशास्त्रीय सारिणींबरोबर, ज्यांना एक भारतीय राजदूत इ.स. ७७३ मध्ये बगदाद या शहरी घेऊन आला, यांचा प्रचार अरबस्थानात झाला. नंतर ९व्या शतकाच्या प्रारंभिक काळात अबुझफर मुहम्मद अल् खारिज़्मी याने अरबी भाषेत या दशगुणोत्तर अंकक्रमास विशेष प्राधान्य देऊन त्याचे विवेचन केले म्हणून अरब देशात यांचा विकास झाला.

युरोपने शून्यासह हा संपूर्ण अंकक्रम बाराव्या शतकात अरबांपासून घेतला तसेच या अंकक्रमापासून बनलेला अंकगणित अल्गोरिट्मस (अल्गोरिथम्) या नावाने प्रसिद्धीस आला. हा अलगोरिट्मस शब्द अल्खरिज़्मी या शब्दाचे अक्षरांतर आहे. प्रसिद्ध गणितज्ञ रेनॉल्ड याने केंब्रिज विद्यापीठात उपलब्ध असलेला जुना ग्रंथ की, ज्याचे भाषांतर गणितज्ञ अडेलहर्ड याने केलेले होते. या जुन्या ग्रंथाची प्रत पुनः छापताना अल्खरिज़्मीपासून अल्गोरिट्मस (अल्गोरिथम) शब्द बनला आहे असे सिद्ध केले. याच ग्रंथास सुलभ करून पश्चिम युरोपमध्ये पीसा येथील लिओनार्डोने तथा पूर्व मेक्सिकोत फ्रॅनुडेस याने प्रचार केला. इंग्रजीतील 'झीरो' या शब्दाची उत्पत्ती अरबी 'सिफर' या शब्दापासून बनलेली असून लिओनार्डोने 'जिफिटो' असा शब्द वापरलेला दिसतो. (पहा-- एन्सायक्लोपीडिआ ऑफ ब्रिटानिका, भाग-१७, पृष्ठ-६२६)

फकिर-ए-आलम् म्हणून प्रसिद्ध असलेला अरब यात्री अल् बरुनी लिहितो-- हिंदुस्थानातील लोक आपल्या वर्णमालेतील अक्षरांचा उपयोग संख्यात्मक अंक लिहिण्यासाठी करीत नाहीत, जसे आमच्या देशात हिब्रु वर्णमालेच्या क्रमाने अरबी भाषेतील अक्षरांना संख्येच्या जागी लिहितो. भारतात वेगवेगळे भाग असून बहुतेक भागातील अक्षरांची लिपी वेगवेगळी आहे. तसेच संख्यासूचक चिन्हांच्या आकृती ज्यांना भारतीय भाषेत अंक असे म्हटले जाते यांच्याही आकृती भिन्न दिसतात. ज्या ज्या भिन्न भिन्न जातींशी माझा संपर्क आला त्या त्या भाषांच्या संख्यासूचक क्रमांच्या नामांचा म्हणजे एकक, दशक, शतक इत्यादि यांचा मी अभ्यास केला. मी जगातील वेगवेगळ्या भागात हिंडून आलो असून जगातील कोणताही मानववंश दहा हजारापेक्षा अधिक मोठा अंक जाणत नाही. अंकक्रमांची संख्या दहा हजारापेक्षाही जास्त जाणणारे लोक हिंदुस्थानातच आहेत. हिंदुस्थानातील लोक संख्यासूचक क्रमांना सलग १८ अंकांपर्यंत लिहू शकतात. मी माझ्या एका पुस्तकात हिंदुस्थानातील लोक इतर जातींपेक्षा कितीतरी पुढे गेलेले दिसतात असे लिहिले आहे. (पहा-- अल् बरुनीज् इंडिया, भाग १, पृष्ठसंख्या १७४-१७७)

**अंकगणित--** प्राचीन भारतात गणितविषयक जी पुस्तके दिसतात ती बहुदा ज्योतिष या विषयाच्या विद्वानांनीच लिहिलेली दिसतात. आर्यभट्टाच्या पुस्तकातील प्रथम दोन भाग, ब्रह्मस्फुट सिद्धांत यात गणिताध्याय आणि कुमुकाध्याय तसेच सिद्धांतशिरोमणिमधील लीलावती आणि बीजगणित नावाचा अध्याय गणिताशी संबंधित दिसतात. यात सरल-गणिताचे आठ नियम दिलेले असून ते असे-- योग, ऋण, गुण, भाग, वर्गिकरण, घनिकरण, वर्गमूल आणि घनमूल यांचे पूर्ण वर्णन दिसते. याशिवाय मिश्रसंबंधी, शून्यसंबंधी, क्षेत्रफळ, कार्यसंबंधी, त्रैराशिक, श्रेढी, कुट्टक तथा अनंतराशी, शून्यगणित आणि व्याजगणित यांचेही वर्णन मिळते.

**बीजगणित--** ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासासाठी अंकगणिताबरोबर बीजगणिताचाही अभ्यास महत्त्वाचा मानला जातो. प्रसिद्ध गणितज्ञ काज़ोरी म्हणतो, बीजगणितातील जगातील प्रथम यूनानी विद्वान् डायफेन्ट याने भारतात जाऊन याविषयीचे ज्ञान घेतले आणि मग तो जगात बीजगणिताचा ज्ञाता ठरला. म्हणजेच बीजगणित हा भाग अरबांकडून हिंदूंनी शिकला असे म्हणणे धादान्त चुकीचे आहे. भारतात बाराव्या शतकापर्यंत बीजगणितासंबंधीचे जे नियम आविष्कृत झाले ते सर्व नियम जसेच्या तसे १७ आणि १८व्या शतकात युरोप, अरबस्थान आदि भागात प्रचलित झाले. भारतीय बीजगणितातील काही नियम-- (१) ऋणराशींच्या समीकरणांची कल्पना (२) वर्णसमीकरणास सुलभ करणे (३) अंकपाशांचे नियम (युरोप आणि यूनानी लोक यांना हे ठाऊक नव्हते.) (४) एकवर्ण आणि अनेक वर्ण यांचे समीकरण (५) केंद्रफलाचा निर्णय करणे ज्यातून व्यक्त आणि अव्यक्त गणिताचा विकास झाला.

भट्ट भास्कराचार्यांने असेही सिद्ध केले--

क्ष x ० = ०; $०^{२}$ = ०; $\sqrt{०}$ = ०;
क्ष+० = क्ष, क्ष-० = क्ष, ०-क्ष = -क्ष,
क्ष÷० = ०, $क्ष^{०}$ = १.

भारतातूनच बीजगणित हा विषय अरबांच्या द्वारा युरोपमध्ये गेला. प्रोफेसर मोनियर विलियम्स सांगतात की, बीजगणित आणि ज्यामिती तसेच खगोलशास्त्र आणि त्या शास्त्रात यांचा प्रयोग प्रथम भारतीयांनी आविष्कृत केला आहे. (पहा-- इंडियन विजडम्, पृष्ठ १८५) मूसा आणि याकूब या विद्वानांनी भारतीय बीजगणिताचा प्रचार अरबस्थानात केला. अरबस्थानातून युरोप आणि इतर देशात बीजगणिताचा प्रचार झाला. (पहा-- हिंदु अचिवमेंट्स् इन ऍक्झॅक्ट सायन्सेस, पृष्ठ १२ ते १५)

**रेखागणित--** प्राचीन भारतातील रेखागणित बौद्धायन आणि आपस्तंभाच्या धर्मसूत्र यात रेखागणिताचा उल्लेख दिसतो. यज्ञवेदी आणि यागकुंडांना बनविण्यासाठी याचा उपयोग केला जात होता. यज्ञ आणि संस्कार करणारे पुरोहित आयताचे क्षेत्रफळ वर्गात आणि वर्गाचे क्षेत्रफळ वृत्तात

कशाप्रकारे आणावे याचे ज्ञानी मानले जात होते. यातील काही भाग असा – पायथागोरस हा ५ वर्षे भारतात वाराणसी येथे गणित-शास्त्राच्या अध्ययनासाठी वस्ती करून राहिला होता असे त्यानेच लिहिले आहे.

पायथागोरसचा सिद्धांत अर्थात समकोण त्रिभुजाच्या दोन भुजांच्या वर्गांचा योग कर्णाच्या वर्गाबरोबर असतो.

(२) दोन वर्गांचा योग किंवा अंतराचे समान वर्ग बनविणे. (३) कोणत्याही आयतास वर्गात परिणत करणे. (४) - √ चा वास्तविक मान आणि राशींचे मध्यमाहरण. (५) वर्गांना वृत्तात परिणत करणे. (६) वृत्ताचे क्षेत्रफळ. (७) विषम चतुर्भुजात कर्णानयनाची विधि (८) त्रिभुज, वृत्त आणि विषम चतुर्भुजाचे क्षेत्रफळ. (९) पंडित ब्रह्मगुप्ताने वृत्तखंडाची त्रिज्या (ज्या) तसेच त्यावरून खेचलेला कोदंडापर्यंतचा लंब जाणणे आणि व्यास तथा वृत्तखंडाचे क्षेत्रफळ काढणे याविषयीचेपण नियम दिलेले दिसतात. (१०) शंकु आणि वर्तुळाकार पदार्थांचे क्षेत्रफळ काढणे.

भट्ट भास्कराचार्यांने आपल्यापूर्वी होवून गेलेल्या– आर्यभट्ट, लल्ल, वराहमिहिर, ब्रह्मगुप्त, महावीर (८५० इ.वी.), श्रीधर (८५३ इ.वी), आर्यभट्ट (द्वितीय) आणि उत्पल (९७० इ.वी.) यांनी निश्चित केलेल्या नियमांचे सार देवून त्यांच्या कृतीही सांगितलेल्या आहेत. बीजगणिताप्रमाणेच याकूबने रेखागणित या शास्त्राचा प्रचार अरबस्थानात केला. (पहा– हिंदु अचिवमेंटस् इन ऐक्झेक्ट सायन्सेस, पृष्ठ १६ ते १९)

**त्रिकोणमिती–** प्राचीन भारतात त्रिकोणमितीमध्ये ज्या (साइन) तसेच उत्क्रम ज्या (वरर्ड साईन) यांच्या सारिणी (कोष्टके) तयार झालेल्या दिसतात. या कोष्टकांमध्ये वृत्तपादाच्या २४व्या भागापर्यंतचे प्रयोग दिलेले आहेत. दोनही कोष्टकांमध्ये अभिन्नमानाने ज्या आणि उत्क्रम ज्या यांची माहिती मिळते. त्रिकोणमितीप्रयोग ज्योतिष-अध्ययनासाठी केला जात होता.

वाचस्पतिमिश्रने चापीय घनक्षेत्र काढण्याची पद्धत अतिमौलिक पद्धतीने दिलेली आहे. अशाच पद्धतीने सर ऐझॅक न्यूटनच्या जन्माच्या ५ शतकेपूर्वी चलन-गणिताचा आविष्कार करून भट्ट भास्कराचार्यांनी या चलनगणितास ज्योतिषात स्थान दिले. श्रीयुत ब्रजेंद्रनाथ सील या गणितज्ञाच्या मते भट्ट भास्कराचार्य, प्रमेय, राशींच्या तात्कालिक गणित साधनांमध्ये आर्किमिडिसहून अधिक शुद्ध तथा प्रबळ आहेत. भास्कराचार्यांनी ग्रहाच्या क्षणिक (प्रत्येक क्षणाची) गतिची गणना करीत असतांना एक सेकंदाचे ३३७५ वा भाग त्रुटीचाही उल्लेख केलेला आहे. प्राचीन भारतीय लोक भूगोल, ग्रहमण्डल यांच्या संबंधीच्या गतिशास्त्रासही परिचित होते. स्थितीशास्त्र (स्टॅटिक्स) आणि गतिशास्त्र (डायनामिक्स) यांचेविषयीही अनेक संदर्भ दिसतात.

---

(पृष्ठ क्र. १५ वरून)

केला, तो काळजीपूर्वक ऐकलात तर अविद्येचे (अज्ञानाचे) धरणे उठेल (नाश पावेल). हेमाडपंत साईंच्या पायी शरण आले आहेत. श्रोत्यांना लोटांगण घालून विनंती करीत आहेत की थोड्या प्रयासाने संसार पार करून जाण्यासाठी (अल्प+आयासे भव+तरण) श्रवण-तत्पर व्हा. (ओ. १६१-१६३)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या, भक्त हेमाडपंतांनी रचलेल्या श्री साईसमर्थ यांच्या सत्यचरित्राचा "मद–अनुग्रह : १" (माझ्यावर म्हणजे खुद्द हेमाडपंतांवर झालेल्या बाबांच्या कृपा-प्रसादाचे वर्णन, भाग-१) नावाचा अठरावा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरु साईनाथांना अर्पण असो.**
**सर्वत्र मंगल असो.**

## साई–अनुभव...

# बाबांची लीला अपरंपार!

साधारण पंधरा वर्षापूर्वीची गोष्ट. मी प्रथमच शिरडीला साईबाबांच्या दर्शनाला गेलो होतो. साईबाबांचे दर्शन घेऊन बाहेर आलो तर माझ्या चपला गायब झाल्या होत्या. मी बाबांना म्हणालो,

"बाबा, तुमच्या दर्शनाला आल्यावर माझ्या चपला जाव्यात?"

आणि असं म्हणून मी तिथून जाणार इतक्यात एक दहा-बारा वर्षांचा मुलगा आला आणि मला म्हणाला,

"साहेब, सत्यनारायणाचा प्रसाद घ्या."

सत्यनारायणाचा प्रसाद घेऊन बाहेर आलो, तो काय आश्चर्य? माझ्या चपला जिथे ठेवल्या होत्या त्याच जागेवर होत्या. मी आश्चर्यचकित झालो. ही सारी साईंचीच लीला.

त्यानंतर काही वर्षांनी मी नागपूरला गेलो असतानाची गोष्ट. तिथे माझा मुक्काम वाढल्याने हैद्राबादहून भावाकडून तार-मनिऑर्डरने मी पैसे मागविले. मी लातूरला जाण्यासाठी बसचे रिझर्व्हेशन करून तिकिट व राहिलेले पैसे पाकिटात मागच्या खिशात ठेऊन निघालो. काही वेळाने मध्येच मी खिसा चाचपडला तर पाकिट तिथे नव्हते. पुन्हा मी बाबांना साकडे घातले. मी मागे वळून तिथून निघून जाणार तोच एक लमाणबाई माझे पाकिट हातात घेऊन पैसे मोजत होती. मी तिच्याजवळ जाऊन तिला सांगितले की हे पाकिट माझे आहे. तिने काहीही प्रतिरोध न करता मुकाट्याने माझ्या हातात ते पाकिट ठेवले. मी तिच्या हातात दोन रुपये ठेवले. बाबांच्या या लीलेने मी भारावून गेलो.

माझ्या मोठ्या मुलाचे लग्न ठरवितांना मला असाच अनुभव आला. काही केल्या दोन-तीन वर्षे लग्न जमत नव्हते. बाबांचे स्तोत्र-वाचन सुरू केले. विजयवाड्यातील देशपांडे घराण्यातील मुलगी आम्हाला आवडली होती. हे स्थळ जुळू दे! अशी मनोमन विनंती मी साईबाबांना केली. बाबांच्याच आशीर्वादाने देशपांड्यांची मुलगी रोहिणी आज माझी सून म्हणून आमच्या घरी सुखाचा संसार करते आहे.

**– शरद कट्टी**

# श्री दासगणू महाराज

**(श्री साईलीला, १९५७ अंकावरून)**

(मागील अंकावरून पुढे चालू)

**पुरीची यात्रा आणि श्री टेंबे स्वामी:** मी एकदा पुरीच्या यात्रेस गेलो होतो. वाटेंत गोदातटाकीं राजमहेंद्री शहरीं सुप्रसिद्ध महाथोर अंतर्ज्ञानी आणि कर्ममार्गाचे कट्टे अभिमानी श्रीवासुदेवानंद सरस्वती उर्फ श्री टेंबे स्वामी यांची गांठ पडली. त्यांच्या दर्शनास गेल्यावेळीं आमच्या अनेक गोष्टी झाल्या आणि मी शिरडीस जाणार आहें काय अशी श्री स्वामींनीं पृच्छा केली. ''होय, पण आतांच नाहीं, कांहीं थोड्या महिन्यांनीं जाईन'' असें मी उत्तर दिलें. तेव्हां त्यांनीं मजपाशीं एक श्रीफळ (नारळ) देऊन मला सांगितलें की, श्री साईबाबांना हें माझें श्रीफळ अर्पण करा. मी तें घेऊन माझ्या पिशवींत ठेवून दिलें. पुढें प्रवास करीत असतां माझ्या कांहीं मित्रांनीं तें घेऊन खाऊन टाकिलें. नंतर जेव्हां मी शिरडीस जाऊन श्री बाबांच्या दर्शनास गेलों, तेव्हां ते म्हणाले, ''हा पहा चोर, माझ्या बंधूंनीं दिलेलें श्रीफळ कुठें आहे ?''

ही कथा थोडीशी निराळी पण विस्तृत अशीं श्रीसाईसचरित, अध्याय ५१, ओव्या १२४-१८१ येथें दिलेली आहे. तेथें दासगणू महाराजांचें नांव नसून श्री टेंबे स्वामींनीं नांदेडचे वकील पुंडलिकराव यांचेकडे राजमहेंद्रीत श्री बाबांना अर्पण करण्यासाठीं नारळ दिला आणि त्यांनीं तो वाटेंत मित्रांसमवेत मनमाडावर तिखट चिवड्याबरोबर खाऊन टाकला इत्यादि वर्णन आहे आणि त्यापासून काय बोध घ्यावा हें सांगितलें आहे. तें थोडक्यांत असें– पुंडलिकराव वकिलांनीं दुश्चित्त होऊन नारळाची हकिगत सांगितली आणि दुसरा नारळ देतों, स्वीकार करावा असें सांगितलें. तेव्हां बाबा म्हणाले,

''घ्यावा कशास नारळ हातांत।
ठेवणें व्यवस्थित जरी नव्हतें॥१७२॥

आणि म्हणाले,

त्या फळाची योग्यता।
येईना इतर कितीही देतां॥
घडावयाचें घडलें आतां।
व्यर्थ दुश्चितता किमर्थ॥१७५॥
स्वामींनीं तुज दिधला नारळ।
तोही माझाच संकल्प केवळ॥
माझ्याच संकल्पें फुटलें तें फळ॥
अभिमान निर्फळ कां धरिसी॥१७६॥
अहंकाराची धरिशी बुद्धि।
तेणें आपणां मानिसी अपराधी।
एवढें निरहंकर्तृत्व साधी।
अवघी उपाधी चुकेल॥१७७॥
पुण्याचाचि काय अभिमान।
पापाचा का नाहीं अभिमान॥
प्रताप दोहींचा समसमान।
म्हणूनि निरभिमान वर्तें तूं॥१७८॥''

एका मित्रानें अगदीं थोडी किंमत घेऊन मला कांहीं जमिनी दिल्या. त्यांचे उत्पन्नांतून माझा उदरनिर्वाह चालतो. भक्तिसारामृतांत सांगितलेली, दरवडेखोरीपासून बचाव केलेल्या बेरे यांच्या टांग्याची कथा मला स्वत: माहीत आहे. बेरे यांचेंबरोबर मी त्या टांग्यांत होतों.

**माझी अपरिग्रह कीर्तनपद्धति:** माझ्या कीर्तनाकरितां मी कांहीं पैसे घेत नाहीं आणि पूर्वी कधीहि घेतले नाहींत. कीर्तनापूर्वी किंवा नंतर मदतीसाठीं केव्हांहि ताट फिरविलें जात नाहीं. देशांतील कांहीं भागांतून माझे भक्त मला पत्रें लिहून आमंत्रण देतात. मी त्यांचेकडे जाऊन राहतों आणि कीर्तनें करितों आणि सवडीप्रमाणें ग्रंथलेखनहि करितों. माझे स्वत:चे कुटुंबांतील कोणी मंडळी नसून मी एकटाच आहें आणि माझ्या गरजा फार थोड्या आहेत. इतरांप्रमाणें बाबांकडून मला पैसा मिळत नसे. ज्यांना बाबांकडून रोज कांहीं रक्कम मिळत असे त्यांचेवर उत्पन्नाचा करहि लागू झाला. लोकमान्य टिळक शिरडीत आल्यावर (१९-५-१९१७) इनकमटॅक्स खात्याची नजर शिरडी संस्थानकडे वळली. त्या खात्यांतील एक ऑफिसर शिरडीत आला आणि रोज (दक्षिणेद्वारा) उत्पन्न किती येतें तें पाहूं लागला. प्रथम साईबाबांवर कर बसवावा असें त्याचें मनांत होतें. पण बाबांपाशी शिल्लक असें कांहींच रहात नाहीं हें पाहून बाबा रोज ज्यांना रुपये देत असत, त्या म्हणजे तात्या पाटील, बडे बाबा, बागीया आणि बयाजी पाटील इत्यादि लोकांवर हा कर बसला. मला व विरक्त भक्त म्हाळसापति यांना पैसा व त्याविषयींची काळजी यापासून त्रास पोंचू नये म्हणून बाबांनीं योग्य ती दक्षता ठेविली. धनाहून अत्यंत श्रेष्ठ अशी माझी आध्यात्मिक उन्नति करून बाबांनीं माझा फायदा करून दिला आहे. त्यांनीं माझ्या ठायीं श्रद्धा उत्पन्न केली आणि ती अनेक तऱ्हांनीं दृढ केली. त्यांनीं मला महत्त्वाचे धडे शिकविले आणि सुंदर अगोलिक अनुभव प्राप्त करून दिले.

**गंगास्नान आणि तीर्थप्रसाद ग्रहण:** एकदां मी शिवरात्रीस शिरडीस होतों, तेव्हां तेथून तीन मैल असलेल्या रिंगबा येथील गोदावरी गंगेंत स्नान करावें असें माझ्या मनांत आलें. मेघाभक्तहि याच ठिकाणाहून बाबांना अभिषेक करण्यासाठीं गंगा आणीत असे. पण बाबा मला तेथें जाऊं देईनात. ते म्हणाले– गंगा तर माझ्या चरणापाशीं आहे, तूं जाऊं नको. माझें मन थोडें उद्विग्न झालें. साईबाबा हे ईश्वर-नारायण आहेत आणि नारायणाच्या चरणांपासून गंगा वाहते

ही उपपत्ति मला माहीत होती. पण प्रत्यक्ष गंगास्नानापासून जें कांहीं सुख होईल तें या उपपत्तीपासून मिळेल असें माझ्या अंधश्रद्धाळू मनास वाटेना. बाबांनीं माझें मन जाणलें. ते म्हणाले कीं– ''आपल्या पायापाशीं ये आणि ओंजळ पुढें कर.'' मी तसें करतांच बाबांच्या दोन्हीं चरणांपासून पाणी वाहूं लागलें. ते धामासारखे कांहीं बिंदु नव्हते, तर ते सावकाश सतत लहान धारेनें येऊं लागले. थोडयाच मिनिटांत माझी ओंजळ भरली. ती प्रत्यक्ष गंगा पाहून मला फार आनंद झाला. मी ती माझ्या मस्तकावर प्रोक्षण करून माझें गंगास्नान आटपून घेतलें. मी तें पाणी प्यालों नाहीं. बाबांच्या आरतीच्या वेळीहि मी त्याचे प्राशन करीत नसे. एकदां याबाबत श्री. जोगांनी बाबांकडे तक्रार केली. तेव्हां बाबा म्हणाले, ''मी माझ्या समजुतीप्रमाणें व सांप्रदायाप्रमाणें वागावे आणि जोगांनीं याविषयी मला कांहीं त्रास देऊं नये.''

**आचारधर्म आणि पलांडुसेवन :** सोवळेंओवळें, भक्ष्याभक्ष्य, स्नानसंध्या, पूजाअर्चा इत्यादि आचारधर्माला बाबा विशेष मान देत नसत. विशेषतः कांहीं जुन्या चालीरीति ते पाळत नसत, उलट त्याविरुद्धहि वागत असत. जुन्या रीतीरिवाजाप्रमाणें मी कोणत्याहि रूपांत कांदा खात नाहीं; पण बाबांना कांदा आवडत असे आणि कांद्याशिवाय ते क्वचित् जेवीत असत. एकदां त्यांनीं मला कांद्याचें पिठलें करण्यास आणि त्यांतलें थोडें मी खावें व थोडें आपणास आणून द्यावें असें सांगितलें. त्याप्रमाणें मी तें तयार करून बाबांपाशीं नेलें. मी तें घरीं खाल्लें काय असे त्यांनीं मला विचारतां 'होय' असें मी उत्तर दिलें. पण खरोखर घरीं मी असें केलें कीं, त्या पिठल्याला माझ्या बोटाच्या अग्रानें स्पर्श केला आणि नंतर त्यानें हनुवटीला स्पर्श केला आणि तेथून खालच्या ओंठापर्यंत एक रेषा काढली. अशा रीतीनें पिठलें खाल्लें. नंतर हात व तोंड धुतलें. मी काय खुबी केली हें बाबांनीं बरोबर जाणलें (आणि त्यांना अवगत नाहीं असें काय आहे!) आणि मी काय खुबी केली हें त्यांनीं लोकांस सप्रयोग दाखविलें. ते म्हणाले, ''हा खाल्याचें नुसतें सोंग आणून बहाणा करितो, पण खरोखर तें न खातां नुसतें पिठल्याला बोट लावून तें हनुवटीस लावतो'' असें म्हणून मी काय प्रकार केला तो त्यांनीं हुबेहुब करून दाखविला. नंतर मी खरोखर कांदा खावा असें त्यांनीं मला सांगितलें. जुन्या चालीरीतींना कांदा पसंत नसला तरी कांदा नित्य भोजनाच्या वस्तूंत असावा असें त्यांचें मत होतें. कांद्याला दुर्गंध येतो आणि तो कामोत्तेजक आहे म्हणून जुन्या चालीरीतीप्रमाणे कांदा निषिद्ध मानण्यांत येतो; पण बाबा असें म्हणत असत कीं– 'पचविण्याचा जोम असावा। तयानें कांदा खुशाल खावा॥' (श्री साईसच्चरित, अ. २३-१८) म्हणून शिरडीस असतांना बाबांच्या हयातींत एकादशी खेरीजकरून मी कांदा सेवन करीत असें.

**पंढरीची वारी :** बाबा कधीं कधी पंढरपूरसारख्या क्षेत्रीं जाण्याचे माझे कार्यक्रम पार पडूं देत नसत. भाद्रपद व आश्विन महिन्यांत विशेषतः आश्विन एकादशीस पंढरपूरास जाण्यास मी फार उत्सुक असें. १९१६ सालीं नानासाहेब चांदोरकर मला मनमाडास भेटले. भाद्रपद महिना लागणार होता तेव्हां मी पंढरपूरास जाणार असें मी त्यांना सांगितलें, पण त्यांनीं मला शिरडीस नेलें. तेथें बाबांनीं मला एक आठवडा नामसप्ताह व कीर्तन करण्यास लाविलें. नानासाहेबांच्या सांगण्यावरून शिरडी संस्थानांतून उत्तम पोषाख मागून घेऊन व तो अंगावर घालून मी कीर्तन करीत असें. पण बाबांनीं सांगितल्याप्रमाणें माझा नवरदेवाचा पोषाख खाली उतरविला आणि नारदीय पद्धतीनें कीर्तन करण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणे मी कीर्तन करीत एक महिना शिरडींत राहिलों. भाद्रपद महिना संपत आला आणि आश्विनमास डोकावूं लागला. आश्विनांतहि मला पंढरीस जातां येणार नाहीं (नानासाहेबांच्या मनांत मला शिरडींत आश्विनांत ठेवून घेण्याचें होतें) म्हणून मी थोडासा उद्विग्न झालों, आणि मनांत म्हणालों– सद्गुरु बाबा, हे माझ्या देवास म्हणजे पंढरीस जाण्याचा मार्ग कसा बंद करितात? बाबांनीं माझ्या मनांत काय होतें तें जाणलें आणि मला पंढरीस जाण्यास आणि नानासाहेबांना मला न अडविण्यास सांगितलें. त्याप्रमाणे मी मोठ्या आनंदानें पंढरीस गेलों.

**साक्षात्कार :** माझ्या कांहीं आध्यात्मिक प्रार्थना बाबांनीं पुऱ्या केल्या नाहींत. नामदेव व इतर संत यांचेप्रमाणें मलाहि माझ्या इष्ट देवतेचा साक्षात्कार व्हावा म्हणून मीं बाबांकडे पुष्कळदां जाऊन प्रार्थना केली. पण प्रत्येक खेपेस ''जरा थांब, सबूर'' असें बाबा उत्तर देत. शेवटीं, १९१६ च्या सुमारास मी बाबांना विचारलें, ''बाबा, माझी विनंती सफल न करतां तुम्हीं ती पुढें ढकलीत आहां, तुम्हीं मला साक्षात्कार केव्हां करून देणार?''

त्यावर ते म्हणाले, ''तूं मला पाहतोस, हाच साक्षात्कार होय, मी परमेश्वर आहे.'' मी सांगितलें कीं, ''आपलें उत्तर असें येणार अशी माझी अपेक्षा होती, आणि त्याप्रमाणें झालें; यानें माझें समाधान झालें नाहीं.'' माझ्या नशिबांत हा साक्षात्काराचा योग नाहीं आणि संतांनाहि नशीब फिरवितां येत नाहीं असें मानून मी माझें समाधान करून घेतलें.

**नामदेवाची आख्यायिका :** साक्षात्काराचा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. तो गहन, समजण्यास कठीण आहे असें पुष्कळजण समजतात, पण तो योग्य रीतीनें समजून घेतल्यास सोपा आहे. दासगणू महाराजांनीं वर आपल्या स्वानुभवकथनांत नामदेवाचा उल्लेख केला आहे. आणि नामदेवामध्यें आणि त्यांचेमध्यें बरेंच साम्य असल्यामुळें याविषयीं विवेचन करणें अप्रासंगिक होणार नाहीं. तेव्हां प्रथम नामदेवाच्या साक्षात्काराविषयींचा विचार करूं.

**संत नामदेव आणि त्यांची आख्यायिका :** आम्हां सर्वांना माहीत आहे– लहानपणीं त्यांनीं विठोबाकडून (विठोबाच्या मूर्तीकडून) नैवेद्य खावविला आणि पुढें तो आपल्या इष्ट देवतेच्या सान्निध्यांत राहणारा, ''देव आपणाशीं बोलतो चालतो'' असा तो त्याचा लाडका भक्त बनला हें सर्वांना परिचित आहे. एकदां निवृत्ति-ज्ञानदेवादी

भावंडें पंढरीस पांडुरंग दर्शनास गेलीं असतां. देवाजवळ बसलेल्या नामदेवासहि त्यांनीं प्रदक्षिणा घालून नमस्कार केला. तेव्हा नामदेव मोठ्या अभिमानानें म्हणाला, ''मी नेहमी पांडुरंगाजवळ असतो. हे जसे देवभक्त, तसा मीहि देवभक्त. परंतु मला जसें विठ्ठलाचे सान्निध्य आहे, तसें यांना कोठें आहे? तेव्हां यांनीं मला नमस्कार करावा हें योग्यच आहे; कारण तसा माझा अधिकारच आहे.'' नामदेवाचें हें औद्धत्य पाहून मुक्ताबाईस थोडासा राग आला आणि ''अखंड जयाला देवाचा शेजार। का रे अहंकार नाहीं गेला'' असें ती नामदेवास म्हणाली. अशा रीतीनें त्याची कानउघाडणी करून पुढेंही ती त्याला म्हणाली कीं– ''पंढरीस येणारे सर्व संत, माझे बंधूही, यांनी तुलाहि देवाबरोबर नमस्कार केला, परंतु मी मात्र तुझा हा अहंकार गेल्याशिवाय तुला नमस्कार करणार नाहीं.'' पुढें सर्व संतांनीं असें ठरविलें कीं, आळंदी येथें ज्ञानदेवाच्या गुंफेंत सर्व संतांची एक सभा भरवावी, आणि त्या सभेंत जमलेल्या सर्व संतांची गोरोबा कुंभाराकडून परीक्षा करवावी. त्याप्रमाणें सर्व संत जमले. त्यांची परीक्षा कपाळावर जोराने टिचकी (कोणी म्हणतात थापटणें) मारून गोरोबानें केली. टिचकीचा आघात नामदेवाशिवाय इतर सर्व संतांनीं निमूटपणें सहन केला. नामदेवाची पाळी येतांच टिचकी मारली गेल्याबरोबर नामदेव चिडून रागानें म्हणाला, ''काका, हा काय पोरकटपणा तुम्हीं चालविला आहे? लोकांस आपल्या घरी बोलावून त्यांच्या कपाळावर जोरानें टिचक्या मारावयाच्या, हा कोणत्या गांवचा आदरसत्कार?'' हें रागाचें भाषण ऐकून सर्व संत हसले आणि गोरोबांनीं नामदेवाकडे बोट दाखवून म्हटलें कीं, ''हा एवढा घट मात्र थोडासा कच्चा आहे.'' तेव्हां मुक्ताबाई गोरोबास म्हणाली, ''तुमची परीक्षा अगदीं बरोबर आहे.'' हें ऐकून सर्व संत हसले व त्यामुळें नामदेव मनांत फार ओशाळा झाला. तेथून नामदेव पंढरीस आला आणि राउळांत जाऊन संतसभेंत घडलेली आपल्या अपमानाची सर्व हकिगत त्यांनीं पांडुरंगास सांगितली. ती ऐकून देव म्हणाले, ''नाम्या, गोरोबाची परीक्षा अगदीं बरोबर आहे. कारण, सद्‌गुरूला शरण जाऊन ज्यानें आत्मज्ञान मिळविलें नाहीं. तो कितीही विद्वान् आणि भक्तिमान् असला तरी तो कच्चाच आहे असें समजावें.'' हें ऐकून नामदेव अगदीं विरघळून गेला. शेवटीं देवाच्या शिफारसीप्रमाणें नामदेव आंवढ्या नागनाथ येथें विसोबा खेचर यांना शरण गेला आणि त्यांचेकडून गुरुपदेश घेऊन कृतार्थ झाला! विसोबांनीं नामदेवास जो अध्यात्मोपदेश केला तो नामदेवी गाथ्यांत १७ अभंगात ग्रंथित केला आहे. त्याचा अगदीं थोडक्यांत सारांश असा आहे कीं,

'जेथें नाहीं देव, तेथे ठेवी पाय।
सर्वज्ञ सदैव तूंचि अससी।'
'मीपणें भुललों मज नकळेची कांहीं।
देव नसे ते ठायीं पाय ठेवी॥'

(लिंगावर पाय ठेवून निद्रिस्त अशा विसोबाला पाहून पाय दुसरीकडे ठेवण्यास केलेल्या नामदेवाच्या सूचनेस उत्तर– जिकडे पाय उचलून ठेविले तिकडे खालीं लिंग आढळून आलें) अभंग १३२

तुझें निजसुख तुजपाशीं आहे।
विचारूनी पाहे मनामाजीं॥
विवेक वैराग्य शोधुनियां पाहे।
तेणें तुज होय ब्रह्मप्राप्ती॥ (१३८)
जरी, म्हणसी देव देखिला।
तरी हा बोल भला नव्हे नाम्या॥
जोंवरी मी माझें न तुटे।
तव आत्माराम कैसेनी भेटे॥ (१३९)

शेवटीं नामदेव म्हणतात :–

द्वादशीचे गांवीं जाहला उपदेश।
देवावीण ओस स्थळ नाहीं॥
तो देव नामया हृदयीं दाविला।
खेंचरानें केला उपचार हा॥५॥

**सुदर्शन** (खरा साक्षात्कार)– श्री रमण भगवानांनीं चाळीस श्लोकांचा एक अत्युत्तम व श्रेष्ठ प्रबंध (ग्रंथ) रचला आहे. हे सर्वच श्लोक मनन आणि निदिध्यासन करण्याजोगे असून साधकांनीं त्यांचा योग्य अभ्यास केला पाहिजे. येथें फक्त दोनच श्लोक देत आहें. एकांत सद्दर्शन म्हणजे काय आणि दुसऱ्यात सद्दर्शनाची परीक्षा किंवा कसोटी हे सांगितलें आहे. ते श्लोक असे :

(१) (सद्वस्तुच्या ठिकाणीं तादात्म्य-निष्ठा हेंच सद्दर्शन.)

(८) श्रवन्तु सद्दर्शन साधनानि
परस्य नामाकृतिभिः सपर्याः।
सद्वस्तुनि प्राप्त तदात्मभावा॥
निष्ठैव सद्दर्शनमित्यवेहि॥

अर्थ– परमात्म्याची नामरूपादिकांनीं पूजा करणें ही सद्वस्तूच्या (परमात्म्याच्या) साक्षात्काराचीं साधनें असल्यास होवोत. पण सद्वस्तूच्या ठिकाणीं तद्रूप होऊन तेथेंच निष्ठा (निरंतर स्थिति) ठेवणे हेंच खरें सद्दर्शन होय हें ध्यानांत ठेवावें.

(२) – आत्मज्ञान म्हणजे आत्मनिष्ठा स्वरूपस्थिति

(२०) – यदीशितुर्वीक्षणमीक्षितारं
अवीक्ष्य तन्मानसिकेक्षणं स्यात्॥
न द्रष्टुरन्यः परमोहि तस्य
वीक्षा स्वमूले प्रविलीय निष्ठा॥

अर्थ– द्रष्ट्याला (आपणा स्वतःला) पाहिल्याशिवाय ईश्वराचा साक्षात्कार म्हणजे (तें निज-खरें दर्शन नसून) मानसिक दर्शन होय, कारण परमात्मा हा द्रष्ट्याहून भिन्न नाहीं. म्हणून स्वतःच्या मूलाच्या ठिकाणीं निष्ठा म्हणजेच खरा साक्षात्कार (निजदर्शन) होय–

'आत्मबोधविना नेश्वरबोधा' म्हणजे आत्मज्ञान झाल्याशिवाय ईश्वरज्ञान, ईश्वराचा साक्षात्कार नाहीं हा सिद्धान्त आहे.

वराह उपनिषदामध्यें खरा साक्षात्कार म्हणजे काय हें थोडक्यांत स्पष्ट सांगितलें आहे. तें असें की :–

'अस्ति ब्रह्मेति चेद्वेद परोक्ष ज्ञानमेव तत्!
अहंब्रह्मेति चेद्वेद साक्षात्कारस्स उच्यते॥'

अर्थ– ब्रह्म (परमेश्वर) आहे असें जाणणें म्हणजें तें परोक्ष अप्रत्यक्ष ज्ञान होय आणि मी ब्रह्म आहें (अहंब्रह्मास्मि) असें जाणणें, अपरोक्ष म्हणजे प्रत्यक्ष ज्ञान किंवा साक्षात्कार होय.

**एक विरक्त योगी ब्रह्मचारी :** पांडुरंगांनीं सद्गुरु विसोबा खेचर यांची शिफारस करून

नामदेवाला त्यांचेकडे पाठविलें आणि त्याला आत्मज्ञान प्राप्त करून देविलें. तसें नामदेव – सदृश दासगणू महाराज यांना दुसऱ्या कोणा सद्गुरुची शिफारस करून त्यांचेकडे पाठविण्याची जरूरी साईबाबांना भासली नाही. कारण दासगणू महाराज हे एका सद्गुरुचे शिष्य होते. शिवाय बाबा हे सद्गुरु आणि परमेश्वर असल्यामुळें त्यांनी त्यांना तसें सांगितलेंहि; पण त्या सांगण्यानें दासगणू महाराजांचें समाधान झालें नाहीं. तरी पण बाबांनीं अशी घटना करून ठेवलेली दिसून आली कीं, त्यांचे महासमाधीनंतर दासगणू महाराजांना एका विरक्त योगी ब्रह्मचाऱ्याच्या भेटीचा योग जमून आला. ती हकिगत दासगणू महाराज आपल्या स्वानुभव कथनांत अशी सांगतात कीं– बाबांनीं समाधि घेतल्यानंतर मी कांहीं संतांचें दर्शन घेत आहे, पण त्यांपैकीं कोणाकडूनहि माझें समाधान झालें नाहीं. त्यांतल्या त्यांत एका अपूर्व व्यक्तीचा माझेवर चांगला परिणाम झाला. नांदेडजवळ १९१९ च्या सुमारास एका खडकावर विरक्त योगी ब्रह्मचारी राहत होता. तो अपरिग्रही असून कोणाची पर्वा करीत नसे. मला दर्शन देण्याचे त्यानें दोन-तीन खेपा टाळलें, पण मी पाठविलेल्या अन्नाचा मात्र स्वीकार केला. तेव्हां मी पुन: त्याचेकडे गेलों आणि दर्शन देऊन नमस्कार कां करू देत नाहीं असें विचारलें.

तों म्हणाला, ''तुम्ही स्वत:ला कीर्तनकार म्हणवितां, पण तुम्हीं अहंकार सोडला आहे काय?''

मी: मला तो कसा सोडतां येईल? प्रत्येकाला अहंकार असतोच.

तो: अन्न पाठवितांना मी हें अन्न पाठवीत आहें असा अहंकार तुम्हांला वाटला कीं नाहीं?

मी: अहंकार, सात्विक, राजस व तामस असा तीन प्रकारचा असतो. वाईट (तामस) अहंकाराचा त्याग केला पाहिजे.

माझें हें विधान त्याला पसंत नव्हतें. माझा अहंकार समूळ नाहींसा करावा असें त्याचें मत दिसलें. त्यानें माझे मनांतील सर्व कांहीं जाणलें आणि आपल्या सामर्थ्याचीं कांहीं उदाहरणें दिलीं. ती अशी:

तो: तुम्हीं संतचरित्रें लिहीत आहां ना!

मी: होय.

नंतर त्यानें मी सहा दिवसांपूर्वी रचिलेलीं पदें (अद्याप अप्रकाशित) म्हणून दाखविलीं. त्याचे हें अंतर्यामित्व पाहून मी चकित झालों.

तो: साईबाबांच्या चरणापासून तुम्हाला गंगा मिळाली कीं नाहीं?

मी: होय, मिळाली.

तो: तुम्हीं तिचें काय केलें?

मी: तिचें मस्तकावर मार्जन करून घेतलें.

तो: आणि तुम्हीं तें प्राशन केलें नाहीं; कारण आपण ब्राह्मण आहोंत आणि तें प्याल्यानें भ्रष्ट होऊं असें तुम्हांला वाटलें. काय तुमचा अहंकार पहा!

टीप: श्री ज्ञानेश्वर महाराज याविषयीं म्हणतात कीं:

'विचारूनि अहंकार सांडिजे।
मग असतीच वस्तु होईजे'॥

(ज्ञानेश्वरी, ६-७१)

आणि 'तेवींचि अहंभाव जाये।
तरी ऐक्य तें आधींच आहे॥

(ज्ञानेश्वरी, ८-४५)

यानंतर मी त्याचेकडे रोज रात्रौ जाऊं लागलों आणि कांहीं तास त्याचेबरोबर घालवूं लागलों. याविषयीं गांवांत बरी वाईट चर्चा सुरू झाली. गांवांतील एक अश्रद्ध टवाळखोर गृहस्थ माझेबरोबर त्याचेपाशीं आला. त्याचेशीं त्याची बरीच प्रश्नोत्तरें झालीं. त्यांत त्यानें त्या टवाळखोर गृहस्थाचीं सर्व अनैतिक बिंगें बाहेर काढिलीं आणि त्याची खात्री पटवून दिली. (याविषयीं विस्तृत हकिगत देणेचें कारण नाहीं) यानंतर गांवांत त्याची बरीच प्रसिद्धि झाली. तें त्याला न आवडून तेथून लवकरच कायमचा पोबारा केला –

साईबाबांविषयीं लिहिलेले ग्रंथ येणेंप्रमाणें –

(१) 'संतकथामृत': मी नोकरीत असतां बाबा व इतर संत यांविषयीं हा ग्रंथ क्रमश: लिहून १९०३ सालीं प्रसिद्ध केला. बाबांनीं या माझ्या प्रयत्नाला आशीर्वाद दिला. यांतील कांहीं भाग बाबांना वाचून दाखविण्यांत आला नाहीं किंवा यासंबंधीं माहिती देण्यासाठीं बाबांना विचारलें नाहीं. त्यांनीं बोलतांना जें कांहीं सांगितलें तें मी टिपून ठेविलें. 'सेलु' विषयीं बाबांनीं जें कांहीं सांगितलें होतें, त्याविषयीं सेलू गांवीं जाऊन मीं चौकशी केली. प्रत्येक भाग बाबांचे हातीं देतांच 'ठीक आहे' असें ते म्हणाले. बाबांना लिहतां वाचतां किंवा सही करितां येत होती कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. (२) नंतर 'भक्तिलीलामृत' हा ग्रंथ बाबांच्या हयातींत १९०६ सालीं प्रसिद्ध झाला. (३) शेवटीं 'भक्तिसारामृत' तयार झाला. यांतील ५२-५३ अध्याय (बाबांविषयींचे) बाबांच्या हातीं देतांच 'ठीक आहे' असें ते म्हणाले. इतर अध्याय सवडीप्रमाणें १९१८ च्या पुढें तयार होऊन सबंध ग्रंथ १९२५ सालीं प्रसिद्ध झाला.

अध्याय २८ यांत बाबांविषयीं जी माहिती आहे, ती कांहीं अंशीं बाबांच्या सांगण्यावरून आणि कांहीं अंशीं सेलूच्या सांगण्यावरून दिलेली आहे. आपण सेलूहून आलों एवढेंच बाबांनीं मला सांगितलें. त्यावरून मी सेलुगांवीं गेलों आणि तेथें चौकशी केली; ३५ वर्षांपूर्वी ही चौकशी केलेली असल्यामुळें कोणी खेडुतानें काय सांगितलें हें नक्की सांगतां येत नाहीं. त्यांनी असे सांगितलें की, एक म्हातारा साधु होता व तो एका तरुण फकिराला शिक्षण देऊन तयार करीत होता. कांहीं लोक त्या साधूवर चिडून त्यांनी त्याला दगड मारून ठार केलें. पण तो तरुण फकीर पळून गेल्यामुळें बचावला. हें वर्तमान अजमासें शंभर वर्षांपूर्वी घडलें. साईबाबांनीं नानासाहेब चांदोरकरांसमक्ष मला असें सांगितलें कीं, जी वीट आपण उशासारखी वापरीत होतों, ती आपल्या वेंकुशहा गुरुनें आपणास दिलेली होती. चांदोरकरांना हें सांगितलें म्हणून ग्रंथांत मी लिहिलेलें आहे, तें माझें नांव वारंवार ग्रंथांत प्रमुखपणें येऊं नये एवढ्यासाठीं होय. ५३ व्या अध्यायांत चांदोरकरांविषयी जे

लिहिलेलें आहे तें त्यांनीं मला सांगितलें नाहीं. त्यांना आलेल्या अनुभवाची डायरी किंवा नोंद त्यांनीं ठेविली होती कीं नाहीं हें मला माहीत नाहीं.

**रतनजीची कथा:** नांदेडला रतनजी शापुरजी नांवाचे एक भिन्न कॉंट्रॅक्टर होते. ते एकदां शिरडीस साईबाबांच्या दर्शनास गेले. बाबा तेव्हां त्यांना म्हणाले, कीं, "तूं पूर्वी दिलेली दक्षिणा रु. ३-१२ मला पोंचली आहे आणि आतां तुला द्यावयाची ती दे." दक्षिणा देऊन उदीचा प्रसाद व आशीर्वाद घेऊन रतनजी परत नांदेडास आले. आपण पूर्वी कधी बाबांच्या दर्शनास गेलों नाहीं, तरी पूर्वीची दक्षिणा (रु. ३-१२-०) मला पोचली असें बाबा कसें सांगतात याचें त्यांना आश्चर्य वाटलें आणि त्यांनीं याबाबत मला खुलासा विचारला. तेव्हां विचार करता करतां मला एक मागील प्रसंग आठवला. रतनजी शेठजींनी मौलीसाहेब नांवाच्या एका पोरास फलपान (बदाम पिस्ते वगैरे) सुमनहार देऊन स्वागत केलें होतें. त्यासंबंधीं जमाखर्च काढून पहातां त्या कामीं रु. ३-१२-० इतकाच खर्च झाला होता. हें पाहून रतनजी शेठजीस व इतरांना आश्चर्य वाटलें. (याविषयीं सविस्तर कथा श्रीसाईसच्चरित, अध्याय १४ यांत पहावी)

**बाबांच्या गुरुची समाधि:** निंमवृक्षाखालची ही समाधि आम्हीं प्रथम पाहिली तेव्हां ती दिसण्यासारखी नव्हती. कारण ती जमिनीच्या खालीं होती. रावबहादूर हरि विनायक साठे यांनीं पायऱ्या व पार बांधला आणि गुरुच्या पूजेसाठीं कोनाड्याची व्यवस्था केली.

**बाबा व कट्टर मुसलमान:** बाबांचीं कृत्यें व मतें शिरडीच्या मुसलमानांशीं जुळतीं नसल्यामुळें त्यांचा बाबांशीं केव्हां केव्हां बेबनाव होत असे. बडेबाबा व इतर मुसलमान यांनीं कुतब्याच्या प्रार्थनेसाठीं बाबांस गांवाबाहेर बोलाविलें होतें. बाबांनीं प्रथम कबूल केलें. पण ती मंडळी बाबांना बाहेर नेण्यास आली, तेव्हां बाबांनीं नकार दिला. दुसऱ्या खेपेस ती मंडळी मशिदींत येऊन प्रार्थना म्हणूं लागली; पण बाबा त्यांच्या सामुदायिक प्रार्थनेंत सामील झाले नाहींत. एकदां मोहरमच्या उत्सवांत कांहीं स्थानिक मुसलमानांनीं मशिदींत ताजिया (ताबूत) आणतों म्हणून सांगितलें आणि एक ताबूत करून मोहरमच्या पांचव्या दिवशीं त्यांनीं तो मशिदींत आणून ठेविला. बाबांनीं तो एक दोन दिवस तेथें राहूं दिला. नंतर तो त्यांनीं ओढून अग्निवर ठेवून या मशिदींत मला प्रेत नको म्हणून जाळून टाकिला. समर्थ बाबांविरुद्ध ते कांहीं करूं शकले नाहींत. एका कट्टर मुसलमानानें एकदा विशिष्ट तऱ्हेची फुलांची माळ आणली आणि ती मशिदींत कमानीत घालण्याची परवानगी मागितली. बाबांनीं सांगितलें कीं, "ती माळ घेऊन जा आणि हनुमान मूर्तीवर घाल." मी मुसलमान असल्यामुळें हिंदूच्या मूर्तीवर घालीत नाही असें त्यानें उत्तर दिलें. बाबांनीं त्याला खूप रागें भरून हनुमान आणि अल्ला एकच आहेत असें सांगितल्यावर तो ती माळ घेऊन गेला.

**हनुमानाविषयी बाबांचा आदर:** चावडीच्या एका वरील भागांत ओटयांत कोपऱ्यांत हनुमानाची एक लहानशी मूर्ति होती. बाबा खालच्या भागांत बसत असत. तेथें एकदां पावसाचे थेंब पडूं लागले तेव्हां वर जाऊन ओटयांत बसण्यास कोणी एकानें बाबांस सांगितलें. 'देवाबरोबर आम्ही कसें बसावें' असें म्हणून बाबांनीं तें नाकारलें.

फकीर बाबा ऊर्फ बडे बाबा यांनीं एकदां एक हिंदु नुकताच मुसलमान धर्मांत बाटलेला असा मशिदींत आणला. "तूं आपला बाप बदललेला आहेस" असें म्हणून बाबांनीं त्याच्या एक श्रीमुखांत दिली, पण कांहीं विशिष्ट अवस्थांमध्यें बाबा, अल्ला व तसेंच देवता याविषयीं अशिष्ट (अनुदार) उद्गार काढीत असत. पंढरपूरास जाण्याची कोणी परवानगी मागितली तर कांहीं शिव्याशाप देऊन बाबा त्याला "जा" म्हणून सांगत. पण ज्ञानदेव किंवा तुकाराम यांची आरति चालली म्हणजे ते अदबीनें हात जोडून बसत असत.

अद्वैताबद्दल बाबांचे मत काय होतें हें सांगणें कठीण आहे. प्रत्यक्ष ते याबद्दल बोलत नसत, चुकून केव्हां तरी तसा (अद्वैत) ध्वनि ते काढीत असत. 'अहं ब्रह्मास्मि, सर्वं खल्विदं ब्रह्म' (मी परमेश्वर आहे, हें सर्व खरोखर परमेश्वर आहे) असे ते म्हणत. ते प्रत्यक्ष किंवा साक्षात् अद्वैत (एकमेवाद्वितीय) होते. काहीहि होवो ते आपले स्वस्थ (निर्विकार) असत. ते नेहमीं पूर्ण विरक्त व स्वात्मानंदी मग्न असत.

एकदां एका भक्तानें विचारलें, "बाबा, ब्रह्म (परमात्मा) कसा आहे?" बाबांनी कांहीं उत्तर दिलें नाही. पण बागचंद मारवाड्याकडून शंभर रुपये आणण्यास एकाला पाठविलें. त्यानें शंभर रुपये न पाठवितां बाबांना आपला नमस्कार पाठविला. दुसऱ्या एका इसमाकडे शंभर रुपयासाठीं पुन: एक इसम पाठविण्यांत आला. पण तेथेंहि नकारच मिळाला. नंतर बाबांनीं नानासाहेब चांदोरकरांना बोलाविलें आणि त्यांचेपाशीं शंभर रुपये मागितले. नानासाहेबांनीं त्या बागचंद मारवाड्याला चिठी लिहिली, तोंच त्यानें लगेच शंभर रुपये पाठविले. तेव्हां बाबा एवढेंच बोलले कीं— "या जगांत सर्व व्यवहार असा चालतो." नंतर त्या प्रश्न करणाऱ्या भक्तानें मला खासगी बैठकींत बाबांनीं आपल्या प्रश्नाचें उत्तर कां दिलें नाहीं असें विचारलें. मी सांगितलें कीं, शंभर रुपये (दक्षिणा) याचना आणि त्यावर मिळालेलीं उत्तरें हेंच तुझ्या प्रश्नाचें उत्तर होय. दुसऱ्यांनीं पैशाची याचना केली, तो आला नाहीं, पण नानासाहेबांनीं मागतांच तो आला. तसें ब्रह्म नुसतें जाणण्याची इच्छा करणाऱ्याला तें मिळत नाहीं. अधिकारसंपन्नालाच तें मिळतें. ब्रह्माची अपेक्षा करण्याच्या आधीं तुम्हीं लायक व्हा.

**बाबांचे चमत्कार**— मीं क्वचितच पाहिले आहेत. १८९८ सालीं ते जमिनीपासून ७/८ फुट उंच टांगलेल्या एका लहान फळीवर निजत असलेले मीं पाहिलें आहे. शिडीशिवाय ते त्या फळीवर कसे जात असत आणि तेथून ते कसे खालीं येत

असत हा एक अजब चमत्कार आहे. ते वर कसे झोके घेऊन जात व उतरत असत हें कोणीहि पाहिलें नाहीं. फळी टांगलेल्या चिंध्या फार ढिल्या व कमकुवत होत्या आणि तिचेवर पण त्या तशाच ठेविल्या होत्या. कोणी वर चढला तर त्या पडण्याजोग्या होत्या. त्या फळीवर निजलेल्या बाबांना मी जेव्हां पाहण्यास गेलों. तेव्हां ते माझेवर फार रागावले आणि त्यांनीं तेथून मला हांकलून लाविलें.

केव्हां केव्हां बाबा दुपारीं १ ते २ च्या दरम्यान एकटेच असतांना पडद्यामागें कांहीं विचित्र क्रिया करीत असत. एका पिशवींतून पैसा, ढब्बू पैसा, आणेली, चवली, पावली, अधेली व रुपया अशीं नाणीं काढून आपल्या बोटांच्या अग्रानीं तीं सावकाश घांसीत असत. त्यावेळीं ते कांहीं मंत्र म्हणत असत किंवा नाहीं हें माहीत नाहीं. ती नाणी घर्षणामुळें साफ गुळगुळीत झालीं होतीं. तीं घांसत असतां हें नानांचें, हें बापूंचें, हें काकाचें असें ते म्हणत असत. कोणी जवळ आल्यास तीं नाणीं गोळा करून पिशवींत घालून लपवून ठेवीत असत.

बाबा हजारों गोष्टी सांगत असत. त्यापैकीं कांहीं थोड्या (मासल्या करितां) सांगतों. एकदां बाबा म्हणाले– मी पुणतांब्यास असतांना दोन पक्षांमध्ये भांडण झालें. कां झालें याचें मला आश्चर्य वाटलें. जवळच नाण्यांनीं भरलेलें भांडें होतें. त्यामुळें जुंपले असावें. मी सावकाश तेथें गेलों आणि तें भांडें लांबविलें. आपले धन गेलें असें समजून ते शोक करूं लागले. मी मनांत म्हणूं लागलों – 'मी कोण ? हें धन काय आहे ? व कोणाचे आहे ? याकरितां काय हा घोंटाळा आणि भांडण ? तें भांडें माझें आणि मी त्या भांड्याचा.'

बाबा एकदां असे बोलले, "आपणाला पुत्र (मी) झाला म्हणून माझी आई फार आनंदात होती. तिच्या या वर्तनाबद्दल मी आश्चर्य करीत होतों. तिला मी केव्हां झालों ? मी जन्मलों तरी काय ? मी प्रथमपासून अस्तित्वांत नव्हतों कीं काय ? याबद्दल ती आनंदांत कां आहे ?"

एकदां शिरडींत कोणी एकानें सांजा किंवा शिरा तयार केला होता. मला तो शिरा दिला कीं नाहीं असें बाबांनीं विचारतांच, त्या व्यक्तीचें व माझें बरें नाहीं म्हणून मला शिरा मिळाला नाहीं असें मी सांगितलें. तेव्हा बाबांनीं असा उपदेश केला कीं, "कोण, कोणाला व काय ? हा शिरा काय आहे ? तो कोण खातो ? कोणी आपला वैरी आहे, असें म्हणूं नको. कोण कोणाचा वैरी आहे ? कोणाविषयींहि मनांत वाईट भाव बाळगूं नका. सर्वजण एकच व सम (सारखे) आहेत." हा उपदेश (विचार) माझ्या अमृतानुभवावरील टीकेच्या दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी दिलेला आहे.

ज्ञानेश्वरीच्या अमृतानुभवावर मी ओवीबद्ध टीका लिहिणार होतों. सातारचे दादामहाराजांनीं मला सांगितलें कीं, "सदरहू ग्रंथ फार कठीण आहे. आमचेजवळ राहून तो समजून घ्या आणि नंतर टीका लिहा." मी म्हटलें कीं, "मी टीका लिहावी अशी बाबांचीं इच्छा असेल तर तेच मला बुद्धियोग देतील, दुसऱ्याजवळ मी शिकावयास जाणार नाहीं." दादामहाराजांस हें माझें म्हणणें पटलें नाहीं. पुढें टीका तयार झाल्यावर ती दादामहाराजांनीं पाहिली. आणि ती पाहून दादामहाराज सद्गदित झाले व म्हणाले की, "बाबा खरे समर्थ आहेत, त्यांची तुमचेवर कृपा आहे, म्हणूनच अशी टीका तुमचे हातून तयार झाली. तुम्हांला दुसऱ्याच्या मेहनतीची जरूर नाहीं."

तसेंच दासगणू महाराज ईशावास्य उपनिषदावर टीका लिहीत असतांना त्यांतील कांहीं प्रमुख मंत्राच्या अर्थाविषयीं त्यांना शंका उत्पन्न झाली होती. त्या शंकेचें निवारण बाबांनीं काकासाहेब दीक्षितांच्या तरुण मोलकरणीकडून करविलें, या विषयींची मनोरंजक व उद्बोधक कथा श्री साईसचरित्र, अध्याय २० येथें जिज्ञासूंनीं पहावी.

---

(पृष्ठ क्र. ३० वरून)

बसले. त्यात त्यांना असे कळले की, त्यांचा पगार वाढून १२५ चा १५० करण्यात आला होता. मग ते शिरडीला आले व त्यांनी बाबांचे दर्शन घेतले. बाबा म्हणाले,

"पंधरा रुपये दक्षिणा दे."

लेले म्हणाले,

"माझ्याजवळ पैसे नाहीत."

लगेच बाबा उत्तरले,

"अरे, कालच मी तुला २५ रुपये वाढ दिली. जा. कोणाकडून तरी घेऊन ये."

मग लेले वाड्यावर माझ्याकडे आले आणि त्यांनी सर्व हकिकत सांगून १५ रुपये माझ्याकडे उसने मागितले व ती रक्कम बाबांना नेऊन दिली. बाबांनी सांगितलेल्या गोष्टी :

(१) मी लहान असताना शाली विणत असे. माझ्या कामावर माझे वडील इतके खूष झाले की मला ५ रुपये बक्षिस दिले.

(२) एकदा मी पूर्व किनाऱ्यावर रहात होतो.

(३) त्या अकबराचे काय सांगता मला, त्याच्या बालपणात मी त्याचे संरक्षण केले आहे. तो मला भिऊनच वागत असे.

(४) त्या पैठणच्या ब्राह्मणाला (एकनाथ महाराज) मी ओळखत होतो. असे सर्वोत्तम ब्राह्मण हल्ली दिसत नाहीत.

(५) चांदभाई पाटील माझ्याकडे येऊन त्याने त्याच्या घोड्याबद्दल विचारले,

"तुम्ही माझ्या घोड्याला कोणीकडे हाकललेत ?"

मी म्हणालो,

"तू माझ्यावर का आरोप करतोस ? तिकडे जाऊन बघ. कुरणात घोडा चरत आहे."

इतकेच मी बाबांच्या तोंडून ऐकले. त्यात आपल्या कल्पनेने भर घालून 'साईकथा करंडक' हे पुस्तक तयार केले. बाबांच्या अनुमतीशिवाय ते लिहिले होते. बाबांच्या गोष्टी फार लहान असत. कधी कधी ते गोष्ट अर्ध्यावरच सोडून स्तब्ध होत.

# श्री दत्तचरित्र – एक मागोवा



दत्तोपासना कमीत कमी साडेचार हजार वर्षांपूर्वीपासून भारतात प्रचलित असावी. ज्या अत्रीकुळात दत्तात्रेयाने जन्म घेतला ते अत्रीकूळ वेदांमध्ये गौरविले गेले आहे. अत्री हे लोकप्रिय व विद्वान ऋषी असा निर्देश ऋग्वेदामध्ये आढळतो. श्री दत्तात्रेय अतिप्राचीन, साडेचार हजार वर्षांपूर्वीच दैवत म्हणून पूजिले जाऊ लागले. श्री दत्तात्रेयाचा 'देवता' म्हणून स्पष्ट उल्लेख पुराणांमध्ये आणि महाभारतात आढळतो.

ब्रह्मांड पुराणात ब्रह्मदेवाच्या अष्टपुत्रांपैकी अत्री हे एक पुत्र असून त्यांना दत्त आणि दुर्वास हे दोन पुत्र व एक कन्या असल्याचा निर्देश आढळतो. या पुराणात श्री दत्तात्रेयाला 'शांतात्मानं' हे विशेषण लावलेले आहे.

कूर्मपुराणाच्या १३व्या अध्यायात अत्री ऋषींची पत्नी अनसूयेच्या पोटी विष्णू, शिव, ब्रह्मा यांनी पुत्ररूपाने जन्म घेतला आणि त्यांची नावे सोम, दुर्वास व दत्त होती, असे म्हटले असून या तीन पुत्रांना 'योगी' असे संबोधिलेले आढळते.

त्रेतायुगाच्या प्रारंभी श्री दत्तात्रेयावतार झाल्याचे मत्स्यपुराणकार म्हणतात. १०० व्या अध्यायातील १४ व्या श्लोकात श्री दत्तात्रेय आणि श्री व्यासांना मत्स्यपुराणाच्या काळात दशावताराइतकी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती, हे दिसते. मत्स्यपुराण हे अतिप्राचीन पुराण असल्यामुळे श्री दत्तांना दिव्यत्व अतिप्राचीन काळापासून प्राप्त झाल्याचे स्पष्ट होते.

श्रीमद्भागवतपुराणात दत्तजन्मकथा सांगितलेली आहे. अत्री ऋषींना अनसूयेपासून झालेल्या पुत्रांपैकी दत्तात्रेय हा एक. अत्रींनी पुत्रप्राप्तीसाठी ऋक्ष्यकुल पर्वतावर घोर तपश्चर्या केली. या घोर तपाने त्यांच्या मस्तकातून ज्वाला निघू लागल्या व त्या ज्वालांमुळे त्रैलोक्याचा दाह होऊ लागला. तेव्हा सर्व देव तेथे आले व त्यांनी ब्रह्मा, विष्णू व महेश यांचा अंशरूप पुत्र तुला होईल, असा वर दिला. त्यामुळेच श्री दत्त ब्रह्मा, विष्णू व महेश यांच्या अंशाने अत्री ऋषींना प्राप्त झाला. अत्रींना ब्रह्मा सोमरूप, विष्णू दत्तात्रेय आणि रूद्र दुर्वासरूप अशी तीन मुले झाली. देवांनी अत्रींना तपाचे कारण विचारले असता, "आपण माझ्या उदरी पुत्ररूपाने जन्म घ्यावा", अशी विनंती अत्रींनी देवांना केली. देवांनी त्यांची ही विनंती मान्य केली व त्याप्रमाणे अत्रींना ही तीन मुले प्राप्त झाली.

दत्ताने अत्री ऋषींना ब्रह्मज्ञानाविषयी विचारले असता, त्यांनी त्याला गौतमी तटावर जाऊन शंकराची आराधना करायला सांगितले व शंकर प्रसन्न होऊन ब्रह्मज्ञानप्राप्ती करून देतील, असे सांगितले. याप्रमाणे दत्ताने गौतमीतीरावर जाऊन, स्नान करून, शुचिर्भूत होऊन, हात जोडून शंकराची प्रार्थना केली की मला आत्मज्ञानप्राप्ती होऊ दे! त्यामुळे श्री शंकर दत्तावर संतुष्ट झाले व त्यांनी दत्ताला वर दिले, विपुल आत्मज्ञान आणि मुक्ती दिली. आत्मज्ञान लाभलेला अत्रेय श्री दत्त एक महान सिद्धपुरुष झाला, असे ब्रह्मपुराणातील २१३ व्या अध्यायावरून दिसते. या महात्म्याने वैदिक धर्माचे पुनरुत्थान करण्याचे महान प्रयत्न केले, असे या अध्यायात सांगितले आहे.

विष्णूच्या प्रसादामुळे 'दत्तात्रेय' नामक महात्मा जन्माला आला. तो क्षमाशील होता. त्याने अधर्माला मान्यता मिळते आहे, हे पाहून सर्व दोष दूर करून पुन्हा वेद, चातुर्वर्ण्य, धर्म, यज्ञ यांना मान्यता मिळवून देत, धर्माचे शैथिल्य दूर केले, असा ब्रह्मपुराणातील २१३ व्या अध्यायातील श्लोकांचा मतितार्थ आहे. श्री दत्त हे सिद्ध महात्मा असल्यामुळे त्यांना वर देण्याचे सामर्थ्य लाभले होते. सर्व भूतमात्रांचा अंतरात्मा व विष्णूच्या प्रसादाने जन्माला आलेल्या श्री दत्ताने लक्ष्मीला मुक्त करण्यासाठी, देवांना दैत्यांच्या पारिपत्यासाठी सहाय्य केले, असाही उल्लेख ब्रह्मपुराणात आढळतो.

अनुशासन पर्वाच्या ९१ व्या अध्यायात, श्री दत्तात्रेयांचे गृहस्थ्यजीवन सूचित करणारी महत्त्वाची बाब उल्लेखिलेली आहे. त्यांना अत्रींच्या वंशातील संबोधून, दत्तात्रेयांना निमि नावाचा पुत्र आणि निमिला श्रीमान नावाचा पुत्र होता, असा उल्लेख आहे.

ब्रह्मपुराणाच्या ११७ व्या अध्यायात, 'आत्मतीर्थ' या तीर्थाचे वर्णन येते. त्यात श्री दत्ताचे जे चित्र उभे केले आहे, ते अवतारी पुरुषाचे नसून एका सामान्य साधकाचे दिसून येते. येथे संसारतापाने, दारिद्र्याने, रोगाने, षड्विकारांनी पिडलेला अत्रीसूत दत्त ब्रह्माला सामान्य माणसासारखी याचना करीत आहे.

श्रीमद्भागवतकारांना दत्त हा भगवान विष्णूची उत्तमप्रकारे सेवा करणारा भक्त अशा स्वरूपात अभिप्रेत आहे.

मार्कण्डेय पुराणातील १७ व्या अध्यायात दत्तात्रेयाचा विष्णूस्वरूप असा उल्लेख आहे.

हरिवंश हे महाभारताचे खिलपर्व समजले जात असून त्याच्या अध्याय ३१ मध्ये ९२ ते १०० श्लोकांमध्ये दत्तात्रेयांच्या अवताराचे वर्णन आले आहे. त्यात दत्तात्रेय या अवतारात मुख्य गुण 'क्षमा' हा होता. या अवताराच्यापूर्वी, वेद लुप्त होऊन, एकंदरीत सत्यधर्म शिथिल पडून अधर्म वाढू लागला होता. सत्य नाहीसे होऊन असत्य जोरावले होते. हा प्रकार पाहून परमात्म्याने हा दत्तावतार धारण करून यज्ञक्रियांसहीत पुनरपि वेद स्थापन केले आणि भेसळलेले ब्राह्मणादि चातुवर्ण्य निवडून वेगळे वेगळे काढले.

यापूर्वी लिहिल्याप्रमाणे ब्रह्मपुराणातही हरिवंशाप्रमाणेच अगदी असेच दत्तात्रेय अवतारांचे वर्णन आलेले आहे.

संस्कृत पंचमहाकाव्यांमध्ये अंतर्भाव होत असलेल्या 'नैषधिय चरित' या सुप्रसिद्ध महाकाव्यात कवी श्रीहर्षाने विष्णूच्या विविध अवतारांना नमन करताना दत्तस्वरूप विष्णूची स्तुती पुढीलप्रमाणे केलेली आहे– ''अद्वयपथ अनुसरणाऱ्या, सहस्त्रार्जुनाच्या यशःप्राप्तीचे बीज असलेल्या, योगाचरणामुळे 'अनघ' ही संज्ञा प्राप्त केलेल्या आणि अलर्काचा भवमोहांध:कार दूर करणारा सूर्य असलेल्या, हे दत्तात्रेया, तुला मी नमन करतो.''

या स्तुतीत उल्लेखिलेल्या सहस्त्रार्जुन व अलर्क या शिष्यांप्रमाणे परशुराम, यदू, आयु व प्रल्हाद हेसुद्धा दत्तात्रेयांचे शिष्य होत. सांकृती हा ब्राह्मण शिष्य होता.

परशुरामांच्या मातोश्री रेणुका यांनी स्वतःचा मरणसमय जवळ आला, हे ओळखून परशुरामांना श्री दत्तांना बोलाविण्यास सांगितले. कारण श्री दत्तात्रेयांना त्या स्वतःसाठी आचार्यपद देऊ इच्छित होत्या. परशुराम शोधत शोधत जेव्हा श्री दत्तापाशी पोहचले, तेव्हा ते मदिरासक्त व एका स्त्रीबरोबर होते. प्रथम त्यांनी परशुरामाच्या विनंतीस नकार दिला. परंतु त्यांच्याबरोबर असणाऱ्या स्त्रीच्या सांगण्यावरून त्यांनी रेणुका यांचे आचार्यपद स्वीकारले.

यदू हा ययाती व देवयानी यांचा मुलगा, परंतु राज्य न मिळाल्याने तो संन्यासी बनून जंगलात निघून गेला. तेव्हा जंगलात श्री दत्तात्रेयांनी यदूला दर्शन दिले ते अवधूल अवस्थेत व त्याला आपले शिष्य बनविले.

जाबलदर्शनोपनिषदात दत्तात्रेयांना महाविष्णू म्हटलेले असून, योग साम्राज्याचा अधिपति, महायोगी, भूतभावन अशी विशेषणे लावलेली आहेत. तसेच दत्तात्रेयांना चतुर्भूज म्हणून संबोधिले आहे.

शांडिल्योपनिषदात दत्तात्रेय रूपसुंदर, कमळाच्या पाकळीप्रमाणे नाजूक असून त्यांना चार हात आहेत. तसेच श्री दत्तात्रेयांचे स्वरूप मंगलस्वरूपी, शान्त, इन्द्रनीलमण्याप्रमाणे सावळे, आत्ममायाबरोबर क्रीडा करणारे, अवधूत, दिगंबर, शरीराला भस्म लेपन करणारे, जटा वाढविणारे, चार बाहू असलेले, कमळाप्रमाणे डोळे असलेले, प्रफुल्ल योगीजनांना प्रिय वाटणारे असे आहे.

भिक्षुकोपनिषदातील दत्तात्रेय विरागी, मुक्त विहार करणारे, निष्परिग्रही, सर्व वर्णांची भिक्षा स्वीकारणारे, ब्रह्ममार्गामध्ये संपन्न असणारे, एक परमहंस संन्यासी होत.

श्री दत्तात्रेयांचे वर्णन करताना 'विश्वरूपधरं विष्णु नारायण दत्तात्रेय' असे दत्तात्रेयोपनिषदात म्हटलेले आढळते. 'दत्तात्रेयमुपास्महे' याकरिता हे दत्तात्रेय-उपनिषद निर्माण झालेले आहे. या उपनिषदात दत्त अनसूयेचा आनंदवर्धित करणारा अत्रिपुत्र असून, तो महायोगी, अवधूत, बालोन्मत्तपिशाचवेश धारण करणारा आहे.

श्री दत्तात्रेयांना विष्णूचा अवतार मानले गेले आहे. परंतु त्यांचे स्वरूप विष्णूसारखे षड्गुणैश्वर्यसंपन्न, राजराजेश्वर, सालंकृत, सुंदर नसून ते शिवासारखे जटाजूटधर, स्वेच्छाविहारी, अवधूत-दिगंबरजोगी असे असल्याचे दिसते.

आतापर्यंत केलेल्या उहापोहावरून असे दिसते की श्री दत्तात्रेय हे उपासक व साधक होते. त्यांनी शंकराची आराधना केली व त्यांचा अनुग्रह श्री दत्तावर झाला, म्हणून शिव हे दत्तात्रेयांचे गुरुच झाले. श्री दत्तात्रेयांनी एकूण २४ गुरु केले. एकंदरीत श्री दत्तांची तीन रूपे दिसतात-- संसारी, भोगी-विलासी आणि परमहंस संन्यासी. पद्मपुराणात ''दत्तात्रेयो मुनिश्रेष्ठः साक्षात देवो जनार्दनः'' असे म्हटले आहे.

महाराष्ट्रात एक प्रमुख उपासना म्हणून घरोघरी दत्ताची उपासना होते. नाथ, महानुभाव, वारकरी, समर्थ ह्या चार प्रमुख संप्रदायांशिवाय आनंद, चैतन्य, तंजावरकडील पतंगावधूत परंपरा आणि काही मुसलमान संतांनीसुद्धा दत्तोपासनेला आपलेसे केले होते. या दत्तोपासकांशिवाय खुद्द दत्तोपासकांच्या धारेतून महाराष्ट्रात जी दत्तोपासना होते, या धारेला ''दत्तसंप्रदाय'' असे संबोधिलात. खरे पहाता, वर निर्देशिलेल्या सर्व संप्रदायांनी श्री दत्तांच्या उपासनेस उचलून धरले आणि त्यामुळे दत्तोपासना महाराष्ट्रात घरोघर पोहोचली. सर्वच मोठ्या पंथांनी श्री दत्तात्रेयांना ''श्री गुरुदेव दत्त'' अशी मान्यता दिल्यामुळे व गुरुस्थानी मानल्याने सर्वच पंथ मूलतः दत्तसंप्रदायी होत. म्हणूनच संप्रदायातीत अशी ही दत्तोपासना आहे. नाथसंप्रदाय वस्तुतः दत्तसंप्रदाय होय! नाथांनी अवधूत म्हणजे दत्तात्रय असे स्पष्ट म्हटले आहे.

दैवत म्हणून मान्यता पावलेल्या श्री दत्तात्रेयाचे स्वरूप म्हणजेच श्री दत्ताची ध्यानमूर्ती. ही एकमुखी व त्रिमुखी असून, त्रिमुख कल्पनेचा कालांतराने विकास झाला. द्विहस्ता ते अष्टभुजापर्यंतचा श्री दत्त, शिवस्वरूप दत्त, विष्णूस्वरूप दत्त, अंबर-परिधान दत्त, दिगंबर दत्त, योगाधिराज दत्त, विकृताचरणी दत्त अशा अनेक स्वरूपात श्री दत्तात्रेयांच्या मूर्त्या वेगवेगळ्या स्थानी आहेत.

दत्तमूर्तीचे तीन भिन्न प्रकार आहेत.

ब्रह्मा-विष्णू-शिव एकमेकांजवळ उभे असे शिल्प अजमेर येथे आहे. परंतु यात

(पृष्ठ क्र. ४६ वर)

# 'श्री ललिता माऊली'



श्री नित्यानंद स्वामी

सौ. लीला जोशी व श्री. विनयकुमार यांनी लिहिलेल्या 'श्री ललिता माऊली' या पुस्तकाची चरित्रनायिका ही भगवान श्री नित्यानंदबाबा यांची मानसकन्या. ललितादेवींची आई सौ. गिरिजाबाई यांच्या रोमारोमात भगवद्भक्ति खेळत होती. ललिताबाईंचा जन्मही जणू हरिगुण गाण्यासाठीच झाला. श्री गोपाळकृष्ण मंदिराच्या पवित्र परिसरात सत्त्वशील रामभक्त व पतिव्रता गिरिजाबाईंनी एका तेजस्वी कन्येला गुरुवार, दिनांक २६ एप्रिल १९०६ रोजी अक्षय तृतियेच्या दिवशी जन्म दिला. भगवान गोपाळकृष्ण मंदिराच्या परिसरात जन्म झाल्यामुळे या मुलीचे नाव कृष्णाबाई असे ठेवले गेले. याच वरील ग्रंथाच्या चरित्रनायिका. ललितादेवींची आई सौ. गिरिजाबाई या ललितेच्या लहानपणीच म्हणजे सहा वर्षाच्या असतानाच श्रीरामात विलीन झाल्या.

वयाच्या तेराव्या वर्षी कृष्णाबाईंचा विवाह श्री रमावल्लभदास कृपापोषित हट्टंगडी कुटुंबातील श्री. सुब्बाराव यांचे चिरंजीव श्री. देवराव यांचेशी झाला. सासरचे नाव ललितादेवी असे ठेवण्यात आले.

लग्नानंतर वर्षभरातच एक घटना घडली. संध्याकाळी शाळेतून घरी आल्यावर घरातील मंडळी दाराला कुलूप लावून बाहेर गेल्यामुळे पडवीमध्ये खांबाला टेकून त्या बसल्या. अंधारातच ''हे घे'' असे शब्द आले. त्या अदृश्य शक्तिने की कुणा व्यक्तिने 'श्री कृष्णलीला' हे पुस्तक त्यांच्या हाती दिले.

देहत्याग करतेवेळी ललिताच्या आईने तिला प्रभू रामचंद्राला दिलेली होती. म्हणून त्या उद्‌गारल्या की आता मी श्रीकृष्णास कशी भजूं.

श्री राम म्हणजे कर्तव्य, सत्यधर्मपरायणता, सदाचार. श्रीकृष्ण म्हणजे विश्वप्रेम! वसुधैव कुटुंबकम किंवा हें विश्वची माझें घर– अशी अंत:करणाची स्थिति होण्यासाठीच जणू ललितादेवींना कृष्णभक्तिचा दैवी आदेश झाला. या घटनेमुळे त्यांच्या अंत:करणात कृष्णभक्तिचे बीज रूजले. दिवसेंदिवस कृष्णभक्ति साकार होऊ लागली. श्रीकृष्णाचे अखंड स्मरण चालू झाले. भगवान श्रीकृष्णाचे दर्शन कसे होईल हा एकच निदिध्यास त्यांना लागला. ललितादेवींची सात्त्विक भावस्थिती पाहून साध्वी अंबाबाईने त्यांना खालील महामंत्राचा जप करायला सांगितले.

'हरे राम हरे राम राम राम हरे हरे'

'हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे'

श्रीकृष्णदर्शनासाठी मिळालेल्या वरील महामंत्राचा, नाममंत्राचा घोष सतत अंत:करणात चालू झाला. त्या नामाचे त्यांना जणू वेडच लागले. जेवणखाण, अभ्यास याकडचे लक्ष उडाले.

त्यांचे यजमान देवराव यांची उडुपी येथे बदली झाल्यामुळे ललितादेवींच्या कृष्णभक्तित भरच पडली. उडुपी येथे श्रीमध्वाचार्यांनी स्थापन केलेले श्रीकृष्ण मंदिर आहे. तिथे त्या जाऊ लागल्या.

१९२३ साली त्यांना पुत्ररत्न लाभले. त्याचे नाव सुब्बाराव ठेवले. १९२६ साली ललितादेवींना कन्यारत्न झाले. तिचे नाव पार्वती ठेवण्यात आले.

१९२८ साली त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव रमानंद ठेवण्यात आले.

ललितादेवींनी संसारात राहून परमार्थ साधला. त्यांच्या जीवनातील १९३० ते १९४५ चा काळ कुटुंबसेवा, समाजसेवा, देशसेवा व पारमार्थिक साधना यांचा सुंदर मिलाफ होता. यजमानांची सरकारी नोकरी असल्याने प्रत्यक्षपणे असहकार चळवळीत भाग घेणे सरकारच्या दृष्टीने मोठा गुन्हा होता. तरीही ललितादेवींनी अप्रत्यक्षपणे समाजसेवा, देशसेवा करण्याचा मनोमन निर्धार केला. महात्मा गांधीजींच्या हिंदी-भाषा-प्रचार मोहिमेत सक्रिय भाग घेण्याचे त्यांनी ठरविले. इंग्रजी माध्यमातून त्यांचे शिक्षण झाल्यामुळे इंग्रजी भाषेवर त्यांचे चांगलेच प्रभुत्व होते. त्यांनी घरीच हिंदी शिकण्यास प्रारंभ केला. हिंदी परीक्षेत त्यांनी कर्नाटकात प्रथम व दक्षिण भारतात द्वितीय स्थान मिळविले. मद्रास हिंदी भाषा



श्री ललिता माऊली



**परमहंस आनंदाश्रम स्वामीजी**

प्रचारसमितीतर्फे त्या सन्मान्य प्रचारक झाल्या व उडुपीत पहिले हिंदी केंद्र काढले. केंद्रातर्फे हिन्दी नाटके बसविली जात. ललितादेवींनी 'मुरली' नावाचा हिंदी अंकही काढला.

चूल व मूल यापुरताच स्त्रीजन्म मर्यादित नसून स्त्रीने आपल्या जीवनाचा सर्वांगीण विकास केला पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. त्यांनी शिवणकाम, विविध खेळ, संगीत, कला, नाट्यस्पर्धा इत्यादिंत भाग घेण्यास अनेक स्त्रियांस उद्युक्त केले. शिवणकामाचे वर्ग चालू केले व आसपासच्या गरजू लोकांचे कपडे शिवून देण्याचा उपक्रमही चालू केला. स्त्रीशिक्षणाचे वर्ग काढून त्यांना मोफत शिकविण्याची व्यवस्था केली.

१९४३ च्या सुमारास रामनगरी येथे अवतारी संतपुरुष परमपूज्य श्री रामदास यांच्या दर्शनास त्या गेल्या असता त्यांच्या पदअंगुष्ठाला आपल्या उजव्या हाताच्या अंगठ्याने किंचित स्पर्श केला असता त्यांच्या अंगात विद्युलशक्ति संचारल्यासारखी झाली. थरकाप सुटून अष्टभाव दाटून कुंडलिनी जागृत झाली. अश्रुधारा वाहू लागल्या. त्यांना साक्षात्कार झाला होता.

१९४५ साली त्या गणेशपुरीस गेल्या व तिथे नित्यानंदस्वामींचे दर्शन घडले. ललितादेवी त्यांच्या नि:स्सीम भक्त बनल्या. लहानपणीच श्री तुकाराम महाराजांचे त्रिकाल भजन, बारा अभंग तसेच श्री ज्ञानेश्वरांचे हरिपाठ तोंडपाठ केल्यामुळे प्रत्येक गोष्टीत, प्रसंगात ते अभंगच त्यांना समाधान, मनोधैर्य देत असत. श्री ज्ञानेश्वर माऊलींना जसे अमृततुल्य स्वानुभव आले त्याचप्रमाणे ललिताबाईंना स्वत:च्या अनुभवांवर आधारित अनेक गोष्टींचे निरूपण करता येऊ लागले. त्यांना भेटायला येणाऱ्या अनेकांना त्या साक्षात्कारी असल्याचा अनुभव यायला लागला. उत्स्फूर्तपणे त्यांच्या तोंडून येणाऱ्या अनेक गोष्टींचे पद्यमय विवरण ऐकून लोकांना त्यांच्या पायावर डोके ठेवावेसे वाटायचे. हरि होऊनी हरिगुण गाणाऱ्या या साध्वीचे अनेक लोक उपासक बनले.

**श्री साईबाबांचे दर्शन**

आश्विन चतुर्दशी, १९६४. दीपावलीची वेळ. नित्यनियमाची भजने व आरती नुकतीच झाली होती. रात्रीचे दहा वाजण्याचे सुमारास अचानक पूज्य श्री साईबाबांचे आगमन झाले. माऊलींस अंतरात उमजून आले. लगेच त्यांनी बाबांचे चरण प्रक्षाळून तीर्थ घेतले व त्यांस दिवाळीचा खाऊ दिला. त्यांनी फक्त एकच लाडू खाल्ला व इतर प्रसाद म्हणून माऊलींस दिला व अभयहस्त दाखविला. नंतर उठून निघाले आणि दाराबाहेर जाताच अदृश्य झाले. प्रसाद खाताना माऊलींच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. भगवान श्री साईबाबा व श्री नित्यानंदबाबा एकरूप असल्याची जाणीव होऊन रात्रभर नित्यानंदभजनात त्या तल्लीन झाल्या.

नित्यानंदबाबांच्या आज्ञेनुसार त्यांनी पनवेल हे आपले कार्यस्थान निवडले. नित्यानंदबाबांच्या कृपेने त्यांना योग्य अशा जागा पनवेलमध्ये मिळत गेल्या.

१९४८ साली मार्गशीर्ष महिन्यात मावी असताना ललितादेवींना एकमुखी दत्ताचे दर्शन झाले. सात दिवस त्यांनी दत्तसप्ताह साजरा केला. त्यावेळी त्या मिताहारी राहून तपश्चर्येत होत्या. शेवटच्या दिवशी कर्पुरारती ओवाळताना 'अध्यात्म दत्तजन्म' स्फुरले. अनसुया भावावेशात बाळ दत्ताला सुंदर पाळणासुद्धा गाईला गेला. ते लिखाण कानडीत लिहिले गेले होते. त्यांनी नंतर मराठीतही 'अध्यात्म दत्तजन्म' लिहिले. त्यातील गूढ मतितार्थ, सद्गुरुचरणांचे विवरण सुंदर उतरलेले आहे.

ललितादेवींचा होत असलेला उदोउदो पनवेलमधील काहींना सहन झाला नाही. एका मांत्रिकाने सतीच्या रूपानें जाखीण पाठविली. ललितादेवी प्रत्यक्ष शक्तिअवतार होत्या. त्यांनी स्वभावत: भाविक असलेल्या स्त्रीच्या शरीराचा ताबा घेतलेल्या जाखीणीला परतवली. मांत्रिकाने पाठविलेला विषाचा पेढा पचविला. भगवान श्री नित्यानंदबाबा ज्यांचा अवतार दुष्ट निर्दाळण्याकरिता होता त्यांनी आपल्या भक्ताचे रक्षण करण्याकरता अभयहस्त उंचावून सांगितले की गुरुपौर्णिमेच्या दिवशी पाच वाजता उलटी होऊन ते विष बाहेर पडेल व तसेच झाले. नित्यानंदस्वामींनी ललितादेवींना शक्ति प्रदान केली व सांगितले, "तुझा देह लोककल्याणासाठी झिजव. करतल भिक्षा तरूतल वास, परमहंस दिक्षा दिली आहे. जे काय मिळेल त्यावर तृप्त रहा. पनवेलातच रहा." नंतर पनवेलातच राहून ललितादेवींनी आपले कार्य आरंभिले. त्यांचा 'नित्यानंद ललितविलास' पुढे पूर्ण वैभवाने झळकू लागला. त्यांच्या कृपाप्रसादाने आजारी माणसे बरी झाली. अतर्क्य गोष्टी घडू लागल्या.

पूज्य श्री ललितामाऊली सर्वांशी प्रेमाने वागतात. माऊलींच्या निरभिमानतेमुळे आपण गुरु आहोत ही भावनाच त्यांचे ठायी नाही. सर्वांच्या सुखदु:खात सहभागी होणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. अडलेल्या नडलेल्यांना आपल्या गुरुकुलात ठेऊन आपल्यापरीने त्यांची सेवा करतात.

इतके असूनही परमार्थाची अत्युच्च पायरी जिला सहजानंद अथवा सहजसमाधी म्हणतात त्यात माऊली सदैव रंगलेल्या असतात. लोकांना भक्तिमार्गास लावण्याकरिता त्या प्रत्यक्ष आचरण करून दाखवितात.

'नाहीं सोवळे ओवळे।
ऐसे केले हो गोपाळे'

या उक्तिप्रमाणे जरी त्या परमार्थाच्या अखेरच्या सिद्धांतापर्यंत पोहोचलेल्या असल्या तरी शुचिर्भूततेचे महत्त्व व मर्म स्वत: आचरण करून इतरेजनांना दाखवित असतात. देवांचा श्रृंगार इत्यादि कामे त्या स्वत:च करतात.

गेली पन्नास वर्षे त्यांच्या मुखातून सतत वाहणारी ज्ञानगंगा भक्तांनी उतरवून घेतली आहे. अनेकदा खोल समाधीतून उतरत असता गूढज्ञान निकटच्या भक्तांनी टिपून ठेवले आहे. ही उत्स्फूर्त ज्ञानधारा आपल्या मुखातून कधी व केव्हा बाहेर पडते याचा त्यांचा त्यांनाच पत्ता नसतो. मराठी, इंग्रजीमध्ये केलेली असंख्य कवनें, अभंग, ध्यानसाधनेतील अनेक उच्च अनुभूति व तत्सम अनेक लेख त्यांनी लिहून ठेवलेले आहेत. पारमार्थिक धन हे अमोल आहे. अलौकिक आहे. हिरे, मोती, अलंकाराहूनही अनंत पटीने श्रेष्ठ आहे. सर्वांपुढे प्रदर्शन करणे त्यांना उचित वाटत नाही. ते योग्य वेळी अधिकारी साधकाच्या इच्छेनुसार ज्यास परमार्थाची ओढ आहे त्यालाच निरूपणाने पटवून देणे त्यांना योग्य वाटते.

गाऊली सहजसमाधिवस्थेत मुरलेल्या असल्याने जागृतावस्थेत बोलत असताही त्यांची आंतरिक शांतता अनुसंधान ढळू शकत नाही. पैसा व त्याचा योग्य उपयोग करणे, संसार व परमार्थ कसा तोलाने घ्यावा त्यावर मार्गदर्शन करतात. जिज्ञासू व मुमुक्षू भक्तांना त्यांच्या वैयक्तिक पातळीप्रमाणे बोध करतात.

गाऊलींचा सदाचारावर फार भर आहे. सर्वाभूती भगवद्भाव हा तर त्या स्वत:च आचरण करून दाखवितात. स्वधर्माचरण करणे, कुळधर्म पाळणे हे अगदी जरूरीचे आहे असे त्या म्हणतात. शुद्ध देह व पवित्र वातावरण चित्तशुद्धीस साहाय्यभूत होतात. त्या म्हणतात, भक्ति कशासाठी करावी? तर अंत:करणाची तळमळ शमविण्यासाठी, आत्मतृप्तीसाठी, स्वसमाधानाकरिता, भक्ति करीत हरिप्रेमात रंगून सद्गुणांनी युक्त होऊन सतत कामधंद्यामध्ये दक्ष राहावे अशी त्यांची शिकवण आहे. अर्थावर लक्ष ठेऊन भजन करावे. तरच एक ना एक दिवस तो अर्थ अंतरात घुसून हृदयस्थ परमेश्वराचे दर्शन होईल. भक्तिप्रेम वाढवीत नवम भक्ति आत्मनिवेदनापर्यंत वाढवून सद्गुरुकृपा जोडावी. जो सद्गुरुकृपेस पात्र होतो त्याने आत्मदर्शन वाढवून सद्गुरुकृपा जोडावी.

त्या म्हणतात, अखंड नामस्मरण असावे. बुद्धी सहाणेवर घासावी तरच विवेकाचा सुगंध दरवळेल. या जगात शाश्वत काय अशाश्वत काय याचा सारासार निवाडा करता करता बुद्धी सूक्ष्म होते. अनासक्तीने प्रपंच करणे, गर्व न करणे, वडिलांना मान देणे, संतांवर आदरबुद्धी, देवावर श्रद्धा ठेवणे, गुरुसेवेत अंगचोरपणा न करणे, परमार्थाच्या नावाखाली आळशी न होणे इत्यादि सद्गुणांनी युक्त होऊन स्वाभिमानपूर्वक जीवन जगावे अशी त्यांची शिकवण आहे.

प्रेमाने परमात्मप्राप्ती लवकर होते असे त्या म्हणतात. याला राधेचा व गोपिकांचा दृष्टांत त्या देतात. असा नित्यक्रम ठेवला की तुम्हाला ज्ञानमय, सौंदर्यमय, अनंतशक्तिमय, रहस्यमय, लीलामय, प्रेममय, प्रकाशमय अशा त्या अनंतकोटी ब्रह्मांडनायकाची भेट होईल.

**– सौ. प्रविणा कांवळी**

पुस्तकाचे नाव : भगवान श्री नित्यानंद बाबा यांच्या मानसकन्या श्री ललितामाऊली

लेखक : सौ. लीला रा. जोशी
श्री. विनयकुमार

पृष्ठ-संख्या : १२६

मूल्य : २० रु.

प्रमुख विक्रेते : केशव भिकाजी ढवळे,
श्रीसमर्थ सदन, गिरगाव,
मुंबई – ४०० ००४.

---

(पृष्ठ क्र. ४३ वरून)

वेगळे वळण दिलेले आढळते.

योगासनातील विष्णू व त्याच्या पद्मासनाच्या पट्टीवर हंस, गरूड, नंदी प्रतिके अशी शिल्पे बदामी, तिरूचेंदूरपासून १८ मैलांवर असलेल्या सुब्रह्मण्यम मंदिराजवळील गुंफेत (जिल्हा तिरूनेलवेली), भडोच शहरात नर्मदा तीरावरील गुंफामंदिरात (हा दत्त षड्भुज, तीन शिरे व एका हातात शिस्न धरलेले असा आहे), कलकत्त्यातील संग्रहालयात (ही प्राचीन दत्तमूर्ती तीन मस्तके व सहा हात असलेली आहे), पाटण येथील अष्टभूज दत्तमूर्ती त्रिमुखी भद्राजवळील राम मंदिरात (सिद्धपूरजवळ, उत्तर गुजरातेत दत्तांजवळ कामधेनू दाखविलेली ही पहिलीच मूर्ती आहे) येथे आढळतात.

त्रिमूर्ती शिल्पे खालील ठिकाणी आहेत.

अन्नामलाई टेकडी, जिल्हा कोइंबतूर; ओरिसातील त्रिमूर्ती; सौराष्ट्रातील परबडी येथील; मंदगपट्टू; महाबलीपूरम येथील ''त्रिमूती मंडप''; म्हैसूर जिल्ह्यातील त्रिपुरुष देवांची मंदिरे; महाराष्ट्रात अजंठा-वेरूळच्या ब्राह्मणी गुंफेच्या परंपरेतील मोठा मंदिर समुचय बळसाणे (जिल्हा धुळे, पिंपळनेरपासून २३ कि.मी. अंतरावर साक्री तालुक्यात) या गावी, त्रिमूर्ती शिल्पें आढळतात.

श्री दत्तात्रेयांचे अवतार श्रीपादश्रीवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती, श्री जनार्दन स्वामी, श्री एकनाथ, श्री दासोपंत असे झाले.

भक्तांच्या आग्रहावरून श्री वासुदेवानंदांनी त्रिमुखी दत्तमूर्तीची स्थापना राजमहेंद्रीस केली.

सध्याच्या काळात श्री दत्तात्रेयांची उभी, त्रिमुखी, पाठी कामधेनू व आजूबाजूस चार श्वान अशी मूर्ती प्रचलित आहे.

(सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांच्या, १९८७-८८ साली त्यांनी मुंबई विद्यापीठास सादर केलेल्या 'प्राचीन मराठी वाङ्मयातील दत्तोपासना' या प्रबंधाची या लेखासाठी मदत झाली आहे.)

**– मिलिंद नाझरे**

## श्री साईची चित्रकथा

औरंगाबाद जिल्ह्यातील धूप गावामधील एक मुसलमान चांद पाटील याची औरंगाबादची सफर करताना घोडी हरवली. दोन महिने झाले तरी तिचा थांगपत्ता लागेना. अखेरीस निराश होऊन चांद पाटील माघारी परतायच्या बेतात होता.



औरंगाबाद मागे टाकून साडेचार कोस आल्यावर चांद पाटलाला एका आंब्याच्या झाडाखाली एक दिव्य तेज असलेला अवलिया बसलेला दिसला.



त्या फकिराने चांद पाटलाला हाका मारून बोलाविले, चिलीम पिऊन पुढे जायला सांगितले आणि सहजच विचारणा केली, ''खोगीर हे कसले?''



चांद पाटलाने जेव्हा आपली व्यथा व्यक्त केली, तेव्हा त्या फकिराने एका नाल्याकडे बोट दाखवून तिकडे घोडीचा शोध घ्यायला सांगितले. आणि खरेच आश्चर्य घडले! त्या नाल्याकडे चांद पाटलाला घोडी सापडली.



अवाक् झालेला चांद पाटील घोडी घेऊन परत आला आणि पुन्हा चमत्कार झाला. फकिराने चिमटा मातीत खुपसला. त्यातून जळता निखारा बाहेर काढला. तो चिलमीवर ठेवला आणि पुन्हा छापी भिजविण्यासाठी चिमटा जमिनीवर आपटून पाणी बाहेर काढले. विस्मित झालेल्या चांद पाटलाने चिलीम शिलगावली. ती चिलीम तो स्वत: प्यायला व चांद पाटलालाही प्यायला दिली.

# 'हिंदु' शब्दाचा शोध!

हिंदु या शब्दाचा निश्चित अर्थ शोधण्याचा प्रयत्न व्हायला हवा; त्याचबरोबर प्राचीन वैदिक हिंदु परंपरेने जगभरातील गानववंशासाठी कोणते योगदान दिले आहे याचाही मागोवा घेण्याचा प्रयत्न व्हावयास हवा.

प्राचीन संस्कृत वाङ्मय किंवा प्राचीन शब्दकोषात 'हिंदु' हा शब्द सापडत नाही!

ग्रीक इतिहासकार आणि विद्वान् हिरोदोटस् (इ.स. पूर्व चौथे शतक) हा भारतखंड या देशाला 'इंडिस्' असे म्हणतो. त्याकाळी सिंधु नदी ही भारताची सीमा नव्हती. आजच्या अफगाणिस्थानापर्यंत भारतीय संस्कृती विस्तारलेली होती.

ग्रीक पुराणांमध्ये अनेक ग्रीक देवता भारत किंवा इंडिसमध्ये जन्म पावून ग्रीक राज्यात येवून स्थायिक झाल्या अशा अनेक नोंदी सापडतात. अर्चना नावाची हिंदु देवता 'अथेना' या नावाने ग्रीकमध्ये प्रस्थापित झाली. मूळ अर्चना ही देवी विणकर आणि कोष्टी लोकांची होती. ग्रीकमध्ये ती 'अथेना' होवून गेली तेव्हाही ती स्पीनर आणि विव्हर्सचीच देवता झाली!

अर्चना या शब्दाची फोड व्युत्पत्तीशास्त्राप्रमाणे अच्-अर्च म्हणजे उभे-आडवे धागे विणणे किंवा धाग्यांची विण आणि अर्चित म्हणजे विणलेले कापड किंवा साध्य. म्हणून अर्चना विणकर कोष्ट्यांची देवी! म्हणून ग्रीक वाङ्मयात या देवतेचा उल्लेख 'अथेना इंडियासा' – म्हणजे भारतातून आलेली अर्चनादेवी – असा केलेला आहे.

प्राचीन चिनी वाङ्मयात (इ.स. पूर्व चौथे व पाचवे शतक) भारताचा उल्लेख इंदुदेश म्हणजे चंद्रप्रकाशाचा देश किंवा चांद्रदेश असा सापडतो. प्राचीन चिनी वाङ्मयात ताओ आणि शिन्तो या पंथांच्या लेखन-सामुग्रीत, चिनच्या आदिम जातीय लोकगीतांमध्ये चंद्र हा प्रमुख देव मानलेला आहे. या वाङ्मयात इंदुस्थान हा चंद्रउपासकांचा देश आहे असा स्पष्ट उल्लेख आहे. एवढेच नव्हे तर प्राचीन चिनी लोकगीते व कथांमध्ये, चंद्राने कामी नावाच्या निसर्गदेवतेशी लग्न केले. हिमालयाच्या शांग्रिलावर (अत्युच्च शिखरावर) – (सागरमाथा किंवा माऊंट एव्हरेस्ट – भारतीय भाषेत याला गौरीशंकराचे शिखर असे म्हणतात) हा लग्नविधी पार पडला. म्हणून चंद्रकामी प्रजा किंवा चंद्रवंशीय मनुष्यप्रजा प्रथम इंदुदेशात जन्मास आली असा उल्लेख आहे. हे उल्लेख मेंडारियन आणि शांघायन या दोनही चिनी भाषेत प्राप्त होतात. महाभारतात वर्णिलेली कौरवांची प्रजा ही चांद्रकुळी प्रजा किंवा चंद्रवंशीय राजघराणे असल्याचे सर्वविदित आहे.

ईराण प्रांतातल्या हखामनि साम्राज्याचा सम्राट उरीयस (दुसरा) याने इ.स. पूर्व ५७५ मध्ये पश्चिम भारतावर आक्रमण केले आणि सिंधु नदीच्या उत्तरेकडील भागास आपल्या राज्यात विलीन केले. सम्राट उरीयसने आपल्या दिग्विजयाचे चौदा वेगवेगळे शिलालेख लिहिले. हे सर्व लेख ईराणी, परशियन आणि झेंद भाषेत लिहिलेले आहेत. या शिलालेखांत सैनिकांच्या छावण्यांची वर्णने, रस्ते-बांधणी, ठिकठिकाणी केलेली लूट, नेमलेले अधिकारी, उंट, घोडे यांची निगा, सैनिकांच्या पायांतील वेगवेगळी पादत्राणे, तलवारींची लांबी-रूंदी आणि जिंकलेल्या प्रदेशांची नावे आहेत. शिलालेखांत वापरलेल्या भाषेत 'स' या अक्षराचा उच्चार नाही. 'स'च्या ऐवजी बऱ्याच वेळेस 'ह' हे अक्षर-उच्चार आणि तीन वेळेस 'ह' ऐवजी 'व' हे अक्षर-उच्चार वापरलेले दिसतात. म्हणून सिंधु नदीच्या उत्तरेकडील भागास 'सिंधव' या शब्दाऐवजी 'हिंदव' आणि 'विंदव' असे शब्द-उच्चार येतात. म्हणून सिंधु नदीस हिंदु नदी किंवा विंदु नदी असे शब्द-उच्चार या भ्रष्ट भाषेत वापरलेले दिसतात. कारण उच्चाराप्रमाणे लिपी लिहिण्याची पद्धत अनेक मानववंशात होती. उदा. ग्रीक भाषा.

विजयी राजाच्या विजयाबरोबर त्याची संस्कृतीही पराभूतांकडे येत असते. संस्कृती भाषेतून विकास पावते. म्हणून विजेत्याबरोबर त्याची भाषाही पराभूतांकडे येत असते. भाषेबरोबर कालांतराने विजेत्याचे रिती-रिवाजही गुलाम देशांना स्वीकारावे लागतात. या सर्व गोष्टी कधी सक्तीने, कधी प्रेमाने, कधी भीतीने, कधी आमिषाने, तर कधी लाचारीने पराभूत प्रजेस अवलंबाव्या लागतात. म्हणूनच मानववंशांच्या इतिहासात विजेत्यांची भाषा ही पराभूत प्रजेच्या मूळ मातृभाषेपेक्षा नेहमीच श्रेष्ठ ठरत आली आहे. एकदा सत्ताधाऱ्याची भाषा श्रेष्ठ ठरली की गुलामांना सत्ताधिशांचे प्रेम मिळविण्यासाठी किंवा अभय मिळविण्यासाठी किंवा सत्ताधिशांचा अनुनय करण्यासाठी; सत्ताधिशांच्या भाषेच्या लकबी, रिती-रिवाज यांचे अनुकरण करावे लागते. एकदा अनुकरण करण्याची सवय गुलामांना लागली की परकियांचे रिती-रिवाज आणि भाषा आपलेच आहेत असे समजून त्यांचा एकेक वंश मूळ संस्कृती आणि भाषेकडून परावर्तित होवू लागतो. याचे उदाहरणच द्यायचे झाले तर आपले आंग्लाळलेलेपणच पुरेसे आहे. ब्रिटीशवंशीय लोकांनी आपल्या भारतावर राज्य केले. भ्रष्ट जिभेच्या इंग्रजांना मुंबई असा शब्द उच्चारता आला नाही. म्हणून त्यांनी 'मुंबई'चा उच्चार 'बॉम्बे' असा केला. वसईचे भसीन केले, ठाण्याचे थाना, शीवचे सायन, शिववाडीचे शिवरी, भायखळ्याचे बायकुला, कालीक्षेत्राचे कलकत्ता, तिरूअनंथपूरमचे त्रिवेंद्रुम, राजमहेंद्रीचे राजम् हुंड्री अशा अनेक शहरांची नावे सत्ताधाऱ्यांची भाषा म्हणून आपण पराभूतांनी भ्रष्ट असूनही स्वीकारली. एवढेच नव्हे तर कृष्णाचा क्रिस्ना, मथुरेचा मूत्रा, रामचा रामा, वेदचा वेदा, योगचा योगा असे देवांच्या आणि सांस्कृतिक शब्दांच्या नावांचे भ्रष्टीकरणही आपण मोठ्या अभिमानाने (!) स्वीकारलेय आहे. हेच भ्रष्ट शब्द-उच्चार आज प्रतिष्ठित कॉन्व्हेंट शिक्षणातून अजूनही आपण शिकत आहोत.

उरीयसच्या काळानंतर म्हणजे इ.स. पूर्व ५७५ नंतर हिंदु हा शब्द सिंधुपुरता मर्यादित न रहाता त्या शब्दाचे आणखी नवनवीन

अर्थ तयार होत गेले. त्सनिगास नावाच्या एका विद्वान कोषकाराने परशियन-इंग्रजी शब्दकोष लिहिला. या शब्दकोषात तर हिंदु या शब्दाचे अर्थ भयंकर आहेत! आता या शब्द-कोषातील हिंदु या शब्दाचे अर्थ बघा– हिंदु म्हणजे– सिंधूच्या तिरावर वस्ती करणारा, वेश्यांचा दलाल, काळ्या रंगाचा, कुत्रा, नोकर, गुलाम, चोर, डाकू, ईश्वराचे अस्तित्त्व न मानणारा, स्वत:ची स्त्री विकणारा, घरासमोरचा राखणदार, स्त्रीच्या गालावरील काळा तीळ, कैदी, जीवे मारण्यास योग्य, कुत्सित, जीवन जगण्यास नालायक, संपूर्ण अयोग्य, जेथे पाणी नाही तेथे डोके टेचून मारण्याच्या लायकीचा इत्यादि अर्थ सापडतात!

त्सनिगासच्या कोषानंतर अरबी आणि तुर्की भाषेच्या शब्दकोषातही हिंदु शब्दाचे अर्थ कमीअधिक अशाच वर्णनाचे आहेत. तरीही त्यात तुर्की आणि अरबी विद्वानांनी हिंदु या शब्दाचा अर्थ देताना 'उकिरड्यातील किडा' अशी आणखी एक बिरूदावली जोडलेली आहे!

परकियांनी बहाल केलेल्या या भ्रष्ट उपाधींआधी हिंदु स्वत:स आर्य, वैदिक, महाभाग, महाशय, महानुभाव आणि भारतीय म्हणवून घेत होता. परंतु पराभूततेच्या गर्तेत अडकलेला हा प्राचीन वैदिक आर्यसमाजपुरुष स्वत:च्या सगळ्या सन्माननीय बिरूदावल्या विसरला. सततच्या परकीय आक्रमणाने तो स्वत:चा स्वाभिमान गमावून बसला. कालांतराने परकियांनीच बहाल केलेला हिंदु शब्द रूढार्थाने स्वत:चाच मानू लागला. असे असले तरी अनेक वर्षांच्या रूढीतून आलेली बिरूदावली कोणताही मानव-समाज अभिमानानेच मिरवत असतो.

जगातील सर्व मानववंशांना, सिंधूच्या तिरावरील या मानववंशास हिंदुवंश म्हणूनच परिचित झाला. आणि इतर मानववंशांना त्यांच्याच शब्दात या मानववंशाचा परिचय देण्याची परंपरा सुरू झाली.

इसवी सनाच्या पहिल्या शतकातील ७८व्या वर्षी कुशाण किंवा शकवंशी सम्राट कनिष्क राज्यावर आला. याच्या राज्यात काश्मिर, बुखारा, खानदेश, माणदेश, फारसदेश, पाटलीपुत्र आणि ब्रह्मदेशपर्यंतचा समस्त भारतवर्ष सम्मिलित होता. याची राजधानी पेशावर येथे होती. सम्राट कनिष्काने वीस वर्षे राज्य केले. इ.स.च्या ९८व्या वर्षी याचा पहिला पुत्र व उत्तराधिकारी सम्राट हुविष्क राज्यावर आला. याने चाळीस वर्षे राज्य केले. यानंतर इ.स.च्या १३८व्या साली हुविष्कचा जेष्ठ पुत्र महिष्क हा सम्राट वासुदेव या नावाने राज्यावर बसला. या काळात आणि त्यानंतर या राजवंशांनी अनेक शब्दकोषांची रचना केली. त्याचबरोबर त्यांनी शिवप्रतिमा असलेली नाणी प्रचारात आणली.

सम्राट कनिष्क ते हुविष्क यांच्या काळात तयार झालेल्या शब्दकोषातून हिंदु हा शब्द सतत वापरलेला दिसतो. याचा अर्थ ज्या सिंधु शब्दावरून हिंदु हा शब्द आला किंवा ज्या सिंधु शब्दाऐवजी हिंदु शब्द आला तो सिंधु शब्दकोषातून किंवा समाजातून हळूहळू लुप्त होत चालला होता. असे असले तरी कनिष्काच्या काळातील शब्दकोषांच्या आधी प्राचीन संस्कृत वाङ्मयात सिंधु हा शब्द विद्यमान असल्याचे अनेक उल्लेख सापडतात.

ऋग्वेदातील वेगवेगळ्या मंडलांमध्ये सिंधु शब्दाचा प्रयोग देशवाचक रूपाने केलेला आहे. त्यातील काही संदर्भ असे–

'**नेतासिंधुनाम्**' (ऋग्वेद ७/५/२)

'**सिंधुपति क्षत्रिया:**' (ऋग्वेद ७/६/३)

'**पति: सिंधुनाम्**' (ऋग्वेद ९/१५/५)

'**राजा सिंधुनाम्**' (ऋग्वेद ९/८३)

भविष्यपुराण, प्रतिसर्ग, पर्व २ मध्ये–

'**सिंधुस्थानमितिज्ञेयम् राष्ट्रमार्यस्य चोत्तमम्।**'

आणि '**जानुस्थाने जैनु शब्दा: सप्तसिंधुतथैवच॥**'

'**सप्तसिंधुर्यावनीच पुनर्जम गुरुंडिका।**' (भविष्यपुराण, प्रतिसर्ग, पर्व ५)

कालिका पुराणाच्या मेरुतंत्रात '**अवनी यवनै: क्रांता सिंधुवो विंध्यमाविषन्।**

महान वैय्याकर्णी महर्षि पाणिनींच्या अष्टाध्यायीत– '**सिंधुतक्षशिला दिभ्यो अणवो।**' तसेच माधव दिग्विजय नामक ग्रंथात –

'ॐकार **मूलमंत्राढ्या: पुनर्जन्म दृढाशया:।**
गोभक्तो भारत गुरुर्हिन्दुर्हिंसेन दूषक:॥'

पारिजात हरण नामक संस्कृत ग्रंथात –

'**नाम गुणोपम तुल्य रस: हिंदु पार्तुपतिर्न।**' अशा अर्थांनी सिंधु हा शब्द गौरविलेला दिसतो.

इसवी सनाच्या २५०व्या सालानंतर लिहिल्या गेलेल्या संस्कृत कोषांमध्ये पंडित परशुराम उपरिचर नावाच्या पंडिताने 'रामकोष' नामक कोषात हिंदु शब्दाचा उल्लेख,

'**हिंदुर्दुष्टहन प्रोक्तो नार्यनीति विदुषक:।**
**सद्धर्म पालको विद्वान् श्रोतृधर्मपरायण:॥**'

(म्हणजे दुष्टांचे हरण करणारे नितिमान विद्वान् आर्य, जे सद्धर्माचे पालन करतात आणि जे धर्मपरायण असून चांगले श्रोते आहेत, अशांना हिंदु असे संबोधतात.)

सम्राट कनिष्काने स्वत: लिहिलेल्या 'शब्दकल्पद्रुम' नामक एका संस्कृत-शब्दकोषात हिंदु शब्दाचा अर्थ असा दिला आहे –

'**हीनंनदुषयति इति हिंदु जाति विशेष:।**'

(हीनांना जे कधीही दोष देत नाहीत असा जातिविशेष म्हणजे हिंदु)

सम्राट कनिष्काचा उत्तराधिकारी आणि प्रथमपुत्र सम्राट हुविष्कने 'अद्‌भुत कोष' नावाचा एक शब्दकोष लिहिला असून त्यात तो हिंदूविषयी लिहितो –

'**हिन्दुर्हिन्दुश्च संसिद्धौ दुष्टानाम् च विघर्षणे।**'

(दुष्टांचे विघटन करून त्यांचेसह सुखोपभोग प्राप्त करणारा तो हिंदु)

विश्वविख्यात नालंदा विद्यापीठातील प्रमुख आचार्य पंडित धर्मकिर्ती यांनी मेदिनी-कोष नावाचा एक कोष लिहिला असून हिंदु शब्दाचा अर्थ सांगताना मेदिनीकोषकार म्हणतात –

**'हिन्दुर्हिन्दुश्च हिंदवः हिन्दुर्हि नारायणादि देवता भक्तः।'**

(म्हणजे हिंदुस्थानात राहून शांत जीवन जगणारे, तसेच नारायण आणि इतर देवतांची भक्ती करणारे ते हिंदु) असे हिंदु शब्दाचे भिन्न भिन्न कोषातून अर्थ प्रकट होतात.

'एन्सायक्लोपिडिया ऑफ रिलिजन' नावाचा एक ग्रंथ ऑक्सफर्ड विद्यापीठाने प्रकाशित केला असून सदर ग्रंथात हिंदु शब्दाचा अर्थ दिला आहे. हा अर्थ एका शिलालेखावरुन घेतला असून हा शिलालेख खिस्तपूर्व ४८६ सालातील आहे. ईराणचा पराक्रमी सम्राट राजा दारियस हिस्टार्पस याच्या पर्सिपोलिन्स गावी सापडलेल्या तीन शिलालेखांपैकी दोन शिलालेखांत भारतास 'हिंदव' आणि 'हिंदुश' असे संबोधिलेले आहे. दारियस राजाचे हे शिलालेख अर्वाचीन पर्शियन भाषेतील नसून ईराणच्या प्राचीन झंद भाषेतील आहेत; असाही उल्लेख **'एन्सायक्लोपिडिया ऑफ रिलिजन'** मध्ये **आहे.**

ईराणच्या पारशी संप्रदायाचा प्रमाणभूत ग्रंथ 'तोशीर' (तेजग्रहण) मध्ये–

**'अकनु बिरहमने व्यास नाम अज् हिंद आमद। दाना की अकल चुनानेस्त।'** (म्हणजे व्यास नामक एक ब्राह्मण हिंदुस्थानातून आला. तो फार बुद्धिमान होता. त्याच्यासम बुद्धिमान कोणी नव्हता. असे सांगून याच ग्रंथातील १६३व्या आयतात–

**'चूं व्यास हिंदी बल्ख आमद। गस्तासस् (गस्तासप) जरतख्त रख ख्वान्स।।'** (म्हणजे जेव्हा हा व्यास हिंदु ब्राह्मण ईराणच्या बल्ख नामक राजधानीत पोहोचला तेव्हा ईराणच्या तात्कालीन गस्तासस राजाने आपला प्रधान पंडित विद्वान् जरदुस्तास (झरतुष्ट्र) बोलाविले. जरदुस्तासमोर व्यास म्हणाला–

**'मनमर्दे अम हिंदी निजाद।'**

(म्हणजे मी हिंदुस्थानात जन्मलेला एक सामान्य माणूस आहे.) असा आपला परिचय व्यासाने दिला.

याच ग्रंथात पुढे असेही सांगितले की,

**'व हिंद बाज् गस्त।'**

(म्हणजे पुढे तो व्यास आपले कार्य आटोपून हिंदुस्थानास परतला.)

यापुढील पाच आयतांमध्ये हिंदुस्थानातील ज्ञानसाधना आणि सूर्यउपासना, अग्निपरिक्षण इत्यादि पद्धती पर्शियन लोकांना व्यासांनी कशाकशा शिकविल्या, त्यातून सूर्यकन्येच्या पोटी तेजवान् पुत्र कसे जन्मास आले आणि सूर्य किंवा अग्निमंदिरांची स्थापना कशी झाली याचे विवेचन दिसते.

परकियांनी हिंदु-वंशास अवहेलीत केले असले तरीही ज्ञानसाधनेत भारतीय (भा म्हणजे तेज. या तेजाच्या साधनेत रत असलेले ते भारतीय) वंश हा अनेक मानववंशांना विचार म्हणजे काय, तो कसा करावा, जीवनाचे अंतिम साध्य कसे प्राप्त करावे या विषयातला जगातील सर्व मानववंशांचा आधारभूत गुरु झालेला दिसतो.

उच्च पातळीवरचा मानववंश ठरविताना मानववंशशास्त्रात एका वंशाने दुसऱ्या वंशापासून काय घेतले हे बघण्याऐवजी एका वंशाने दुसऱ्या वंशाला काय दिले यावरून त्या मानववंशाची पातळी ठरविता येते; असे सांगितले आहे. त्याप्रमाणे जगातील संपूर्ण मानववंशांना भारतीय हिंदु-मानववंशाने अपरंपार दिले आहे. असा एकही विषय शिल्लक राहिलेला नाही की त्या विषयात हिंदु-मानववंशाने जगातील मानववंशांना मार्गदर्शन केले नाही.

जगातील इतर मानववंशांना त्यांची स्वतःची लिपी नव्हती. अंक नव्हते. प्रमेय-सिद्धांत मांडण्याची परंपरा नव्हती. म्हणून या मानववंशांचा अभ्यास शिलालेख, उत्खनन संशोधनातून (फॉजील एव्हिडन्स) करावा लागतो. परंतु प्राचीन हिंदु-मानववंशाला त्याची स्वतःची संस्कृत भाषा होती – देवनागरी लिपी होती. (संस्कृत म्हणजे सम्यक् कृतेन– म्हणजे सुधारून वाढविलेली लिपी) या लिपीच्या आधारावरच हिंदु हा मानववंश महान आहे असे मत जगातील मानववंशशास्त्रज्ञांनी (ॲन्थ्रापॉलॉजिस्ट) सतत नोंदविलेले दिसते.

सनातन हिंदु धर्म हा व्यक्तिविकासाचा आणि गतिमान् धर्म आहे. हा विचार-स्वातंत्र्याची जोपासना करणारा धर्म आहे. व्यक्तीच्या निसर्गानुभूतीला अत्यंत आवश्यक असणाऱ्या धर्मपालनाचे बंधन हिंदु धर्माने प्रस्थापित केले. बंधनांनी विरहित असलेली व्यक्ती निसर्गानुभूतीपासून विभक्त होत असल्यामुळे स्वतःचे अस्तित्व टिकवू शकत नसते. जीवनातल्या प्रत्येक विषयासंबंधीचे ज्ञान किंवा प्रत्येक समस्येची उकल अव्यभिचारी पद्धतीने करावी लागत असल्यामुळे या विचारात स्वत्त्व आणि मानवत्त्व या दोहोंच्या हिताचा समावेश असतो. धर्मपालनाचे बंधन नसेल तर व्यक्ती स्वैराचारी बनण्याचा अधिक संभव असतो. म्हणून व्यक्तीची मशागत करताना हिंदु धर्माने संयमाचा आधार मूलभूत मानला. संयमाने सहिष्णुता वाढत असते. यासाठी प्रत्येक व्यक्तीस विचारस्वातंत्र्य असावे लागते. अशातऱ्हेच्या विचारस्वातंत्र्याची परंपरागत शृंखला हिंदु धर्माने अंगिकारली आहे.

हिंदु-तत्त्वज्ञानात एकाने प्रस्थापित केलेला सिद्धांत दुसऱ्याने सूक्ष्मबुद्धीच्या आणि बुद्धिसूक्ष्मतेच्या निकषावर तपासल्याचे ठायी ठायी दिसते. काही वेळा तपासांती तो सिद्धांत स्वीकृतही केला नाही तथापि सिद्धांत प्रस्थापित करणारांविषयी आदराने आणि विनयाने त्यांचे वैचारिक ऋण मानलेले दिसते. म्हणून हिंदु-तत्त्वज्ञानात सिद्धांत राद्धांत (थिसिस आणि ॲन्टिथिसिस) आणि पूर्वपक्ष-उत्तरपक्ष याच पद्धतीने विचार-मिमांसा केलेली आपणास दिसते. अशा चर्चासत्रांमध्ये व्यक्तिगत अहंकाराचा निचरा करण्यासाठी संयम आणि विशुद्ध विचार आदिंना सतत पुरस्कार केलेला दिसतो. त्याचबरोबर व्यक्तिगत अहंकाराचा त्याग, सर्वांभूती एकच आत्मा निवास करीत असतो या उद्गिथावर आधारलेला आहे. **म्हणून वसुधैव कुटुंबकम्** ही विश्वबंधुत्व मैत्रीची प्रेरणा हा एकच धर्म देत आलेला दिसतो. रुचिवैचित्र्यामुळे व्यक्ती भिन्न भिन्न साधनमार्गांचा अवलंब करीत असते. तरीही या भिन्नतेतील एकता म्हणजे या सर्व मार्गांचे ध्येय एकच असते. याची प्रामाणिक जाणीव असल्याने भूतमात्रांवर-प्राणीमात्रांवर–